सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित








सोलापूर | शनिवार, २४ ऑक्टोबर २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक ३२५ । पाने १२ । किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



धारणा करणे याचे दुसरे नाव धर्म असल्यामुळेच याची व्यापकता अनंत आहे. तो केवळ मानव समाजाचाच नव्हे, तर चराचर सृष्टीचा आधार आहे. त्यामुळे भारताचा धर्म म्हणजे 'हिंदू धर्म' खऱ्या अर्थाने मानव धर्म आहे.

**स्व. पं. दीनदयाल उपाध्याय**
पूर्व अध्यक्ष, भारतीय जनसंघ

# ‘एलएसी’वर चीनसोबत संघर्ष सुरूच

## ‘आयटीबीपी’ प्रमुख शत्रुजितसिंह कपूर यांची माहिती

### शौर्य कमांडो सज्ज, सर्व सीमा बटालियनमध्ये ड्रोन प्लाटून तयार

**जयपूर, २३ ऑक्टोबर**



गेल्या काही दिवसांत अरुणाचल प्रदेशातील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर (एलएसी) चिनी लष्करासोबत अनेक ठिकाणी संघर्षाची परिस्थितीही निर्माण झाली. ही परिस्थिती अजूनही कायम आहे. जुलैच्या अखेरपासून ऊपरी सुबनसिरी जिल्ह्यातील असाफिला आणि माजा परिसरात तणाव आहे. सुरक्षा मजबूत करण्यासाठी भारतानेही सीमेवर आपली तैनाती वाढवली आहे आणि सर्व सीमांवरील बटालियनमध्ये ड्रोन प्लाटून तयार करण्यात आल्याची माहिती 'आयटीबीपी'चे (इंडो-तिबेट बॉर्डर पोलिस) महासंचालक शत्रुजितसिंह कपूर यांनी दिली.

राजस्थानमधील अलवर येथील 'आयटीबीपी'च्या केंद्रात आयोजित एका शपथग्रहण समारंभात जवानांना संबोधित करताना कपूर म्हणाले की, आधुनिक युद्धाचे बदलणारे स्वरूप पाहता केवळ पारंपरिक युद्धनीतीवर अवलंबून राहणे आता पुरेसे नाही. अरुणाचलमध्ये 'एलएसी'वरील परिस्थिती तणावपूर्ण बनलेली आहे. काही ठिकाणी चिनी लष्करासोबत संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली. जुलैनंतर दोन्ही देशांदरम्यान झालेल्या उच्चस्तरीय बैठका, विशेष प्रतिनिधींची चर्चा होऊनही अनेक भागात तणाव कायम राहिला. लष्करी सामर्थ्यात ते बरेच पुढे आहेत, पर्यायाने आपल्याला पारंपरिक पद्धतीने त्यांचा सामना करणे कठीण होत आहे. सुरक्षेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची तयारी 'आयटीबीपी'ने सुरू केली. याचाच भाग म्हणून ड्रोन तयार करण्यासाठी आणि ड्रोनविरोधी क्षमता मजबूत करण्यासाठी 'आयटीबीपी' काम करत आहे. चीनसोबतच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर सुरक्षा बळकट करण्यासाठी सर्व सीमा बटालियनमध्ये ड्रोन प्लाटून तयार आले. केंद्र सरकारकडून मिळालेल्या ४०० कोटी रुपयांपैकी ७० टक्के रक्कम ड्रोन युद्ध क्षमता वाढवण्यासाठी खर्च केला जाणार आहे.

#### गलवानसारख्या परिस्थितीला तोंड देणार ‘स्ट्राईक’

चीनचा भारताचा सर्वांत मोठा प्रतिस्पर्धी असा उल्लेख करत कपूर म्हणाले, गलवानसारख्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी 'स्ट्राईक' नावाचा एक नवीन प्रशिक्षण अभ्यासक्रम विकसित केला आहे. चीनच्या सीमेवर तैनात जवानांना हे प्रशिक्षण २०२७ च्या अखेरपर्यंत दिले जाईल. ◂ (वृत्तसंस्था)

> **संरक्षण मंत्रालयाशी चर्चा करणार : रणधीर जयस्वाल**
>
> 'आयटीबीपी' प्रमुख शत्रुजित कपूर यांनी चीन सीमेवरील तणावावर केलेल्या टिप्पणीवरून विरोधकांनी सरकारवर टीका केल्यानंतर परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करताना म्हटले की, या मुद्द्यावर संरक्षण मंत्रालयाशी चर्चा केली जाईल. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी आणि गैरसमज व चुकीचे अंदाज टाळण्यासाठी दोन्ही बाजू विद्यमान राजनैतिक आणि लष्करी यंत्रणांचा वापर करत आहेत. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेबद्दलची समज सुधारण्याच्या मार्गांवर चर्चा करण्यावर दोन्ही बाजू सहमत झाल्या आहेत. द्विपक्षीय संबंधांच्या सर्वांगीण विकासासाठी सीमावर्ती भागात शांतता आणि स्थिरता राखणे महत्त्वाचे आहे. ■

# विधान परिषदेच्या पाच जागांसाठी मतदान

## पुणे शिक्षक मतदारसंघ आघाडीवर

**मुंबई, २३ ऑक्टोबर**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या तीन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदारसंघांतील पाच जागांसाठी शुक्रवारी मतदान झाले. पुणे, नागपूर आणि छ. संभाजीनगर पदवीधर, तसेच पुणे आणि अमरावती शिक्षक मतदारसंघांचा यात समावेश आहे. दुपारी दोन वाजेपर्यंत उपलब्ध झालेल्या आकडेवारीनुसार, नागपूर पदवीधर मतदारसंघात ६०.६९ टक्के, अमरावती शिक्षक मतदारसंघात, ९१.८. पुणे विभाग शिक्षक मतदारसंघात ४९.५४ टक्के, तर पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात ३९.७९ टक्के मतदानाची नोंद झाली होती. छ. संभाजीनगर येथे पदवीधर मतदारसंघासाठी ३९.९१ टक्के मतदान झाले.

पुण्यात शिक्षक मतदारसंघात ८५.८७ टक्के तर पदवीधर मतदारसंघात ६२.७८ टक्के मतदानाची नोंद झाली. दोन्ही मतदारसंघांतील मतदानाच्या टक्केवारीत २३.०९ टक्क्यांची तफावत आहे. शिक्षक मतदारसंघात सातारा जिल्ह्याने ८९.३९ टक्के मतदानासह आघाडी घेतली तर पदवीधर मतदारसंघात सोलापूर जिल्हा ७१.४२ टक्के मतदानासह अव्वल ठरला. दुसरीकडे, पुणे जिल्ह्यात शिक्षक मतदारसंघात तर सांगली जिल्ह्यात पदवीधर मतदारसंघात सर्वांत कमी मतदान झाले. त्यामुळे विभागातील जिल्हानिहाय मतदानाचे चित्र लक्षवेधी ठरले आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी नागपुरातील रविनगर परिसरातील दादाजी धुनिवाले शाळेत मतदानाचा अधिकार बजावला

औरंगाबाद पदवीधर मतदारसंघासाठी धाराशिव जिल्ह्यातील ७६ मतदान केंद्रांवर आज सकाळी ८ वाजता मतदानाला शांततेत सुरुवात झाली. दुपारी २ वाजेपर्यंत जिल्ह्यातील ११ हजार ६३३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असून, मतदानाची टक्केवारी ३९.९१ इतकी आहे. नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी आज ६ जिल्ह्यांमध्ये शांततेत मतदान पार पडले. यात ३८ उमेदवारांचे राजकीय भवितव्य मतपेट्यांमध्ये बंद झाले आहे. विधान परिषदेच्या अमरावती विभागातील शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी सरासरी ९१.८ टक्के मतदान झाले. गत निवडणुकीच्या तुलनेत ते १० टक्क्याने वाढले आहे.

मतदानाची प्रक्रिया सायंकाळी चार वाजता संपली. मात्र, पाचही मतदारसंघांतील अंतिम मतदानाची टक्केवारी आणि एकत्रित मतदानाचे प्रमाण स्वतंत्रपणे अधिकृतरीत्या निश्चित झाल्यानंतरच स्पष्ट होणार आहे. येत्या २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार असून, त्यानंतर पाचही जागांचे निकाल जाहीर होतील. ◂ (तभा वृत्तसेवा)

> **सर्वाधिक मतदान वाशीम जिल्ह्यात**
>
> विधान परिषदेच्या अमरावती विभागातील शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी सरासरी ९१.८ टक्के मतदान झाले. गत निवडणुकीच्या तुलनेत ते १० टक्क्याने वाढले आहे. सर्वाधिक मतदान वाशीम जिल्ह्यात ९२.८७ टक्के झाले. एकूण २६ उमेदवार निवडणूक रिंगणात असून त्यांच्या भाग्याचा फैसल मंगळवार २७ ऑक्टोबर रोजी होणार आहे. निवडणुकीसाठी विभागातील अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, अकोला, वाशीम या पाच जिल्ह्यांत ८१ मतदान केंद्र तयार करण्यात आले होते. एकूण ३५ हजार ८१० मतदार शिक्षकांपैकी जवळपास ३२ हजार ५१५ शिक्षकांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला आहे. ■

## महत्त्वाचे

### सलग चौथ्या दिवशी घसरण कायम

**मुंबई :** शेअर बाजारात सलग चौथ्या सत्रात घसरण कायम राहून शुक्रवारी कामकाजादरम्यान तीव्र विक्रीमुळे निफ्टी २२,४०० च्या खाली घसरला. पण, नंतर बाजार सावरून २२,६०० च्या पातळीवर बंद झाला. बाजार सुरुवातीला तेजीत उघडला, परंतु पहिल्याच तासात ही तेजी टिकवून ठेवण्यात यश आले नाही. विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांची सातत्याने होणारी विक्री आणि कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे गुंतवणूकदारांच्या भावना दुखावल्या. यामुळे निफ्टी इंट्राडेमध्ये २२,३७२ या सत्रातील नीचांकी पातळीपर्यंत घसरला. दिवसभराच्या व्यवहारअखेर सेन्सेक्स १२५.५६ अंकांनी घसरून ७३,१२३.८३ वर बंद झाला. सेन्सेक्सने दिवसाच्या नीचांकी पातळीवरून ६७० अंकांची रिकव्हरी दाखवली.

### भारताचा विदेशी चलनसाठा घटला

**मुंबई :** या आठवड्यात भारताचा विदेशी चलनसाठा ५.०११ अब्ज डॉलर्सनी कमी होऊन ७२१.०१६ अब्ज डॉलर्सवर आला आहे, अशी माहिती भारतीय रिझर्व्ह बँकेने शुक्रवारी दिली. त्याआधीच्या आठवड्यात हा साठा ८.५७८ अब्ज डॉलर्सनी घसरून ७२६.०२७ अब्ज डॉलर्सवर आला होता. ४ सप्टेंबर रोजी संपलेल्या आठवड्यात विदेशी चलनसाठा ७८५.७०६ अब्ज डॉलर्सच्या उच्चांकी पातळीवर पोहोचला होता. याचे मुख्य कारण म्हणजे अनिवासी भारतीयांच्या ठेवींसाठी राबवलेल्या विशेष सवलतीच्या 'स्वॅप' योजनेद्वारे बँकांनी विक्रमी सुमारे १३३ अब्ज डॉलर्स उभारले होते.

### पंतप्रधान उद्या ओडिशाच्या दौऱ्यावर

**भुवनेश्वर :** भुवनेश्वरच्या बाह्य भागात असलेल्या भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (आरबीआय) १६९ कोटी रुपयांच्या डेटा सेंटरचे उद्घाटन करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी २५ ऑक्टोबरला ओडिशाच्या दोन तासांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. मुख्य सचिवांच्या कार्यालयाने दिलेल्या कार्यक्रमानुसार, मोदी भारतीय हवाई दलाच्या विशेष विमानाने दुपारी ४.३० च्या सुमारास येथील बिजू पटनायक आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरणार आहेत. त्यानंतर ते विमानतळावरून हेलिकॉप्टरने खुर्दा हेलिपॅडवर जातील. ■

### नेहा बोराची याचिका फेटाळली

**नवी दिल्ली, २३ ऑक्टोबर**

'ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशन'ची (आयसा) राष्ट्रीय अध्यक्ष नेहा बोराची याचिका शुक्रवारी उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. भारतीय नागरी संरक्षण संहितेच्या (बीएनएसएस) कलम १२६ आणि १३० अंतर्गत शांतता राखण्यासाठी बाँड भरण्यासाठी जारी केलेल्या नोटीसला आव्हान देणारी याचिका दाखल करण्यात आली होती. गुरुवारी न्यायालयाने निर्णय राखून ठेवला होता.

नेहा बोराला १६ ऑक्टोबरला मंडी हाऊस येथे एका बैठकीला जात असताना ताब्यात घेण्यात आले होते. तिने आरोप केला की, तिला अज्ञात ठिकाणी नेण्यात आले आणि आरके पुरम पोलिस स्टेशनमध्ये रात्रभर ठेवले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता सोडण्यात आले. नोटीसमध्ये नेहावर मंडी हाऊसवर घोषणाबाजी करणे, जंतर मंतरभोवती आंदोलन न करण्याचा आदेश असतानाही निदर्शने करणे आणि लोकांना कॅनॉट प्लेसवर निदर्शने करण्यास प्रवृत्त करणे, असे आरोप ठेवण्यात आले. शांतता भंग झाल्याच्या शंकेचे समर्थन करण्यासाठी नोटीसमध्ये कोणतेही ठोस कारण, विशिष्ट घटना किंवा कालावधी देण्यात आलेला नाही, असे नेहाने याचिकेत म्हटले आहे. ◂ (वृत्तसंस्था)



वृंदावन येथील 'ब्रज राज उत्सव-२०२६'च्या उद्घाटनादरम्यान शुक्रवारी 'गंगा' ही शास्त्रीय नृत्यनाटिका सादर करताना अभिनेत्री हेमा मालिनी

# ‘त्या’ ध्वनिफीत प्रकरणाची न्यायवैद्यक चौकशी

## मुख्यमंत्री फडणवीसांची नागपुरात घोषणा

**नागपूर, २३ ऑक्टोबर**

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत उघड केलेल्या ३१ मिनिटांहून अधिक कालावधीच्या ध्वनिफितीने महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडवून दिली आहे. या प्रकरणाची न्यायवैद्यक चौकशी करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी नागपुरात केली.

फडणवीस यांनी आज रविनगर येथील दादाजी धुनीवाले शाळेत नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघासाठी मतदान केले. त्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी या ध्वनिफितीवर भाष्य केले.

अडीच वर्षांनंतर ही ध्वनिफीत बाहेर आणण्यामागे काय हेतू आहे, कुणाला लक्ष्य करण्यासाठी तिचा वापर केला जात आहे का, या सर्व बाबींची चौकशी केली जाईल. यात कुणाचा आवाज आहे, याची न्यायवैद्यक चौकशी केली जाईल.

#### ध्वनिफितीत आहे तरी काय ?

जरांगे यांनी केलेल्या दाव्यानुसार ध्वनिफितीतील मजकूर-

- या क्लिपमध्ये तीन ते चार व्यक्तींचे संभाषण.
- शिवसेनेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यामार्फत मनोज जरांगेंना ५०० कोटी रुपये पोहोचविल्याचा उल्लेख.
- भाजपाकडून मराठा आंदोलन कमजोर करण्यासाठी षडयंत्र रचले जात असल्याचा जरांगे यांचा दावा.
- प्रतिमा मलीन करण्यासाठी गेल्या तीन वर्षांपासून राजकीय षडयंत्र सुरू असल्याचा जरांगेंचा आरोप.

#### शिवसेनेचे प्रत्युत्तर

शिवसेनेचे नेते संजय शिरसाट, उदय सामंत, दादा भुसे यांनी सर्व आरोप फेटाळले आहेत. एकनाथ शिंदे यांना बदनाम करण्यासाठी राजकारण असल्याचा संशय त्यांनी व्यक्त करीत, एसआयटी किंवा सखोल चौकशीची मागणी केली होती. ◂ (तभा वृत्तसेवा)

# संघाच्या अ. भा. कार्यकारी मंडळाची बैठक इंदूरमध्ये

## २, ३ आणि ४ नोव्हेंबर रोजी आयोजन

**इंदूर, २३ ऑक्टोबर**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची वार्षिक अखिल भारतीय कार्यकारी मंडळाची बैठक यावर्षी माळवा प्रांतातील इंदूर (मध्यप्रदेश) येथे २, ३ आणि ४ नोव्हेंबर, २०२६ रोजी होणार आहे.

बैठकीत सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे, सर्व सहा सह-सरकार्यवाह, इतर अखिल भारतीय कार्य विभाग प्रमुखांसह कार्यकारिणीचे सदस्य उपस्थित राहतील.

अखिल भारतीय कार्यकारी मंडळात संघ रचनेतील सर्व ४६ प्रांतांमधील प्रांत संघचालक, कार्यवाह आणि प्रचारक, तसेच सह-प्रांत संघचालक, कार्यवाह आणि प्रचारक अपेक्षित असतात. याशिवाय, संघ रचनेतील सर्व ११ क्षेत्रांचे संघचालक, कार्यवाह आणि प्रचारक, तसेच सह-क्षेत्र संघचालक, कार्यवाह आणि प्रचारक देखील उपस्थित राहतील.

नुकत्याच संपन्न झालेल्या विजयादशमीच्या शुभप्रसंगी, गेल्या वर्षभरापासून देशभरात सुरू असलेल्या संघ शताब्दी वर्ष सोहळ्याची सांगता झाली. बैठकीत या वर्षीच्या विजयादशमी सोहळ्यानिमित्त सरसंघचालकांनी आपल्या भाषणात मांडलेल्या मुद्द्यांच्या पुढील अंमलबजावणीवर चर्चा होईल, अशी माहिती रा. स्व. संघाचे अ. भा. प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी दिली. ◂ (वृत्तसंस्था)

# अखेर जिल्हा बँकेची निवडणूक जाहीर; २९ नोव्हेंबरला मतदान

**१९ जागांसाठी होणार लढत**

**30 नोव्हेंबर रोजी मतमोजणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑक्टोबर-**

डीसीसी अर्थात सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी २९ नोव्हेंबरला मतदान तर ३० नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने बँकेचा हा निवडणूक कार्यक्रम मंजूर केला आहे. दरम्यान, 'डीसीसी'च्या एकूण १९ जागांसाठी लढत होणार आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक मुकुंद पवार यांनी गुरुवारी निवडणूक कार्यक्रम मंजुरीसाठी पुणे सह निबंधक कार्यालयाकडे पाठवला होता. त्यानंतर तिथून तो प्रस्ताव राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे गेला होता. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याने डीसीसी बँक निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात होणार आहे. सोमवार, दि.२६ ऑक्टोबर ते शुक्रवार दि.३० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारांना आपले नामांकन पत्र जिल्हा उपनिबंधक कार्यालयात दाखल करता येतील. चिन्ह वाटप व अंतिम यादी एकाच दिवशी १९ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिध्द केले जातील.

#### असा असेल निवडणूक कार्यक्रम

उमेदवारी अर्ज दाखल करणे- दि. २६ऑक्टोबर ते दि.३० ऑक्टोबर २०२६ उमेदवारी अर्जांची छाननी-दि.२ नोव्हेंबर २०२६ अर्ज माघारीची मुदत-दि.४ नोव्हेंबर ते दि.१७ नोव्हेंबर २०२६ चिन्ह वाटप व अंतिम यादी-दि.१८ नोव्हेंबर २०२६ मतदान-दि.२९ नोव्हेंबर २०२६ मतमोजणी आणि निकाल-दि.३० नोव्हेंबर २०२६

#### या १९ जागांसाठी होणार निवडणूक

कृषक सेवा सोसायटी, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, शेतकी सहकारी पेटपेढ्या (प्रत्येकी तालुक्यातून १)-११, महिला प्रतिनिधी-२, अनुसूचित जाती/जमती-१, इतर मागासवर्गीय-१, विमुक्त जाती/भटक्या जमाती-१ जागा, कृषी पणन व शेती माल प्रकिया संस्था-१, दूध संस्था/व्यक्ती सभासद-१, नागरी सहकारी बँका-पतसंस्था, ग्रामीण बिगरशेती पतसंस्था (विणकर, मजूर, गृहनिमिण संस्था वगळून)-१ जागा.

# भारतीय लष्करात नागास्त्र-२ तैनात

**नवी दिल्ली, २३ ऑक्टोबर**

भारतीय लष्कराची क्षमता वाढवण्यासाठी स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञानावर काम सुरू असतानात महाराष्ट्रातील नागपूर येथील सोलर डिफेन्स अँण्ड एरोस्पेस लिमिटेड कंपनीने भारतीय लष्कराला स्वदेशी बनावटीचे नागास्त्र-२ रणगाडाविरोधी 'लोइटरिंग म्युनिशन सिस्टिम'ची (आत्मघाती ड्रोन) पहिली खेप दिली आहे. हे शस्त्र लक्षित क्षेत्रात पाळत ठेवू शकते आणि आवश्यक असल्यास, चिलखती लक्ष्यांवर अचूक हल्ला करू शकते. रणगाड्यांसारख्या जड चिलखती लक्ष्यांना उद्ध्वस्त करण्यासाठी नागास्त्र-२ तयार करण्यात आल्याची माहिती संरक्षण विभागाने दिली आहे.

स्वदेशी बनावटीचे नागास्त्र-२ रणगाडाविरोधी आत्मघाती ड्रोन ५० किमी पर्यंतच्या अंतरावरील लक्ष्यांना भेदू शकते आणि त्याचा उड्डाण कालावधी ६० मिनिटांपर्यंत आहे. यामध्ये दिवस-रात्र पाळत ठेवणारे कॅमेरे, चार किलोग्रॅम वजनाचे स्फोटके आणि इलेक्ट्रॉनिक जॅमिंगचा सामना करण्यासाठी ईसीसीएम क्षमता आहे. नागास्त्र-२ ची ऑगस्ट २०२६ मध्ये लडाख आणि उत्तर प्रदेशातील झाशीजवळील बबिना तेथील लष्करी तळावर तांत्रिक चाचणी पूर्ण झाल्याचे संरक्षण विभागाने म्हटले. ◂ (वृत्तसंस्था)

**नागपूरच्या सोलर डिफेन्सची निर्मिती**

### ५० किमीवरून शत्रूचे रणगाडे होणार उद्ध्वस्त



> **अडथळ्यांमध्ये हल्ल्याची क्षमता**
>
> युद्धभूमीवर शत्रूने दळणवळणात व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केला, तरी एकदा लक्ष्य निर्धारित केल्यावर अचूक मारा करण्याची क्षमता नागास्त्र-२ मध्ये आहे. जीपीएस सिग्नल जॅम झाल्यावरही हे शस्त्र काम करण्यास सक्षम आहे. अडथळे पार करून अचूक लक्ष्य साधणे याची विशेषतः आहे. यापूर्वी भारतीय लष्कराच्या मागणीनुसार २०२५ मध्ये सोलर डिफेन्स अण्ड एरोस्पेस लिमिटेडने ४५० नागास्त्र-१आर लोइटरिंग म्युनिशन्स (घिरट्या घालणारी शस्त्रे) चा पुरवठा केला. नागास्त्र-१आर मध्ये पुनर्वापर करण्यायोग्य लाँचर प्रणाली, ३६०-अंश फिरणारा कॅमेरा आणि रात्रीच्या मोहिमांसाठी थर्मल कॅमेरा बसवण्याचा पर्याय आहे. ■


**ताज्या घडामोडी** क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या** किंवा ९८८१०११६६२ व्हॉट्सॲप क्रमांकावर संपर्क साधा. सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### कॉर्बेटचे संचालक साकेत बडोला स्वेच्छानिवृत्त

**रामनगर :** कॉर्बेट व्याघ्र प्रकल्पाचे संचालक साकेत बडोला यांनी शुक्रवारी वैयक्तिक कारणास्तव आपल्या पदावरून स्वेच्छानिवृत्त होत असल्याची घोषणा अचानक केली. काही महिने गंभीर विचार केल्यानंतर, मी वैयक्तिक कारणास्तव भारतीय वन सेवेतून स्वेच्छानिवृत्त होण्याचा निर्णय घेतला आहे, असे त्यांनी एका समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले. उत्तराखंड केडरचे २००८ च्या तुकडीचे भारतीय वन सेवा (आयएफेस) अधिकारी असलेले बडोला हे मुख्य वनसंरक्षक म्हणूनही कार्यरत होते. त्यांनी आपल्या राजीनाम्यामागील कोणतेही विशिष्ट कारण उघड केले नाही. पौरी जिल्ह्यातील कोटद्वारचे रहिवासी असलेले बडोला, वन सेवेत रुजू होण्यापूर्वी पशुवैद्य म्हणून कार्यरत होते. २००९ मध्ये, ते तराई पश्चिम वन विभागात प्रशिक्षणार्थी डीएफओ म्हणून रुजू झाले. त्यानंतर ते कॉर्बेट व्याघ्र प्रकल्पाचे उपसंचालक झाले. त्यांनी राजाजी व्याघ्र प्रकल्पाच्या संचालकपदाची जबाबदारीही स्वीकारली. राजाजी प्रकल्पातून बदली झाल्यानंतर जुलै २०२४ मध्ये ते कॉर्बेट व्याघ्र प्रकल्पाचे संचालक झाले. गेल्या वर्षी, त्यांना मुख्य वनसंरक्षक पदावर पदोन्नतीही मिळाली.

### कार कोसळल्याने चार भाविकांचा मृत्यू

**जयपूर :** खाटूश्यामजीचे दर्शन घेऊन परतीच्या मार्गावर असलेल्या भाविकांच्या कारचा अचानक टायर फुटला. त्यामुळे चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले आणि ती खड्ड्यात कोसळली. या अपघातात चार भाविकांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर दोन तरुण गंभीर जखमी झाले. ही घटना शुक्रवारी सकाळी दौसा मनोहरपूर महामार्गावर घडली. स्थानिक लोकांनी या अपघाताची माहिती पोलिसांना दिली. रायसर पोलिस ठाण्याचे पथक तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. कारमध्ये प्रवासी आत अडकले होते. पोलिसांनी गावकऱ्यांच्या मदतीने सुमारे एक तासाच्या प्रयत्नांनंतर आत अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढले असता चार जण मृतावस्थेत आढळले तर दोघे गंभीर जखमी होते. जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. अतुल, मुकुल, रुपेश आणि शिवा, चौघेही रा. आग्रा, अशी मृतकांची नावे आहे.

# युक्रेनसोबत करार शक्य; पण उद्दिष्टे साध्य करणारच

## रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांचा युरोपला स्पष्ट संदेश



**मॉस्को, २३ ऑक्टोबर**
रशिया युक्रेनसोबत वाटाघाटी करण्यास आणि तोडगा काढण्यास तयार आहे, तथापि आम्ही कोणत्याही परिस्थितीत निश्चित केलेली लष्करी उद्दिष्ट्ये साध्य करू. कराराचे उद्दिष्ट रशिया आणि युक्रेनची सुरक्षा सुनिश्चित करणे असेल, तात्पुरते युद्ध थांबवणे नाही असे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी स्पष्ट केले.

रशियन पत्रकार पावेल झारुबिन यांनी घेतलेल्या मुलाखतीत पुतिन म्हणाले की, अलिकडेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचे विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ यांच्यासोबत युक्रेनसोबतच्या संभाव्य करारावर चर्चा झाली. युक्रेनच्या मुद्यावर अमेरिकेसोबत त्रिपक्षीय चर्चा करण्यास आम्ही तयारी दर्शवली आहे. पण कोणत्याही परिस्थितीत, आम्ही आमची लष्करी उद्दिष्ट्ये साध्य करू. रशियावर आक्रमकतेचे आरोप करून युद्धाच्या तयारीची भीती पसरवणाऱ्यांनी एकच लक्षात ठेवावे की, युरोप रशियाला सामरिकदृष्ट्या कधीच पराभूत करू शकत नाही. युरोपीय देश रशियाकडून असलेल्या धोक्याबद्दल अफवा पसरवत आहेत. आम्ही अगदी सुरुवातीपासूनच शांततापूर्ण तोडग्याचे समर्थन करत आलो आहोत. २०१४ मध्ये यावर चर्चा केली होती, पण त्यांनी नागरिकांवर बंदुका आणि लढाऊ विमानांचा वापर केला. त्यानंतर मिन्स्क करार झाले. मग, डॉनबासमधील कारवाई सुरू होण्यापूर्वीच, आम्ही तडजोडीबद्दल बोललो होतो. पण, युक्रेनने नकार दिला होता. आम्हाला युक्रेन आणि रशियाच्या भविष्यातील सुरक्षा हमींवर चर्चा करायची आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### कोणत्याही परिस्थितीसाठी तयार

पुतिन म्हणाले, आम्ही या गुंतागुंतीच्या विषयावर चर्चा करण्यास तयार आहोत; कारण युक्रेनचे लोक आमच्या खूप जवळचे आहेत. अलिकडील जनुकीय संशोधनातून हे देखील दिसून आले आहे की रशिया आणि युक्रेनचे लोक एक आहेत, पण जर त्यांना वेगळा विचार करायचा असेल, तर हरकत नाही. आम्ही कोणत्याही गोष्टीसाठी तयार आहोत. ज्यांनी गेल्या शतकांमध्ये रशियाला पराभूत करण्याचा प्रयत्न केला, त्यांनाही अखेरीस हे समजले की रशियाशी मैत्री करणेच अधिक चांगले आहे. युक्रेनमधील संघर्ष संवादाद्वारे सोडवण्यासाठी रशिया सर्वतोपरी प्रयत्न करेल.

# महावितरण नाट्यस्पर्धेत ‘थलाई कुथल’ अव्वल



**पुणे, २३ ऑक्टोबर**
महावितरणच्या ‘नाट्यबहार’ आंतरप्रादेशिक राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेत नागपूर परिमंडळाच्या ‘थलाई कुथल’ या नाटकाने प्रथम तर कोल्हापूर परिमंडळाच्या ‘समोरच्या घरात’ने द्वितीय क्रमांक पटकावला. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृहात सामाजिक आशयाची चार नाटके सादर करण्यात आली.

‘थलाई कुथल’चे दिग्दर्शक प्रफुल्ल लांडे यांना प्रथम तर ‘समोरच्या घरात’चे दिग्दर्शक अमित बोकील यांना द्वितीय पारितोषिक मिळाले. नेपथ्यासाठी विठ्ठल पाटील, प्रकाश योजनेसाठी सुजाता सोनटक्के, पार्श्वसंगीतासाठी धर्मदीप फुलझेले आणि रंगभूषा-वेशभूषेसाठी समिधा लोहरे यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले.

जयतीर्थ सांगलीकर यांना उत्कृष्ट अभिनेता तर श्वेता सांगलीकर यांना उत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. असित रामटेके आणि प्रणाली निमजे यांना अभिनयासाठी द्वितीय पारितोषिक मिळाले. महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आलीत. कोकण विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांनी कलाकारांचे कौतुक केले. पुणे परिमंडळाने या स्पर्धेचे आयोजन केले होते. ◂ (तभा वृत्तसेवा)

# माओवादी दाम्पत्याचे कोलकातात आत्मसमर्पण

**कोलकाता, २३ ऑक्टोबर**
पश्चिम बंगाल पोलिसांनी राज्यातील माओवादाचा धोका रोखण्यासह त्यांच्या सदस्यांना मुख्य प्रवाहात परत आणण्याच्या प्रयत्नांमध्ये मोठे यश मिळवले आहे. झारखंडच्या मंगल आणि मालती या दाम्पत्याने कोलकातामध्ये आत्मसमर्पण केले आहे. या कारवाईमुळे माओवादी सशस्त्र चळवळीला मोठा धक्का बसला आहे.

आपले दीर्घकाळचे भूमिगत अस्तित्व आणि सशस्त्र संघर्ष सोडून देण्याचा निर्णय घेऊन, हे दोघे शुक्रवारी कोलकाता पोलिस मुख्यालयात पोहोचले. त्यानंतर त्यांनी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसमोर औपचारिकपणे आत्मसमर्पण केले. या घडामोडीमुळे राज्यातील आणि देशभरातील सुरक्षा व्यवस्थेला मोठा दिलासा मिळाला आहे. मंगल व मालती हे दोघेही बऱ्याच काळापासून भूमिगत होते. परंतु, त्यांनी सशस्त्र संघर्ष सोडून मुख्य प्रवाहात परतण्याचा निर्णय घेतला. ◂ (वृत्तसंस्था)




### दोघांवर होते सात लाख रुपयांचे बक्षीस

कोलकाता पोलिस आयुक्त अजय नंदा यांनी पत्रपरिषदेत या दोघांच्या आत्मसमर्पणाची घोषणा केली. ते म्हणाले, झारखंड पोलिसांनी या दोघांवर एकूण सात लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते.मालतीवर दोन लाख रुपये तर मंगलवर पाच लाख रुपये बक्षीस ठेवण्यात आले होते. बंगाल सरकारच्या धोरणांनुसार आणि पुनर्वसन पॅकेजनुसार त्यांना मुख्य प्रवाहात परत आणून सामान्य जीवन जगण्यास कशी मदत करता येईल, याचा कोलकाता पोलिसही गांभीर्याने विचार करत आहे.

# झारखंडमध्ये चार माओवाद्यांना अटक

**गुमला, २३ ऑक्टोबर**
माओवाद्यांची फुटीर संघटना असलेल्या आणि बंदी घातलेल्या ‘पीपल्स लिबरेशन फ्रंट ऑफ इंडिया’च्या (पीएलएफआय) एका विभागीय कमांडरसह तीन सदस्यांना झारखंडच्या गुमला जिल्ह्यात अटक करण्यात आली आहे, अशी माहिती एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने शुक्रवारी दिली.

एका गुप्त माहितीच्या आधारे, पोलिसांनी गुरुवारी रात्री कामदारा पोलिस ठाण्याच्या हद्दीत बोंगडा गावात छापा टाकून या चौघांना अटक केली. हे चौघेही या परिसरात मोठ्या घातपाती कारवाया करण्याची योजना आखत होते. या माओवाद्यांमध्ये खुंटी जिल्ह्यातील रहिवासी विभागीय कमांडर विश्राम कोंगाडी उर्फ मोटाचा समावेश आहे. कोंगाडीची गुन्हेगारी पृष्ठभूमी असून, त्याच्यावर खुंटी, सिमडेगा, गुमला आणि राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये सुमारे १६ खटले प्रलंबित आहेत. ◂ (वृत्तसंस्था)

### अमेरिकन वैद्यकीय प्रयोगशाळेवर सायबर हल्ला

**वॉशिंग्टन :** अमेरिकेतील मोठ्या वैद्यकीय प्रयोगशाळा कंपन्यांमध्ये समाविष्ट असलेल्या ‘क्वेस्ट डायग्नोस्टिक्स’वर सायबर हल्ला झाला आहे. या हल्ल्यात रुग्णांच्या आरोग्याशी संबंधित आणि वैयक्तिक माहितीवर बेकायदेशीरपणे प्रवेश मिळवण्यात आला. कंपनीने याबाबत माहिती दिली.

### रमेश पत्की यांचे निधन



**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**
जुळे सोलापुरातील जानकी नगर येथील रहिवासी रमेश रामकृष्ण पत्की (वय ६७) यांचे शुक्रवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा शनिवारी दुपारी १ वाजता जानकी नगर येथील निवासस्थानापासून निघणार असून मोदी स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# हमाससाठी कोणतेही सुरक्षित आश्रयस्थान नाही : नेतान्याहू

## हेब्रॉन हल्ल्यानंतर वेस्ट बँक बंद करण्याचा आदेश ● शहराला वेढा घालण्याच्या लष्कराला सूचना



**हेब्रॉन, २३ ऑक्टोबर**
इस्त्रायलच्या दक्षिण वेस्ट बँकमधील हेब्रॉन येथे झालेल्या गोळीबारात दोन ठार, तर पाच जण जखमी झाले, त्यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. प्रत्युत्तरात सुरक्षा दलांनी दोन पॅलेस्टिनी बंदूकधाऱ्यांना ठार केले. हल्ल्याचा निषेध करताना पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी म्हटले की, हमाससाठी जगात आता कोणतेही सुरक्षित ठिकाण राहिलेले नाही, शस्त्रांचा त्याग करेपर्यंत आमचे लष्कर त्यांचा पाठलाग सोडणार नाही. हल्ल्याच्या पृष्ठभूमीवर वेस्ट बँकचे रस्ते, महामार्ग बंद करण्याच्या आणि हेब्रॉन शहराला वेढा घालण्याच्या सूचना सुरक्षा दलाला दिल्याचे त्यांनी सांगितले.

दक्षिण वेस्ट बँकमधील हेब्रॉन शहरात मोठा हल्ला करण्याच्या उद्देशाने दोन पॅलेस्टिनी नागरिक आले होते. त्यांनी बेछूट गोळीबार केला, यात दोन नागरिकांना जीव गमवावा लागला, तर पाच जखमी आहे. सुरक्षा दलाने तातडीने कारवाई करत दोन्ही हल्लेखोरांना ठार करत त्यांचा कट हाणून पाडला. त्यांच्या ताब्यातून एम-१६ रायफल, एक पिस्तूल आणि दारुगोळा जप्त करण्यात आल्याचे इस्त्रायली संरक्षण दलाचे (आयडीएफ) चीफ ऑफ स्टाफ लेफ्टनंट जनरल आयल झमीर यांनी निवेदनात म्हटले आहे. पंतप्रधान कार्यालयाच्या सूचनेनुसार, वेस्ट बँकचा भाग पूर्णपणे बंद करण्यात आला, तर हेब्रॉन शहर आणि आसपासच्या भागात अतिरिक्त लष्कराची तुकडी तैनात करण्यात आली. सैनिकांच्या जलद कारवाईमुळे एक मोठा हल्ला टळला.

**दहशतवादी कट हाणून पाडण्यासाठी सज्ज**

नेतान्याहू यांनी ‘एक्स’वरील पोस्टमध्ये म्हटले की, मी आयडीएफ आणि सुरक्षा दलांना हेब्रॉन शहर तत्काळ बंद करण्याचे आणि आजपासून संपूर्ण जुडिया आणि सामरिया प्रदेशातील मार्ग बंद करण्याचे निर्देश दिले आहेत. आमचे सुरक्षा दल दहशतवाद हाणून पाडण्यासाठी पूर्ण ताकदीने काम करत आहे आणि मोठ्या प्रमाणावर अटकसत्र राबवत आहे. आम्ही हमासच्या दहशतवाद्यांचा आणि त्यांना पाठवणाऱ्यांचा सर्वत्र आणि सर्वकाळ पाठलाग करू, त्यांच्यासाठी कोणतीही सुरक्षित जागा नाही. ◂ (वृत्तसंस्था)

# २८२ अग्निवीरांना मिळणार शासकीय नोकरी

## राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय, आदेश जारी

**मुंबई, २३ ऑक्टोबर**
सागरी सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी राज्य सरकार नौदलात सेवा बजावलेल्या २८२ अग्निवीरांना आपल्या तटीय पोलिस दलात समाविष्ट करणार आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ‘एक्स’वरील पोस्टमध्ये ही माहिती दिली. लष्कर आणि हवाई दलातून परतणाऱ्या अग्निवीरांनाही पोलिस दलात संधी दिली जाईल, असेही ते म्हणाले.

महाराष्ट्रातील २८२ माजी नौदल अग्निवीरांना पोलिस शिपाई म्हणून नियुक्ती देण्यास राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. देशसेवेनंतर आता त्यांना राज्याच्या पोलिस दलात सेवा बजावण्याची संधी मिळणार आहे. देशासाठी सेवा बजावणाऱ्या अग्निवीरांना शासकीय नोकरीत आरक्षण देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला होता. त्यानुसार, आवश्यक नियमांमध्ये बदल करून २८२ माजी अग्निवीरांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा करण्यात आला आहे. अग्नीविरांना थेट नोकरी देण्यात येणार असून, कोणतीही चाचणी द्यावी लागणार नाही.कारण यापूर्वीच त्याचे ट्रेनिंग झाले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. ◂ (वृत्तसंस्था)




उद्योगपती एलन मस्क यांच्या मालकीच्या ‘स्टारलिंक’ या उपग्रह आधारित इंटरनेट सेवेच्या विरोधात स्वदेशी जागरण मंचने नवी दिल्ली येथे शुक्रवारी मोर्चा काढला.

# जिओ आयपीओने रचला इतिहास

## अर्जांची संख्या प्रथमच एक कोटींच्या पार

**मुंबई, २३ ऑक्टोबर**
देशातील सर्वांत मोठ्या जिओ आयपीओने आणखी एक ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. भारतीय शेअर बाजाराच्या इतिहासात प्रथमच एखाद्या आयपीओसाठी अर्जांची संख्या एक कोटींच्या पुढे गेली आहे. ही जागतिक स्तरावरील विक्रमी कामगिरी मानली जात आहे. जिओ प्लॅटफॉर्म्सच्या ३०,२१३ कोटी रुपयांच्या आयपीओने शुक्रवारी अर्ज प्रक्रियेच्या तिसऱ्या आणि अंतिम दिवशी हा विक्रम प्रस्थापित केला. शुक्रवारी दुपारी १२ वाजेपर्यंत उपलब्ध आकडेवारीनुसार, या आयपीओसाठी आतापर्यंत १,००,१५,११८ अर्ज प्राप्त झाले आहेत.

गुंतवणूकदारांकडून मिळालेल्या प्रचंड प्रतिसादामुळे हा आयपीओ एकूण ६.८९ पट सबस्क्राईब झाला आहे, तर पात्र संस्थात्मक गुंतवणूकदारांचा (क्यूआयबी) राखीव हिस्सा १४.३८ पट भरला आहे. यापूर्वी सर्वाधिक अर्ज मिळवण्याचा विक्रम वारी एनर्जीजच्या नावावर होता. ऑक्टोबर २०२४ मध्ये वारी एनर्जीजच्या आयपीओला ९७.३४ लाख अर्ज प्राप्त झाले होते. जिओने आता हा विक्रम मोडीत काढला आहे. जिओ आयपीओला पहिल्याच दिवशी सुमारे ३०.५ लाख अर्ज प्राप्त झाले होते. दुसऱ्या दिवसअखेर ही संख्या ७५ लाखांच्या पुढे गेली आणि तिसऱ्या दिवशी अर्जांची संख्या ऐतिहासिकरीत्या एक कोटींच्या पार पोहोचली.

**सर्वच श्रेणींमध्ये अधिक मागणी**

जिओ आयपीओला गुंतवणूकदारांच्या सर्व प्रमुख श्रेणींमधून भक्कम प्रतिसाद मिळत आहे. बिगर-संस्थात्मक गुंतवणूकदारांचा (एनआयआय) राखीव हिस्सा ९.३८ पट, किरकोळ गुंतवणूकदारांचा हिस्सा २.०७ पट, रिलायन्सच्या कर्मचाऱ्यांसाठी राखीव हिस्सा २.४८ पट, तर भागधारकांसाठी राखीव हिस्सा ५.६८ पट सबस्क्राइब झाला आहे. त्यामुळे सर्व प्रमुख श्रेणींमध्ये राखीव समभागांच्या तुलनेत अधिक मागणी नोंदवण्यात आली आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### अर्जांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता

जिओ आयपीओ २१ ऑक्टोबरला खुला झाला होता. पहिल्याच दिवशी त्याला ३.१६ पट सबस्क्रिप्शन मिळाले, तर दुसऱ्या दिवसअखेर ही पातळी ५.५७ पट झाली. शुक्रवारी सायंकाळी सात वाजेपर्यंत अर्ज करण्याची अंतिम मुदत होती.त्यामुळे गुंतवणूकदारांच्या अर्जात आणखी भर पडली आहे. आयपीओला मिळत असलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाच्या पृष्ठभूमीवर अंतिम आकडेवारी जाहीर होईपर्यंत अर्जांची संख्या आणि सबस्क्रिप्शनच्या प्रमाणात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

# दोन निवडणूक आयुक्तांची कॅबिनेट सचिवांकडे तक्रार

## माहिती अधिकारातून खुलासा, वरिष्ठ उपनिवडणूक आयुक्तांवर हस्तक्षेपाचा उल्लेख

**नवी दिल्ली, २३ ऑक्टोबर**
भारतीय निवडणूक आयोगातील वाढत्या मतभेदांच्या पृष्ठभूमीवर दोन निवडणूक आयुक्त, डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी यांनी २९ जुलै, २०२६ रोजी कॅबिनेट सचिव टी. व्ही. सोमनाथन यांना स्वतंत्र पत्रे लिहिली. यात वरिष्ठ उप निवडणूक आयुक्त मनीष गर्ग यांनी जारी केलेल्या एका आदेशावर हस्तक्षेप घेतला. दोन्ही आयुक्तांनी कामाच्या विभागणीतील बदलाचा उल्लेख करत पूर्वचर्चा न संबंधित अधिकाऱ्याने निर्णय घेतल्याचे त्यांनी म्हटले आहे. ही माहिती माहिती अधिकार (आरटीआय) कायद्याअंतर्गत प्रसिद्ध झालेल्या कागदपत्रांतून समोर आली आहे.

प्रशासन विभागाचे प्रभारी उपनिवडणूक आयुक्त २७ जुलै ते ९ ऑगस्ट दरम्यान रजेवर होते. या काळात वरिष्ठ उपनिवडणूक आयुक्त मनीष गर्ग यांच्याकडे या विभागाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला होता. या काळात त्यांनी आक्षेपार्ह निर्णय घेत कामाच्या विभागणीत महत्त्वाचे बदल केले. असे करताना त्यांनी कुठलीही चर्चा केली नाही, असे निवडणूक आयुक्त सुखबीरसिंग संधू आणि विवेक जोशी यांनी २९ जुलै रोजी कॅबिनेट सचिव टी. व्ही. सोमनाथन् यांना पाठवलेल्या पत्रात म्हटले. गर्ग यांच्यावर कारवाईची मागणी या पत्राद्वारे करण्यात आली होती. आयुक्त संधू यांनी पत्रात नमूद केले की, कार्यभार हाती घेतल्यानंतर काही तासांतच गर्ग यांनी २८ जुलै रोजी कामवाटपाचा नवा आदेश काढला. आयोगाशी किंवा माझ्याशी कोणतीही चर्चा न करता अथवा पूर्वकल्पना न देता कामवाटप करण्यात आले. दुसरे आयुक्त विवेक जोशी यांनी पत्रात लिहिले की, जेव्हा मी प्रशासन विभागाकडून संबंधित फाईल मागवली, तेव्हा ती मला उपलब्ध करून देण्यात आली नाही. भारतीय नौदलातील निवृत्त अधिकारी लोकेश बत्रा यांनी दाखल केलेल्या अर्जाला उत्तर देताना कॅबिनेट सचिवालयाने ही माहिती दिली आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### कामाची विभागणी बदलण्याचा आदेश काढला

गर्ग यांनी वरिष्ठ उप निवडणूक आयुक्त, उप निवडणूक आयुक्त, महासंचालक आणि त्यांच्या समकक्ष अधिकाऱ्यांमधील कामाची विभागणी बदलण्याचा आदेश जारी केला होता. हा आदेश आयोगाशी किंवा त्यांच्याशी सल्लामसलत न करता किंवा त्यांना कामाच्या नवीन विभागणीबद्दल माहिती न देता जारी करण्यात आला. गर्ग यांनी समान किंवा वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांना काम सोपवले. गर्ग उप निवडणूक आयुक्त (प्रशासन) म्हणून कार्यरत असतानाही असेच आदेश जारी करण्यात आल्याचे संधू यांनी पत्रात नमूद केले. हा प्रकार निवडणूक आयुक्त अधिनियम, २०२३ च्या कलम १८(१) आणि १८(२) चे उल्लंघन करते.

### घटनात्मक संस्थेच्या कामकाजात हस्तक्षेप नाही

या प्रकरणावरील कॅबिनेट सचिवालयाच्या एका फाईल नोटमध्ये या पत्रव्यवहाराचा तपशील आहे. ३ ऑगस्ट रोजी सचिवालयाने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांना या तक्रारींवर त्यांचे मत मागवले होते. ४ ऑगस्ट रोजी यावरील नोटमध्ये लिहिले गेले की, दोन्ही निवडणूक आयुक्तांची चिठ्ठी ही वैयक्तिक तक्रारीवर आधारित आहे. ही बाब गंभीर असली, तरी याला संपूर्ण निवडणूक आयोगाचा अधिकृत संदेश किंवा मागणी मानता येणार नाही. घटनात्मक संस्थेच्या कामकाजात हस्तक्षेप करणे योग्य नसल्याचे कॅबिनेट सचिवांनी निवडणूक आयुक्तांना पत्राला उत्तर देताना कळवले.

# शिक्षा पूर्ण होऊनही शेकडो भारतीय कैदी बांगलादेशच्या तुरुंगात

**नवी दिल्ली, २३ ऑक्टोबर**
बांगलादेशमधील तुरुंगात १५ देशांतील सुमारे ४०७ विदेशी कैदी बंदिस्त आहेत. यात भारतीय कैद्यांची संख्या सर्वाधिक आहे. एका वृत्तपत्राच्या वृत्तानुसार, येथील वेगवेगळया तुरुंगांमध्ये २३८ भारतीय कैदी बंदिस्त आहेत. त्यापैकी १६८ जणांची शिक्षा पूर्ण झाली आहे. मात्र, ते अद्याप भारतात परतू शकलेले नाहीत. यापैकी अनेक कैद्यांचे भारतीय नागरिकत्व सिद्ध झालेले नाही. त्यामुळे त्यांच्या मायदेशी परतण्याच्या मार्गात अडथळले आले आहेत.

बांगलादेश सरकारने सुमारे १२० कैद्यांची यादी भारताला पाठवली आहे.त्यात हे लोक भारतीय असल्याचे सांगण्यात आले आहे.मात्र, भारतीय उच्चायोगाच्या मते, यादीतील बहुतांश कैद्यांची माहिती अपूर्ण आहे. ढाका येथील भारतीय उच्चायोगातील एका अधिकाऱ्याने वृत्तपत्राला सांगितले की, आतापर्यंत शिक्षा पूर्ण झाल्यानंतरही तुरुंगात बंद असलेल्या केवळ २५ भारतीय कैद्यांची ओळख पटली आहे. ज्या कैद्यांची माहिती अपूर्ण आहे, त्यांची भेट घेण्याची परवानगी भारतीय उच्चायोगाने मागितली आहे. आम्हाला बांगलादेशच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या उत्तराची प्रतीक्षा आहे.

**जूनमध्येही विदेशी कैद्यांचा मुद्दा**

यावर्षी जूनमध्येही बांगलादेशच्या तुरुंगांमध्ये बंदिस्त असलेल्या विदेशी कैद्यांचा मुद्दा समोर आला होता. त्यावेळी तुरुंगाच्या आकडेवारीनुसार, शिक्षा पूर्ण झाल्यानंतर १५२ विदेशी कैदी मायदेशी परतण्याची वाट पाहत होते. यात १४८ भारतीय होते. त्यावेळी अधिकाऱ्यांनी सांगितले होते की, कैद्यांची ओळख पटवण्यास विलंब होत असल्यामुळे त्यांची देशवापसी रखडली आहे. ◂ (वृत्तसंस्था)



मतदानाची गोपनीयता आणि मतदारांचे स्वातंत्र्य धोक्यात आणणाऱ्या या प्रकाराची निवडणूक आयोगाने व शासनाने तातडीने दखल घेऊन सखोल चौकशी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी. निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष, निर्भय आणि पारदर्शक वातावरणात पार पडलीच पाहिजे.

**- सुप्रिया सुळे**, खासदार, श प गट


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

शनिवार २४ ऑक्टोबर २०२६




आमचा फेव्हिकॉलचा मजबूत जोड आहे. महायुती म्हणून आम्ही एकमेकांसोबत घट्ट उभे आहोत. त्यामुळे आमच्यात फूट पडण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी समोर आणलेल्या ऑडीओ क्लिपची सखोल चौकशी करण्यात येईल.

**-नितेश राणे**, मत्स्यव्यवसाय मंत्री



# पाकिस्तानकडून स्वत:च्या सैनिकांची विटंबना

## ● मानवाधिकारांच्या मुद्यांवर भारताने काढले वाभाडे ● कारगिल युद्धाची करून दिली आठवण ● मृतदेह स्वीकारण्यास दिला होता नकार

**संयुक्त राष्ट्रे, २३ ऑक्टोबर**

श्रद्धेचे हक्क, धार्मिक स्वातंत्र्य आणि दफनविधीच्या हक्कांविषयी निर्लज्जपणे उपदेश करणाऱ्या पाकिस्तानला मानवाधिकारांवर बोलण्याचा अधिकार नाही. १९९९ च्या कारगिल युद्धात मारल्या गेलेल्या आपल्याच सैनिकांचे मृतदेह स्वीकारण्यास पाकिस्तानी लष्कराने नकार दिला होता.

भारतीय लष्कराने अनेक पाकिस्तानी सैनिकांना पूर्ण लष्करी सन्मान आणि इस्लामी रीतिरिवाजांनुसार दफन केले होते. यावरून पाकिस्तानी सरकारचे मानवाधिकाराचे धोरण काय आहे, हे लक्षात येते असे स्पष्ट करत भारताने संयुक्त राष्ट्रांत पाकिस्तानी प्रतिनिधीचे वाभाडे काढले,

पाकिस्तानच्या प्रतिनिधीने जम्मू-काश्मीरचा मुद्दा उपस्थित करत तेथील मानवाधिकारावर प्रश्न उपस्थित केले, त्याला प्रत्युत्तर देताना संयुक्त राष्ट्रांमधील भारताच्या स्थायी मिशनच्या प्रथम सचिव भाविका मंगलानंदन् यांनी पाकिस्तानचा बुरखा फाडत



१९९९ च्या कारगिल युद्धाची आठवण करून दिली. त्यांनी म्हटले की, जो देश स्वतःच्या मृत सैनिकांचे मृतदेह घेण्यास नकार देतो, त्याला मानवी हक्कांवर उपदेश करण्याचा अधिकार नाही. मृत व्यक्तींशी सन्मानपूर्वक वागणे आवश्यक आहे. हा तोच देश आहे जो श्रद्धेचे हक्क, धार्मिक स्वातंत्र्य आणि दफनविधीच्या हक्कांविषयी निर्लज्जपणे बोलतो. भारतावर टीका करण्याऐवजी पाकिस्तानने व्याप्त काश्मीरवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. अल्पसंख्याकांचा मुद्दा उपस्थित करताना मंगलानंदन् म्हणाल्या पाकिस्तानमधील अल्पसंख्यकांची संख्या कमी होत आहे. जो देश आपल्या अल्पसंख्यकांना सुरक्षा देऊ शकत नाही, त्याने भारताला उपदेश करू नये. पाकिस्तानमध्ये हिंदू मुलींचे अपहरण आणि सक्तीच्या धर्मांतराच्या घटना वारंवार समोर येत आहेत. याचा सर्वाधिक फटका हिंदू आणि ख्रिश्चनांना बसत आहे.

**संयुक्त राष्ट्रांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह**

भारताने संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेच्या सध्याच्या व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित भारताचे स्थायी प्रतिनिधी पार्वतानेनी हरीश म्हणाले की, ८० वर्षे जुन्या युद्धाचा निकाल आजच्या जगाचे भविष्य ठरवू शकत नाही. दुसऱ्या महायुद्धात भारतीयांनी दिलेले योगदान आणि बंगालच्या दुष्काळात ४० लाखांहून अधिक लोकांचा झालेला मृत्यू यांचा दाखला त्यांनी दिली. पाकिस्तानसह काही देशांचा गट सुरक्षा परिषदेच्या सुधारणांच्या प्रगतीत अडथळा आणत आहे. सध्याच्या सुरक्षा परिषदेवर दुसऱ्या महायुद्धात विजयी झालेल्या देशांची मक्तेदारी आहे. बदलाचा मसुदा तयार केला जातो आणि त्यानंतर चर्चा होते, मात्र त्यातून काहीही निष्पन्न होत नाही ही बाब दुर्दैवी आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### जम्मू-काश्मीरवर भाष्याचा अधिकार नाही

भारताच्या जम्मू-काश्मीर तसेच त्याच्या अंतर्गत बाबींवर भाष्य करण्याचा पाकिस्तानला कोणताही नैतिक अधिकार नाही. रावलाकोट येथे झालेल्या हिंसाचाराचाही उल्लेख करताना मंगलानंदन् म्हणाल्या, व्याप्त काश्मिरातील नागरिकांना अतोनात यातना दिल्या जात आहेत. त्यांचे आंदोलनाचे अधिकार नाकारण्यात आले. निदर्शने करणाऱ्यांवर बेछूट गोळीबार केला जातो. मानवाधिकारावर बोलणाऱ्यांनी या भागांतील लोकांशी होत असलेल्या वर्तनाकडेही लक्ष दिले पाहिजे.

### दहशतवादावरून सुनावले

दहशतवाद्यांच्या अन्त्यसंस्काराच्या हक्कावरील अहवालावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, भारतीय राजदूत म्हणाल्या की, गुन्हेगारांचे हक्क दहशतवादी हल्ल्यातील पीडितांच्या हक्कांपेक्षा मोठे असू नयेत. दहशतवाद केवळ निष्पाप लोकांनाच मारत नाही, तर राष्ट्राच्या मूल्यांनाही हानी पोहोचवतो.

# ‘वंदे मातरम’लाही समान दर्जा मिळावा

## सर्वोच्च न्यायालयात २७ ऑक्टोबरला सुनावणी

**नवी दिल्ली, २३ ऑक्टोबर**

‘जन गण मन’ या राष्ट्रगीताप्रमाणेच वंदे मातरमला समान दर्जा मिळावा, अशी मागणी आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचली आहे. दिल्ली उच्च न्यायालयात प्रलंबित असलेली ही जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात हस्तांतरित करण्यासाठी अपील करण्यात आले आहे. या याचिकेवर २७ ऑक्टोबरला सुनावणी होण्याची शक्यता आहे. ही याचिका वकील अश्विनी उपाध्याय यांनी दाखल केली आहे.

याचिकाकर्त्याचा युक्तिवाद आहे की, अशीच एक याचिका यापूर्वीच सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळे दिल्ली उच्च न्यायालयात प्रलंबित असलेली याचिका देखील सर्वोच्च न्यायालयात हस्तांतरित केली पाहिजे. या प्रकरणाची सुनावणी सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या न्यायासनासमोर होण्याची शक्यता आहे. सध्या, न्यायालयाने याचिकेत केलेल्या मागण्यांवर अंतिम निर्णय दिलेला नाही.

याचिकाकर्त्याचा युक्तिवाद आहे की, देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात ‘वंदे मातरम’ने ऐतिहासिक भूमिका बजावली आहे. म्हणूनच ते योग्य आदरास पात्र आहे. याचिकेत १९५० मध्ये संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी केलेल्या एका विधानाचाही उल्लेख आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# इंडिगोने सौदी अरब विमानसेवा स्थगितीचा कालावधी वाढविला

**दुबई, २३ ऑक्टोबर**

सौदी अरबमधील सुरक्षाविषयक चिंतेच्या पृष्ठभूमीवर भारतीय विमान कंपनी ‘इंडिगो’ने सौदी अरबसाठीची आपली विमानसेवा स्थगित करण्याचा कालावधी वाढवला आहे, अशी माहिती रियाधमधील भारतीय दूतावासाने शुक्रवारी दिली.





रियाधला येणारी व तिथून जाणारी इंडिगोची विमानसेवा ३१ ऑक्टोबरपर्यंत (त्या दिवसासह) स्थगित राहील. जेद्दाह, दम्मम आणि मदिना शहरांसाठीची विमानसेवा २७ ऑक्टोबरपर्यंत(त्या दिवसासह) स्थगित असेल, असे भारतीय दूतावासाने म्हटले आहे.

सौदी अरबमधील विमानतळ, ऊर्जा प्रकल्प व इतर महत्त्वाच्या पायाभूत सुविधांना लक्ष्य करून ड्रोन व क्षेपणास्त्र हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे. येमेनमधील इराण-समर्थित हुथी बंडखोरांनी या देशाविरुद्ध दीर्घकाळ मोहीम चालवली आहे, त्याचा विमानसेवेवर हा परिणाम झाला आहे.

बुधवारी दम्मम येथील ‘किंग फहद आंतरराष्ट्रीय विमानतळा’वर झालेल्या हल्ल्यात एका भारतीय नागरिकाचा मृत्यू झाला, तर दोन जण जखमी झाले. त्याच दिवशी सौदी अरामकोच्या ‘शायबाह’ तेलक्षेत्रावर झालेल्या आणखी एका हल्ल्यात एक भारतीय नागरिक जखमी झाला. या घटनांनंतर विमानसेवा स्थगित करण्याचा कालावधी वाढवण्यात आला आहे. इतर भारतीय विमान कंपन्यांनीही सौदी अरबसाठीची आपली विमानसेवा यापूर्वीच स्थगित केली आहे. ‘एअर इंडिया’ आणि ‘एअर इंडिया एक्सप्रेस’ने सर्व मार्गांवरील विमानसेवा २४ ऑक्टोबरपर्यंत, तर ‘अकासा एअर’ने २७ ऑक्टोबरपर्यंत स्थगित केली आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# तिबेट भूकंपाने हादरला; २८ ठार

## रिश्टर स्केलवर ७.० तीव्रता

## शेकडो इमारती कोसळल्या, १४० जखमी ● ढिगाऱ्याखाली अनेक जण अडकले ● बचावकार्य युद्धपातळीवर सुरू

**ल्हासा, २३ ऑक्टोबर**

भारताचा शेजारी असलेल्या तिबेटमध्ये गुरुवारी रात्री भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. भूकंपाची तीव्रता रिश्टल स्केलर ७.० इतकी नोंदवण्यात आली. भूकंपाचा केंद्रबिंदू तिबेटची राजधानी ल्हासापासून सुमारे ४०० किलोमीटर दूर नागकू भागात जमिनीखाली १० किलोमीटर खोलीवर होता, अशी माहिती राष्ट्रीय भूकंपशास्त्र विभागाने दिली. भूकंपाच्या हादऱ्याने ४०० पेक्षा अधिक इमारती कोसळल्या. यात २८ लोकांना मृत्यू झाला, तर १४० पेक्षा अधिक जखमी आहे. ढिगाऱ्याखाली अनेक जण अडकले आहेत आणि बचावपथकांकडून युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू असल्याची माहिती तिबेटच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिली.



तिबेटशिवाय पाकिस्तानमध्ये ४.९ आणि अफगाणिस्तानमध्ये ४.१ तीव्रतेचा भूकंप आला. तिबेटच्या नागकू भागात गुरुवारी रात्री ८.२९ वाजता पहिला भूकंपाचा धक्का जाणवला, त्याची तीव्रता ७.० होती, त्यानंतर चार तासांच्या आत ४.३ आणि ५.२ तीव्रतेचे दोनदा भूकंपाचे धक्के जाणवले. भूकंपानंतर नागरिक जीव वाचवण्यासाठी सैरावर पळत सुटले. या घटनेत ४३० इमारती कोसळल्या, ढिगाऱ्यातून २८ मृतदेह आणि १४० जखमींना बाहेर काढण्यात आले. अजूनही अनेक जण ढिगाऱ्यात अडकले असल्याने मृतकांची संख्या वाढण्याची शक्यता बचावपथकाने वर्तवली आहे. तिबेटच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, बेघर झालेल्या नागरिकांना शिबिरात हलवण्यात आले असून, त्यांना आवश्यक सुविधा पुरवल्या जात आहे. बचावपथकाकडून युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू आहे, ढिगाऱ्यात अडकलेल्या नागरिकांचा शोध घेतला जात आहे. भूकंपामुळे नागकू भागाचे मोठे नुकसान झाले आहे.

**पाळीव प्राणीही ढिगाऱ्यात अडकले**

यूएस जिओलॉजिकल सर्व्हेने एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, भूकंपाचा केंद्रबिंदू नागकू शहराच्या पूर्व-ईशान्येस सुमारे १९० किलोमीटर आणि प्रादेशिक राजधानी ल्हासाच्या ईशान्येस सुमारे ३९० किलोमीटर अंतरावर होता. दुसरीकडे या भूकंपात मानवी हानीसोबतच पाळीव प्राणीही मारले गेले. शेकडो गोठ्यांची पडझड झाल्याने शेळ्या, गायींचा मोठ्या संख्येने मृत्यू झाला. ढिगाऱ्यात अडकलेल्यांचा शोध घेण्यासाठी श्वानांची मदत घेतली असल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली. ◂ (वृत्तसंस्था)

### काही तासांतच सात भूकंपाचे धक्के

७.० तीव्रतेच्या धक्क्यानंतर काहीत तासांतच या भागाला सात भूकंपाचे धक्के बसले, त्यांची तीव्रता ४.३ ते ५.२ दरम्यान होती. या सर्व भूकंपांच्या धक्क्यांचा केंद्रबिंदू जमिनीखाली १० किलोमीटर खोलीवर होता. चीनची सरकारी वृत्तसंस्थेने शुक्रवारी दिलेल्या वृत्तात म्हटले की, या भागातील काही ठिकाणी दळणवळण सेवा विस्कळीत झाली आहे.

## चित्रपट वार्ता

### ‘प्रताप’ चित्रपटाचा टीझर प्रदर्शित

मुंबई : निर्मात्यांनी ‘प्रताप’ चित्रपटाचा टीझर समाज माध्यमावर प्रदर्शित केला आहे. यात अभिनेता अमित साध मुख्य भूमिकेत आहे. या





चित्रपटाची कथा एका बॉम्बस्फोट प्रकरणात अडकलेल्या पोलिस अधिकाऱ्याचा प्रवास दर्शवते. या प्रकरणामुळे त्याला नोकरीवरून काढून टाकले जाते. मात्र, तो हार मानण्यास नकार देतो. तुरुंगात असतानाही, तो निर्दोष असल्याचे सिद्ध करण्यासाठी कायद्याचा आधार घेतो. हा चित्रपट सचिन सराफ यांनी लिहिला आणि दिग्दर्शित केला असून, प्रदीप रंगवाणी आणि यूव्ही फिल्म्स यांनी त्याची निर्मिती केली आहे. अमित साध व्यतिरिक्त, या चित्रपटात ईशा देओल, तिग्मांशु धुलिया, मिलिंद गुणाजी आणि सीमा बिस्वास हे देखील महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. चित्रपटाचा ट्रेलर २६ ऑक्टोबर रोजी प्रदर्शित होण्याची शक्यता असून, चित्रपट २० नोव्हेंबर २०२६ रोजी प्रदर्शित होईल.

### ‘जेलर-२’ तिसरा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट

**मुंबई :** रजनीकांत यांच्या ‘जेलर-२’ या चित्रपटाने प्रदर्शित झाल्यानंतर सहा दिवसांत जगभरात ५०० कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. नेल्सन दिलीपकुमार यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेला हा चित्रपट २०२६ मधील सर्वाधिक कमाई करणारा तिसरा भारतीय चित्रपट ठरला आहे. यापुढे ‘धुरंधर-२’ आणि ‘दृश्यम-३’ आहेत. चित्रपटाने सहाव्या दिवशी भारतात ४५.५५ कोटी रुपयांची निव्वळ कमाई केली. यासह चित्रपटाची भारतातील एकूण निव्वळ कमाई २८९.०५ कोटी रुपये, तर ग्रॉस कमाई ३३८.४५ कोटी रुपये झाली आहे. त्याचवेळी, विदेशात चित्रपटाने सहाव्या दिवशी १० कोटी रुपये कमावले. त्यामुळे त्याची एकूण ओव्हरसीज ग्रॉस कमाई २०४ कोटी रुपये झाला आहे. चित्रपटाची जगभरातील ग्रॉस कमाई आता ५४२ कोटी रुपयांवर पोहोचली आहे.





### टायगर चित्रीकरणासाठी परतला





**मुंबई :** मुंबईतील जुहूमध्ये कारवर झालेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर अभिनेता टायगर श्रॉफ कामावर परतला आहे. त्याने आगामी चित्रपट ‘लग जा गले’चे चित्रीकरण पुन्हा सुरू केले आहे. हा एक रोमँटिक-ॲक्शन चित्रपट आहे. ज्यामध्ये टायगर पहिल्यांदाच जान्हवी कपूर आणि लक्ष्यसोबत पडदा शेअर करताना दिसणार आहे. घटनेनंतर पोलिसांचा तपास सुरू आहे. दरम्यान, टायगरने आपल्या कामाच्या वचनबद्धतेची पूर्तता करत सेटवर पुनरागमन केले आहे. ‘लग जा गले’ या चित्रपटाची निर्मिती करण जोहर यांच्या धर्मा प्रॉडक्शन्सच्या बॅनरखाली केली जात आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन राज मेहता करत आहेत.

# दिल्लीत कोट्यवधींचे मादकपदार्थ जप्त

**नवी दिल्ली, २३ ऑक्टोबर**

दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी एका महिला प्रवाशाला अटक केली आहे. तिच्यावर बँकॉकहून सुमारे तीन कोटी रुपये किमतीचे मादकपदार्थ तस्करी करून आणल्याचा आरोप आहे, अशी माहिती शुक्रवारी अधिकाऱ्यांनी दिली.

‘हायड्रोपोनिक वीड’ हा गांजाचा एक अत्यंत तीव्र परिणाम करणारा मादकपदार्थ आहे, हा मातीऐवजी पोषक घटकांनी युक्त पाण्यात पिकवला जातो. ही भारतीय महिला १६ ऑक्टोबर रोजी बँकॉकहून विमानतळाच्या टर्मिनल-३ वर आली होती. प्रवाशांच्या प्रोफाइलिंगच्या आधारे, तिला ‘ग्रीन चॅनेल’कडे वळवण्यात आले. तिथे तिची व तिच्या सामानाची एक्स-रेद्वारे तपासणी केली असता, दोन पॉलिथिन पिशव्यांमध्ये २.९९ किलो वजनाचा हिरवा पदार्थ सापडला. प्राथमिक चाचणीत हा पदार्थ गांजा असल्याचे निष्पन्न झाले. जप्त केलेल्या या पदार्थाची किंमत सुमारे २.९९ कोटी रुपये असल्याचे निवेदनात म्हटले आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# मुंबई, दिल्लीसह कर्जतच्या फार्महाऊसवर ईडीचे छापे

## कोट्यवधींचे विदेशी व भारतीय चलन जप्त

**मुंबई, २३ ऑक्टोबर**

अंमलबजावणी संचालयाने (ईडी) मेगा मिलेनियम प्रा. लि. या कंपनीच्या सहापेक्षा जास्त ठिकाणांवर छापेमारी करत कोट्यवधींचे विदेशी आणि भारतीय चलन जप्त केले. हे छापे मुंबई, दिल्लीसह कर्जतमध्ये टाकण्यात आले. या कारवाईत कंपनीची कार्यालये, संचालकांची मुंबई-दिल्लीतील निवासस्थाने आणि कर्जत येथील फार्महाऊसवर झाडाझडती घेण्यात आली.

मनी लॉण्ड्रिंगप्रकरणी मुंबईतील कन्सल्टंट आणि व्यावसायिक हरीश देढिया ईडीच्या रडारवर आहे. हरीश देढिया, त्यांची पत्नी धारा देढिया आणि संबंधित कंपन्यांना दुबईसह सिंगापूरमधील संशयास्पद कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणात विदेशी चलन मिळाल्याचा ईडीला संशय आहे. कर्मचारी आणि डमी व्यक्तींना संचालक बनवून अनेक कंपन्या स्थापन केल्याचा तपास यंत्रणांचा दावा आहे. कंपन्या स्थापन झाल्यानंतर वर्षभरातच त्यांच्या खात्यांत शेकडो कोटी रुपये जमा झाल्याची माहिती समोर आली आहे.

**‘शेल’ कंपन्यांच्या माध्यमातून निधी हस्तांतरित**

‘शेल’ कंपन्यांच्या माध्यमातून निधी वेगवेगळ्या स्तरांवर हस्तांतरित करून लपवण्याचा प्रयत्न झाल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे. दरम्यान, छापेमारीत आतापर्यंत कोट्यवधींचे विदेशी चलन, भारतीय चलन आणि मौल्यवान वस्तू मिळाल्याची माहिती समोर आली असून, अद्याप ईडीकडून पुढील तपास सुरू आहे. त्यामुळे या कारवाईत नेमका काय खुलासा होतो, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

**अवैध बीजांडदान रॅकेटचा भंडाफोड**

अंमलबजावणी संचालनालयाने एका अवैध अंडदान रॅकेटचा भंडाफोड केला आहे. जे आर्थिकदृष्ट्या दुर्बळ महिलांना त्यांच्या बिजांड काढून विविध आयव्हीएफ केंद्रे आणि एआरटी बँकांना पुरवण्यासाठी आमिष दाखवत होते. मनी लॉण्ड्रिंगच्या तपासाचा भाग म्हणून, या प्रकरणात २९ लाख रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.तसेच अनेक बँक लॉकर आणि म्युच्युअल फंडातील गुंतवणूकही गोठवण्यात आली आहे. दरम्यान, १६ ऑक्टोबरला ईडीने ठाणे, बारामती आणि नाशिक जिल्ह्यांमधील अनेक रुग्णालये आणि इन विट्रो फर्टिलायझेशन केंद्रांवर छापे टाकले होते. महिलांची भरती करण्यासाठी आणि त्यांचे बिजांड विविध वैद्यकीय संस्थांना पोहोचवण्यासाठी एजंटांचे एक संघटित जाळे कार्यरत होते. ◂ (वृत्तसंस्था)

# ‘चम्पी’मुळे तैवानमध्ये हाहाकार

**तैपेई, २३ ऑक्टोबर**

चम्पी चक्रीवादळाच्या आगमनाच्या पृष्ठभूमीवर तैवानमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. ताशी १७० किलोमीटर वेगाच्या वाऱ्याच्या शक्यतेमुळे शाळा आणि कार्यालये बंद ठेवण्याचा आदेश देण्यात आला आहे. तसेच शेकडो विमान उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. हे चक्रीवादळ तैवानच्या अगदी जवळ आले आहे. वादळ आणि मुसळधार पावसासह धोकादायक हवामानामुळे प्रशासन खबरदारीचे उपाय योजत आहे.

स्थानिक प्रशासनानुसार, ग्रेटर तैपेई, कीलुंग आणि ताओयुआनसह अनेक भागांमध्ये शुक्रवारी शाळा आणि कार्यालये बंद ठेवण्यात आली आहेत. दक्षिण तैवानमध्ये युनलिन, चियायी, तैनान, काओशुंग आणि पिंगटुंग येथेही शाळा बंद आहेत. पूर्व तैवान आणि यिलान, हुआलिएन, पेंघु आणि लियानचियांगसह त्याची बाहेरील बेटे देखील बंद घोषित करण्यात आली आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून बाजारपेठाही बंद ठेवण्यात आल्या आहेत. ◂ (वृत्तसंस्था)

# कृष्णा-गोदावरीच्या पाण्यात सापडला नैसर्गिक वायू

**नवी दिल्ली, २३ ऑक्टोबर**

कृष्णा-गोदावरी खोऱ्यातील उथळ पाण्यातील एका ब्लॉकमध्ये नैसर्गिक वायूचा शोध लागल्याचे ‘ऑइल इंडिया लिमिटेड’ने शुक्रवारी सांगितले. हा ब्लॉक कंपनीने अलिकडील ‘डिस्कव्हर्ड स्मॉल फील्ड’ लिलाव प्रक्रियेद्वारे मिळवला होता.

भारताच्या पूर्व किनारपट्टीवरील कृष्णा-गोदावरी खोऱ्यात, यापूर्वी कधीही न तपासलेल्या ‘मत्स्यपुरी’ फॉर्मेशनमध्ये हा शोध लागला, असे कंपनीने एका निवेदनात म्हटले आहे. चाचणीदरम्यान येथून दररोज जास्तीत जास्त दोन लाख स्टँडर्ड क्युबिक मीटर वायूचा प्रवाह नोंदवला गेला. ‘ऑइल इंडिया’च्या माहितीनुसार, हा शोध ‘केजी-डीएसएफ/जीएसकेडब्ल्यू/२०१८’ या उथळ पाण्यातील ऑफशोअर ब्लॉकमधील ‘गोदावरी-१’ या विहिरीत लागला आहे. येथे २,०२४ ते २,०२७ मीटर खोलीवर



असलेल्या हायड्रोकार्बनयुक्त क्षेत्राची चाचणी १६ ऑक्टोबर रोजी सुरू झाली होती.

या विहिरीतून सुमारे एक लाख स्टँडर्ड क्युबिक मीटर वायूचा प्रवाह मिळाला असून, सलग चाचणीदरम्यान तो जास्तीत जास्त दोन लाख स्टँडर्ड क्युबिक मीटरपर्यंत पोहोचला होता. याव्यतिरिक्त, कंपनीला दररोज सुमारे १७० बॅरल ‘कंडेन्सेट’ (द्रव हायड्रोकार्बन) देखील मिळाल्याचे नोंदवले आहे. आता पुढील वरच्या थराची (झोनची) चाचणी घेण्याची तयारी सुरू आहे. मात्र, या शोधामुळे नेमका किती साठा उपलब्ध असू शकतो, याचा कोणताही अंदाज कंपनीने दिलेला नाही. हा शोध कृष्णा-गोदावरी खोऱ्यातील शोधमोहिमेला अधिक बळकटी देणारा आहे; हे खोरे भारतातील प्रमुख ऑफशोअर हायड्रोकार्बन उत्पादक क्षेत्रांपैकी एक आहे.

देशांतर्गत वायू पुरवठा वाढवण्याच्या प्रयत्नांमध्ये या खोऱ्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली असून, अलीकडच्या काळात देशातील उत्पादनातील वाढीमध्ये येथील खोल पाण्यातील प्रकल्पांचा मोठा वाटा आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### ऊर्जा मिश्रणात वायूचा वाटा १५ टक्क्यांपर्यंत वाढवणार

सध्या भारत आपल्या नैसर्गिक वायूच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून आहे, अशा परिस्थितीत हा नवीन शोध देशांतर्गत वायूचा एक अतिरिक्त स्रोत ठरू शकतो. भारत सरकारने २०३० पर्यंत देशाच्या एकूण ऊर्जा मिश्रणात नैसर्गिक वायूचा वाटा सध्याच्या सुमारे सहा टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यामुळे, देशांतर्गत संसाधनांचा विकास करणे हे सरकारच्या ऊर्जा धोरणाचा एक महत्त्वाचा भाग झाला आहे.

# पश्चिम बंगालच्या किनारपट्टीवर पावसाची शक्यता

**कोलकाता, २३ ऑक्टोबर**

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले कमी दाबाचे क्षेत्र चक्रीवादळात रूपांतरित होण्याची शक्यता आहे. यामुळे २८ ऑक्टोबरपासून पश्चिम बंगालच्या किनारपट्टीवरील व पश्चिम भागातील जिल्ह्यांत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे,या हवामान प्रणालीमुळे राज्यातील दक्षिण भागातील दिवसाच्या तापमानात दोन ते तीन अंशांची घट होण्याची शक्यता आहे, अशी माहिती हवामान विभागाने शुक्रवारी दिली. दक्षिण बंगालच्या उपसागरातील कमी दाबाचे क्षेत्र २६ ऑक्टोबरपर्यंत चक्रीवादळात रूपांतरित होऊ शकते आणि ते पश्चिम-वायव्य दिशेने सरकत उत्तर आंध्रप्रदेश-दक्षिण ओडिशा किनारपट्टीच्या दिशेने जाण्याची शक्यता आहे. २८ ऑक्टोबरपासून दक्षिण बंगालमधील सर्व जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह वादळी वारे वाहतील. ◂ (वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख

# 'फॉक्स'च्या अहवालातील इशारा

गेल्या काही वर्षांत जग खूप जवळ आले आहे. जवळ येण्याचा अर्थ दोन देशांतील भौगोलिक अंतर कमी झाले असा घ्यायचा नसतो. अत्याधुनिक संपर्क व्यवस्था, तंत्रज्ञानाने तसेच दळणवळणाच्या साधनांनी जगाला जवळ आणले आहे, असा त्याचा अर्थ होतो. 'कर लो दुनिया मुठ्ठी में' अशी एका मोबाईल कंपनीची जाहिरात होती. आता जवळपास तसेच झाले आहे. एका देशातील पर्यावरण आणि हवामानाचा दुसऱ्या देशावर सहज परिणाम होतो. कधी हा परिणाम अनुकूल असतो तर कधी प्रतिकूल, पण काही ना काही परिणाम होतोच. एका देशात वादळी पाऊस आला तर दुसऱ्या देशात गारवा निर्माण होतो, एका देशात बर्फवृष्टी झाली की दुसऱ्या देशात थंडी पडते. आता तर एका देशात आंदोलन सुरू झाले की त्याची धग शेजारील देशांतही पोहोचते. या संदर्भात युरोपचे ताजे उदाहरण आपल्यासमोर आहे. अशा आंदोलनांचे जे लोण इतर देशांत पोहोचते, त्यात काही न काही कार्यकारणभाव असतो. एका आंदोलनाचा थेट दुसऱ्या आंदोलनाशी संबंध नसला तरी त्यात काही अदृश्य धागेदोरे असतात. फ्रान्समध्ये सुरू असलेल्या आंदोलनाचा भारतात सुरू असलेल्या तरुणांच्या आंदोलनाशी संबंध आहे, असे म्हटले तर त्यावर सहजासहजी कोणाचा विश्वास बसणार नाही. पण ही वस्तुस्थिती असल्याचे आता उघड झाले आहे.

अलिकडेच झालेल्या फ्रान्समधील आंदोलनाला हिंसाचाराचे गालबोट लागले. भारतातील आंदोलनातही सुरुवातीला हिंसाचार झाला होता, पण सुदैवाने सरकारच्या सतर्कतेने आणि तातडीने केलेल्या उपाययोजनांमुळे तो लगेच आटोक्यात आला. त्याचे लोण देशाच्या अन्य भागांत पोहोचले नाही. फ्रान्समध्ये तसे झाले नाही. तेथील हिंसाचाराचा वणवा देशभर पसरला आणि तो तेथील सरकारला अजूनही पूर्णपणे आटोक्यात आणता आला नाही. अशात हा अहवाल आला आहे आणि फ्रान्समध्ये हिंसक रूप घेतलेले तरुणांचे आंदोलन आणि भारतातील तरुणांचे आंदोलन याचा संबंध आहे, असे त्यात सांगितलेले आहे. देशात कुठेही अशांतता निर्माण झाली तर त्यात बाह्य शक्तींचा हात असल्याचा आरोप केला जात होता. हा आरोप निराधार आणि नाहक केलेला नसायचा तर त्यात काही तरी तथ्य असायचे, याची ताज्या घटनाक्रमाने खात्री पटू लागली आहे आणि या अहवालाने त्यावर शिक्कामोर्तब केले आहे.

भारत आणि फ्रान्समध्ये, विशेषतः युरोपातील काही देशांत सुरू असलेल्या आंदोलनांमागे, ९ देशांतील शंभरावर इस्लामी आणि साम्यवादी संघटना असल्याचा खळबळजनक दावा अमेरिकेतील फॉक्स न्यूज डिजिटल इन्व्हेस्टिगेशनच्या अहवालातून करण्यात आला आहे. या अहवालाकडे कुणालाही दुर्लक्ष करता येणार नाही. ज्या देशात शांतता आहे, जे देश प्रगतिपथावर आहेत, ज्यांची आर्थिक प्रगती वेगाने होत आहे, तेथे असंतोष निर्माण करणे हे काही विघ्नसंतोषी वृत्तीच्या लोकांचे काम असते. अशी वृत्ती अनेक संघटनांत आणि काही वेळेला देशांमध्येही असते. उदाहरणार्थ पाकिस्तानला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात झालेली भारताची प्रगती सहन होत नाही. त्यामुळे कोणत्या तरी मार्गाने भारतात अस्थिरता निर्माण करण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न असतो. भारतात घातपाती आणि दहशतवादी कारवायाही घडवून आणायला पाकिस्तान मागेपुढे पाहत नाही, हे आतापर्यंत अनेकवेळा सिद्ध झाले आहे. सोबतीला आणखी काही शेजारी या ना त्या प्रकारे असतात, हेही आपण पाहिले आहे. गेल्या काही वर्षांत सर्वत्र तरुण पिढीत असंतोष वाढत आहे. त्याला भारत अपवाद नाही. या असंतोषाचा फायदा उचलत अस्थिरता निर्माण करण्याचे षडयंत्र सुरू असल्याचे फ्रान्समध्ये आणि नंतर युरोपातील काही देशांत दिसले. फ्रान्सशिवाय, स्पेन, इटली, पोर्तुगाल आणि अल्बानिया आदी देश हिंसाचाराच्या लाटेत होरपळून निघत आहेत. युरोपातील अनेक देशांतील हिंसक दंगलींचा समन्वय, संघटन आणि विस्तार करण्याचे म्हणजे त्याला खतपाणी घालण्याचे काम तिकडच्या शंभरावर इस्लामी संघटना तसेच साम्यवादी संघटना करत असल्याचा अहवाल या पृष्ठभूमीवर धक्कादायक ठरतो. भारतातील घटनाक्रमाशी या कारस्थानाचा संबंध आहे. इंडियन अलायन्स पॅरिस (आयएपी) ही फ्रान्समधील संघटना फ्रान्स आणि भारतातील देशविघातक चळवळींना एका सूत्रात जोडण्याचे काम करीत असून, मॅनहॅटनमधील पीपल्स फोरम ही संघटना या कामात हातभार लावत असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. कोणत्याही गोष्टीला पैसा लागत असतो. फ्रान्स तसेच युरोपातील देशातील हिंसाचार घडवणाऱ्या असामाजिक संघटनांना शांघायमधील अमेरिकी वंशाचे उद्योगपती नेव्हिल रॉय सिंघम हे वित्तपुरवठा करत असल्याचा आरोपही या अहवालातून करण्यात आला आहे. याच संदर्भात पॅरिसमधील भारतीय वंशाचे जॉय बॅनर्जी यांचे नावही या अहवालात असून, त्यांच्यावर ठपका ठेवण्यात आला आहे. फ्रान्स तसेच युरोपातील काही देशांत जशी परिस्थिती आहे, तशी परिस्थिती सुदैवाने भारतात निर्माण झालेली नाही. फ्रान्स आणि युरोपातील अन्य देशांत तेथील सरकारविरोधात जेवढा असंतोष आहे, त्या तुलनेत भारतातील असंतोषाचे प्रमाण मर्यादित आहे. सरकार कुणाचेही असले तरी जनतेत राजी-नाराजी असतेच. तशी ती भारतातही थोडीफार असणारच. पण, आगडोंब उसळावा, अशी स्थिती भारतात नाही हे नक्की. फ्रान्स आणि युरोपातील देशातील खालावलेली शिक्षणव्यवस्था, रोजगाराच्या संधीत होत असलेली घट, महागाई तसेच ढासळती अर्थव्यवस्था या कारणांमुळे सर्वसामान्य माणसाचे जगणे कठीण झाले आहे. वाढते कर्ज आणि त्यावरील व्याजामुळे या देशात कल्याणकारी योजनांवरील खर्चात सातत्याने कपात होत आहे. या परिस्थितीचा फायदा इस्लामी आणि साम्यवादी संघटनांनी घेतला नसता तरच नवल होते. दुर्दैवाने राष्ट्रहिताच्या दृष्टीने या आंदोलनांकडे पाहणे अद्याप भारतातील सरकारच्या विरोधकांना जमले नाही. त्यामुळे इस्लामी तसेच साम्यवादी संघटनांच्या घातक मनसुब्यांना आपल्या देशातील विरोधी पक्ष अप्रत्यक्षरीत्या खतपाणी घालत आहेत, असे म्हटले तर वावगे ठरू नये. काँग्रेसच्या नेतृत्वातील इंडिया आघाडी, डाव्या संघटना तसेच कॉक्रोच जनता पार्टीसारखी संघटना विदेशी शक्तींचे हस्तक झाल्यासारखे वागत आहेत, ही चिंताजनक बाब म्हटली पाहिजे. वास्तवात फ्रान्स आणि युरोपातील हिंसाचारग्रस्त देशांतील राजवटी तसेच भारतातील मोदी सरकार यांच्यात कार्यक्षमता, गुणवत्ता आणि लोकप्रियतेच्या बाबतीत जमीन-अस्मानचा फरक आहे. मोदी सरकारने गेल्या बारा वर्षांत लोककल्याणाच्या जेवढ्या योजना राबवल्या, त्यांची बरोबरी युरोपातील हे सारे देश मिळूनही करू शकत नाही. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांसोबत शिक्षण आणि आरोग्यसेवा यांतही मोदी सरकारने दिलासादायक कामगिरी केली आहे. तरीही मोदी सरकारविरुद्ध जनतेत प्रचंड असंतोष आहे, असे वातावरण निर्माण करण्याचा काही शक्तींचा प्रयत्न आहे. त्याला अद्याप यश आलेले नाही आणि येणारही नाही. देशात दंगली घडवण्याचा, अस्थिरता निर्माण करण्याचा शंभरावर इस्लामी तसेच साम्यवादी संघटनाचा प्रयत्न फ्रान्स आणि युरोपातील काही देशांत यशस्वी होताना दिसत असला तरी भारतात तो कदापि यशस्वी होऊ शकणार नाही. कारण भारतीय जनतेचे पहिले प्रेम मातृभूमीवर आहे. या मातीशी ही जनता कधीच विश्वासघात करू शकत नाही. वेळप्रसंगी भारतीय जनता एकवेळ अर्धपोटी राहील, फाटक्या कपड्यात वावरेल, पण देशाची एकता आणि अखंडता कदापि धोक्यात येऊ देणार नाही. त्यामुळेच भारताकडे वाकडी नजर करण्याची आतापर्यंत कोणाची हिंमत झाली नाही. कोणी तशी हिंमत केली तर त्याला धडा शिकवण्याची हिंमत भारतीयांमध्ये आहे. पण, राष्ट्रप्रेमाला सावधगिरीची साथ आवश्यक असते, हेही लक्षात ठेवले पाहिजे. देशाचे शत्रू ओळखण्यात चूक होता कामा नये! ■

## प्रासंगिक

**शिवराज सिंह चौहान**

# भारताची कृषिगाथा : परिवर्तनाचे दशक

माननीय पंतप्रधानांनी २०१४ साली ज्यावेळी कार्यभार स्वीकारला, त्यावेळी कृषी आणि शेतकरी कल्याणाला भारताच्या विकासाच्या अजेंड्याच्या केंद्रस्थानी ठेवण्यात आले. २०१५ पासून, यासाठीची कटिबद्धता सातत्याने आणि अधिकाधिक जोरकसपणे प्रत्यक्ष कृतीतून व्यक्त होऊ लागली, मग त्यात उत्पादन आणि कृषी उत्पन्न वाढवण्यापर्यंतचे व्यापक परिवर्तन असो किंवा मग कृषी क्षेत्राला अधिक उत्पादनक्षम, टिकून राहणारे, तंत्रज्ञान-प्रणीत आणि शाश्वत बनवण्यासाठीचे प्रयत्न असोत, यांचा समावेश होता. पंतप्रधानांनी सातत्याने, एका गोष्टीवर भर दिला आहे, तो म्हणजे, "विकसित भारतासाठी, कृषी क्षेत्राचा विकास अनिवार्य आहे." त्याशिवाय, भारताने केवळ, आपल्या अन्नाच्या गरजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होणे पुरेसे नाही, तर, जगाचा अन्नधान्य पुरवठादार म्हणूनही भारताने पुढे यायला हवे, असे आवाहन त्यांनी केले आहे. लालबहादूर शास्त्री यांच्या 'जय जवान, जय किसान' या घोषणेत अटलबिहारी वाजपेयी यांनी घातलेली 'जय विज्ञान'ची भर, त्याला पंतप्रधानांनी देशाला, 'जय अनुसंधान' अशी आणखी एक जोड दिली. या घोषणेसोबतच, त्यांनी संशोधन आणि नवोन्मेष याला भारताच्या कृषी क्षेत्राच्या भविष्याच्या केंद्रस्थानी ठेवले.

अन्न सुरक्षा ते कृषी क्षेत्रातील आमूलाग्र परिवर्तनापर्यंत : या दूरदृष्टीमागे, आपण कृषी क्षेत्राकडे कशाप्रकारे बघायला हवे, यासाठीचे एक निर्णायक परिवर्तन होते. हरितक्रांतीने भारताला अन्नसुरक्षा दिली. आज मात्र आपली जबाबदारी पोषण सुरक्षा, शेतकऱ्यांची समृद्धी, संसाधन सुरक्षा आणि जागतिक स्पर्धात्मकता या सगळ्यांचा भक्कम पाया तयार करणे ही आहे. भारताच्या कृषिक्षेत्राचा प्रवास ही एक अत्यंत लक्षणीय अशी उपलब्धी आहे. एकेकाळी अन्नधान्यासाठी आयातीवर अवलंबून असणारा भारत, केवळ काही दशकांत, मूलभूत आहाराच्या डाळींच्या उत्पादनात स्वयंपूर्ण ठरला. हरितक्रांतीला, विज्ञान, उत्तम दर्जाची सुधारित बियाणे, सिंचन, पायाभूत सुविधा, संस्थात्मक पतपुरवठा व्यवस्था, विस्तार आणि धोरणात्मक पाठबळ, अशा सर्व घटकांचे पाठबळ मिळाले.

### व्यापक कृषी विकासाचे दशक

आणि म्हणूनच, २०१५ पासून सुरू असलेले कृषी क्षेत्रातील हे परिवर्तन लक्षणीय आहे. भारतीय कृषी क्षेत्राच्या इतिहासात, वर्ष १९९५-९६ आणि वर्ष २०१४-१५ ही संरचनात्मक बदलाची वर्षे समजली जातात. कारण, कृषी क्षेत्राच्या उन्नतीत, हा काळ अत्यंत महत्त्वाचा टप्पा समजला जातो. पहिल्या टप्प्यावर आर्थिक उदारीकरण, बाजारपेठांचे अधिकाधिक एकत्रीकरण, उपभोगाच्या बदलत्या पद्धती आणि डाळींच्या उत्पादन वाढीत आलेली मंदी, अशा सगळ्या घटकांचे प्रतिबिंब आढळते. तर, दुसरा टप्पा, अधिक वैविध्य असलेला, तंत्रज्ञानयुक्त, बदलत्या परिस्थितीत तग धरू शकेल, अशी कृषी सिंचन विस्तारित कृषी पद्धती, डिजिटल प्लॅटफॉर्म, बाजारपेठेत सुधारणा आणि शाश्वतता तसेच हवामान बदलाच्या परिस्थितीशी जुळवून घेणारी कृषी व्यवस्था विकसित करण्यावर सातत्याने दिलेला भर, अशी सगळी वैशिष्ट्ये असलेला म्हणता येईल.

भारत सरकारने या परिवर्तनासाठी आवश्यक असलेली महत्त्वपूर्ण यंत्रणा यापूर्वीच उभी केली आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाण्याच्या कार्यक्षम वापराला प्रोत्साहन देत आहे. मृदा आरोग्य पत्रिका उपक्रमामुळे माती परीक्षण आणि संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापनाला शेतीविषयक निर्णयप्रक्रियेत केंद्रस्थानी स्थान मिळाले आहे. प्रधानमंत्री किसान ऊर्जा



सुरक्षा आणि उत्थान महाभियान (पीएम-कुसुम) योजनेद्वारे शेतीचा संबंध अक्षय ऊर्जेशी जोडला जात आहे. शेतकरी उत्पादक संस्था (एफपीओ) शेतमालाचे एकत्रीकरण आणि शेतकऱ्यांची व्यावहारिक आणि सौदा करण्याची क्षमता सक्षम करत आहेत. ई-नामच्या माध्यमातून कृषी बाजारपेठा डिजिटल स्वरूपात जोडल्या जात आहेत, तर कृषी पायाभूत सुविधा निधी, प्रधानमंत्री किसान संपदा योजना आणि प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना संघटित स्वरूप देण्याची योजना (पीएमएफएमई) या सगळ्याद्वारे पीक काढणीनंतरच्या पायाभूत सुविधा आणि कृषी प्रक्रिया क्षेत्राला बळकटी दिली जात आहे.

या परिवर्तनात तंत्रज्ञानाची भूमिका मध्यवर्ती असेल. भारतीय कृषी संशोधनाने केवळ उत्पादनवाढीचे पारंपरिक उद्दिष्ट ओलांडून प्रगती केली आहे. २०१४ ते २०२५ या कालावधीत पिकांच्या ३,२३६ नवीन जाती विकसित करून प्रसारित करण्यात आल्या, तर २००३ ते २०२४ या कालावधीत ही संख्या १५,४० इतकी होती.

### प्रयोगशाळेपासून ते शेवटच्या घटकापर्यंत

आज संशोधन आणि विस्ताराची भूमिका, आधीपेक्षाही अधिकाधिक महत्त्वाची ठरली आहे. कृषी संशोधनात गुंतवलेला प्रत्येक रुपया अत्यंत भरीव असे वित्तीय परतावे देतो, तर विस्तारामुळे, वैज्ञानिक ज्ञानाचे रूपांतर शेतीमध्ये प्रत्यक्ष सुधारणा करण्यात झाले आहे. आपण आपल्या प्रयोगशाळा, कृषी विज्ञान केंद्रे, स्टार्ट अप्स, खाजगी नवोन्मेषक आणि शेतकरी यांच्यातील संबंध अधिक दृढ करणे आवश्यक आहे. त्याचवेळी, आपण संसाधनांच्या आव्हानांचाही सामना करायला हवा. भारत कायमच, पाणी, खते, ऊर्जा आणि भूमी यांच्या वापरायचा विस्तार करून आपले कृषी उत्पादन वाढवू शकत नाही. भूजल पातळी खाली जाणे, जमिनीची धूप, हवामानात होणारे बदल आणि त्यामुळे होणाऱ्या प्रतिकूल घटना, या सगळ्यांचा विचार करता, उत्पादनाच्या पद्धतीत आमूलाग्र बदल करणे ही काळाची गरज आहे.

पाण्याचा, अन्नद्रव्यांचा आणि ऊर्जेचा प्रत्येक घटक कार्यक्षमतेने वापरण्यास प्रोत्साहन देणारी धोरणे आपण आखली पाहिजेत. हवामान बदलांना तोंड देऊ शकणाऱ्या पिकांच्या जाती, पाणी आणि अन्नद्रव्यांचा कार्यक्षम वापर करणारी पिके, मातीतील जैविक घटकांमध्ये सुधारणा, एकात्मिक कीड व्यवस्थापन, संवर्धनात्मक शेती आणि अचूक शेती पद्धती यांना संशोधनात प्राधान्य दिले पाहिजे. डाळी आणि तेलबिया पिकांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे, कारण या पिकांची उत्पादकता वाढवणे हे भारताचे पोषणविषयक आणि आर्थिक स्वावलंबन अधिक बळकट करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

### प्रभावी बाजारपेठा आणि जागतिक मूल्य साखळी

एक शेतकरी, जेव्हा अत्यंत कार्यक्षमतेने पिकांचे उत्पादन घेतो, तो आपला माल लोकांना, नफा कमवून विकणेही त्याला शक्य व्हायला हवे. कृषी बाजारपेठा, साठवणूक, शीतसाखळी, रसद व्यवस्था, प्रतवारी, प्रक्रिया उद्योग आणि डिजिटल मंच यांचा विकासही कृषी उत्पादनवाढीच्या बरोबरीने झाला पाहिजे. कृषी उत्पादनात झालेली वाढ आणि नाशवंत शेतमालाच्या उत्पादनातील विविधीकरण यांमुळे शेतमालाचे कार्यक्षम एकत्रीकरण आणि बाजारपेठांशी सुलभ जोडणी यांची गरज वाढली आहे.

भारतात, जागतिक पातळीवर गुणवत्तेसाठी, मागोवा घेणे, सुरक्षितता आणि ब्रँडिंग अशा सगळ्यासाठी नावाजली जातील, अशी कृषी उत्पादने विकसित करणे, ही आपली महत्त्वाकांक्षा असायला हवी. त्यामुळे पुढचा टप्पा, शेतकऱ्यांना केवळ देशांतर्गत ग्राहकांशी जोडणे हा नाही, तर कृषी मूल्य साखळीशी जोडणे, हा असायला हवा. यातून, रोजगारनिर्मिती होईल, ग्रामीण उद्यमशीलतेला प्रोत्साहन मिळेल आणि कृषीतून निर्माण झालेल्या मूल्याचा मोठा वाटा, ग्रामीण भारतात राहील. मात्र हे परिवर्तन, केवळ केंद्र सरकार एकट्याने घडवू शकत नाही. कृषी क्षेत्र ही सामाईक जबाबदारी आहे. राज्य सरकार, स्थानिक प्रशासन, संशोधन संस्था, कृषी उत्पादक संघटना, सहकारी संघटना, खाजगी उद्योगक्षेत्र, वित्तीय संस्था आणि नागरी समाज अशा सर्वांनी एकत्रित काम करायला हवे.

'विकसित कृषी' ते 'विकसित भारत' हा प्रवास केवळ किती टन उत्पादन झाले, यावरून मोजला जाणार नाही, तर आपल्या शेतकऱ्यांच्या जीवनमानात किती सुधारणा झाली, यावरून त्याचे मूल्यमापन केले जाईल. 'आपण किती उत्पादन करू शकतो?' या प्रश्नापलीकडे जाऊन 'आपण किती कार्यक्षमतेने, शाश्वत पद्धतीने आणि फायदेशीररीत्या उत्पादन करू शकतो?' या प्रश्नाकडे आत्मविश्वासाने वाटचाल करण्याची गरज आहे.

हरितक्रांतीने भारताच्या अन्नसुरक्षेचा पाया भक्कम केला. आता पुढील कृषी परिवर्तनाने भारताची समृद्धी, पोषणसुरक्षा, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन आणि जागतिक नेतृत्व सुनिश्चित केले पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला स्पष्ट दिशा दिली आहे : भारतीय कृषी क्षेत्र हे विकसित भारताचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ बनले पाहिजे. विज्ञान, नवोन्मेष, पायाभूत सुविधा, बाजारपेठा आणि संस्था यांच्या माध्यमातून या दृष्टिकोनाचे प्रत्यक्ष कृतीत रूपांतर करणे हे आपले कर्तव्य आहे. आणि या सर्व प्रक्रियेत भारतीय शेतकऱ्याला प्रत्येक कृषी धोरणाच्या केंद्रस्थानी ठेवणे सर्वांत महत्त्वाचे आहे.

(लेखक, भारत सरकारचे कृषी, शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकास मंत्री आहेत. लेखात व्यक्त केलेली मते त्यांची वैयक्तिक मते आहेत.) ■

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# देश सुरक्षित राहणे गरजेचे

आज जगाकडे पाहिले की एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की शांतता ही आता गृहीत धरता येणारी गोष्ट राहिलेली नाही. "रशिया-युक्रेन युद्ध, पश्चिम आशियातील संघर्ष, फ्रान्सचा प्रश्न, सुदानमधील गृहयुद्ध, पूर्व काँगोतील सशस्त्र हिंसा आणि साहेल प्रदेशातील दहशतवादामुळे जागतिक अस्थिरता वाढली आहे." ग्लोबल पीस इंडेक्सच्या २०२५ अहवालानुसार जगात ५९ सक्रिय राज्याधारित संघर्ष सुरू होते आणि २०२४ मध्ये संघर्षांमुळे झालेल्या मृत्यूंची संख्या १.५२ लाखांवर पोहोचली होती. जगभरातले हे असे दूषित वातावरण पाहिले की आपल्याला प्रश्न पडतो की इतक्या मोठ्या, विविधतेने नटलेल्या आणि प्रांत व सीमांनी वेढलेल्या देशात तुलनेने स्थैर्य कसे टिकून आहे?

२०१४ नंतर केंद्र सरकारने दहशतवाद, सीमापार घुसखोरी, नक्षलवाद आणि अंतर्गत हिंसा याकडे कठोर दृष्टिकोनातून पाहिले आहे. सुरक्षा, गुप्तचर यंत्रणा आणि राजनैतिक दबाव यांचा व्यवस्थित वापर केला आहे. सरकारी आकडेवारीनुसार २००४-१४ या दशकातील ७,२१७ दहशतवादी घटनांच्या तुलनेत २०१४-२४ या काळात २,२४२ घटना घडल्या आहेत. यामध्ये नक्षलवादाचे उदाहरण अधिक बोलके आहे. नक्षलवाद संपवणे म्हणजे बंदूकधारी नक्षलींना ठार मारणे इतका साधा हा प्रश्न नाही. उलट दुर्गम भागातील प्रशासनाचा अभाव, जनतेमध्ये पसरलेली भीती, सरकारी यंत्रणेविरुद्ध प्रचार आणि विकासाच्या अभावावर उभा राहिलेला सशस्त्र दहशतवाद असा खूपच व्यापक प्रश्न होता. त्यामुळे या प्रश्नाला वेगळ्या पद्धतीने हाताळण्याची गरज होती व मोदी सरकार यात यशस्वी झाले आहे. २०१० मध्ये नक्षली हिंसेच्या १,९३६ घटना घडल्या आणि १,००५ नागरिक व सुरक्षाकर्मी मृत्युमुखी पडले. २०२४ मध्ये ३७४ घटना आणि १५० मृत्यू झाले, असे केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अहवालात नमूद आहे. पुढे २०१५ च्या राष्ट्रीय धोरणात सुरक्षा कारवाईसोबत रस्ते, मोबाईल नेटवर्क, बँकिंग, शाळा आणि आरोग्यसेवा यावर भर देण्यात आला. म्हणजे बंदुकीला बंदुकीने उत्तर देतानाच नागरिकांना शासनाच्या मदतीचा हातही मिळाला.

आता शहरी नक्षलवादाकडे वळूया. हे खरंय की सरकारला प्रश्न विचारणाऱ्यांना शहरी नक्षल असं लेबल लावता येत नाही. त्याचबरोबर सरकारच्या कामाने संतुष्ट झालेल्या लोकांना अंधभक्तही म्हणता येत नाही. मात्र लोकशाहीच्या नावाखाली हिंसेचे समर्थन करणे, फुटीरतावादी किंवा माओवादी अजेंडा पुढे रेटणे, खोट्या माहितीच्या आधारावर समाजात द्वेष पसरवणे आणि परकीय हिंसक नेटवर्कशी संबंध ठेवणे; हे गंभीर प्रश्न आहेत. अशा प्रवृत्तींना कायद्याचा धाक असणे आवश्यक आहे. अर्थात तपास यंत्रणा आणि पोलिसांनी कर्तव्य पार पाडल्यानंतर खरी परीक्षा न्यायालयात असते. अजमल कसाबने लोकांची हत्या केली हे सर्व जगाने पाहिले. पण त्याला फासावर लटकवायला ४ वर्षे लागली. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रिया ही पूर्णपणे वेगळी असते हे आपण समजून घेतले पाहिजे. असो!

२०१४ नंतर देशात सीएएविरोधी आंदोलन, शाहीन बाग, शेतकरी आंदोलन, अग्निपथविरोधी आंदोलन आणि अलिकडील कॉक्रोच जनता पार्टीसारखी चळवळ दिसली. आता कॉक्रोच्या माध्यमातून सतत आंदोलनांचे आयोजन करण्यात येत आहे. क्षुल्लक कारणावरून इतकी आंदोलने देशात घडत राहिली तर देश प्रगतिपथावर कसा जाणार? नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका हे आपल्या शेजारील उदाहरण आहे. जगभरातल्या अनेक देशांत तर प्रचंड अस्वस्थता आहे. शांततेत आंदोलन करण्याचा नागरिकांचा अधिकार मान्य केला, तरी आंदोलनासाठी कायदेशीर नियम, सार्वजनिक सुव्यवस्था आणि पोलिसांच्या परवानगीसंबंधीच्या अटींचे पालन करणे आवश्यक आहे. दिल्ली पोलिसांनी १२ ऑक्टोबर रोजी जंतरमंतरला अधिसूचित आंदोलनस्थळाच्या यादीतून वगळल्याचे सांगितले. त्याऐवजी रामलीला मैदान, बुराडी मैदान आणि पूर्व दिल्लीतील सीबीडी मैदान ही तीन पर्यायी ठिकाणे निश्चित करण्यात आली. या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. पुन्हा ही न्यायालयीन प्रक्रिया झाली. पण सामान्य जनतेच्या नजरेतून तार्किकदृष्ट्या पाहायला गेले, तर आंदोलनात कोणतीही असंवैधानिक गोष्ट घडू नये, ही आंदोलनकर्त्यांचीच जबाबदारी असायला हवी. ''हर घर और हर गली बनेगी जंतर-मंतर'' हा प्रकार म्हणजे देश पेटवण्याचे उघड कारस्थान आहे. इथे गुजरात दंगलीचा मुद्दा निघाला की राजकारण तापतं. नरेंद्र मोदींनी त्यावेळेस राजधर्माचे पालन केले आणि गुजरातच्या जनतेचे सरक्षण केले.

इतिहासाकडे डोकावून पाहिले तर १९६७ चे नक्षलबारी उदाहरण लक्षात घ्यायला हवे. सुरुवातीला ते भूमिहीन शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर उभे राहिलेले आंदोलन होते; पण पुढे सशस्त्र क्रांतीच्या विचारधारेने त्याला हिंसक वळण दिले गेले. प्रश्न न्याय्य असला तरी पद्धत हिंसक झाली की समाज जळतो. आणि नंतर तो समाज पुन्हा उभा राहू शकत नाही किंवा त्यास अनेक वर्षे खर्च करावी लागतात. आंदोलनादरम्यान सरकारला दुहेरी भूमिका निभवावी लागते. एकतर आंदोलनकर्त्यांचे म्हणणे न्याय्य असेल ते ऐकून घेणे आणि आंदोलन हिंसक झाले तर ते परिस्थितिजन्य अशा लोकशाही मार्गाने शमवणे. मोदी सरकारच्या काळात भारताने ही दोन टोकं जोडण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र काही ठिकाणी सरकारला माघार घ्यावी लागली आहे. हा राजकारणाचा आणि सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा मुद्दा असू शकतो. सीमापार दहशतवादाला प्रत्युत्तर, नक्षलग्रस्त भागात सुरक्षा आणि विकास किंवा आणखी काही प्रकरणांची हाताळणी असेल, या सगळ्यामध्ये भारत अनेक युद्धग्रस्त देशांच्या तुलनेत अधिक सुरक्षित आणि कार्यक्षम दिसतो. लक्षात घ्या, देश सुरक्षित ठेवणे म्हणजे विरोधकांना गप्प करणे असा त्याचा अर्थ होत नाही; तर विरोधालाही संविधानाच्या चौकटीत सुरक्षित ठेवणे गरजेचे आहे! तरच लोकशाही टिकून राहते आणि या कसोटीवर भारताने गेल्या दशकात जगातील अनेक अस्थिर देशांपेक्षा निश्चितच चांगली कामगिरी केली आहे. मात्र आंदोलनकर्ते आणि अराजकतावादी यांच्यामुळे सामान्य नागरिकांना होणारा त्रास पाहिल्यास शासनाला थोडसे कठोर होणे गरजेचे आहे. प्रक्रियेमध्ये अजून थोडा बदल करणे गरजेचे आहे. ''थोडा है थोडे की जरुरत है!'' असे असले तरी आपण सुरक्षित आहोत. थोडक्यात सांगायचे झालं तर, ''मोदी है तो सेफ है'' असे म्हटल्यावर लोक तुम्हाला अंधभक्त वगैरे म्हणतील. पण ''बोलने दे, तकलीफ हुआ हैं बिचारे को'' असे म्हणत त्याकडे दुर्लक्षच करायला हवे. कारण देश सेफ राहणे अत्यंत गरजेचे आहे. ■

writerjayeshmestry@gmail.com

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# प्रश्न पत आणि पात्रतेचा!

महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतःला मराठी माणसाचे तारणहार म्हणवून घेणाऱ्या अनेक नेत्यांच्या दांभिकतेचे बुरखे आता टराटरा फाटू लागले आहेत. विचारधारेचा अभाव, सततची धरसोड वृत्ती आणि क्षुल्लक राजकीय स्वार्थासाठी मराठी तरुणांच्या भावनांशी खेळण्याचा प्रदीर्घ इतिहास असलेल्या या पक्षांची आणि त्यांच्या नेत्यांची खरे तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बोलण्याची पात्रता नाही. मात्र, स्वतःचे महत्त्व वाढवून घेण्यासाठी, फुटेज खाण्यासाठी अशी नौटंकी एक नेता अधूनमधून करत असतो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या शतकी वाटचाल करणाऱ्या, अहोरात्र राष्ट्रकार्यासाठी झटणाऱ्या आणि शिस्तबद्ध समाजसंघटना उभारणाऱ्या संस्थेवर गरळ ओकण्यापूर्वी स्वतःच्या बुडाखालचा अंधार त्यांनी आधी बघावा आणि नंतरच इतरांकडे बोट दाखवावे, हे श्रेयस्कर.

केवळ भावनिक घोषणा, निष्पाप कार्यकर्त्यांच्या डोक्यावर पोलिसांच्या गुन्ह्यांचा भार असे पराक्रम करून मराठी माणसाला वाऱ्यावर सोडण्याचेच राजकारण यांच्याकडून सतत घडले आहे. त्यामुळे आज जेव्हा संघविचारांवर आणि हिंदू अस्मितेवर हा नेता प्रश्न उपस्थित करतो, तेव्हा- साहेब, तुमचा खरा चेहरा कोणता आणि तुमचा मूळ अजेंडा तरी काय, असा प्रश्न विचारावासा वाटतो. काकांचे बोट धरून राजकारणात आलेल्या राज ठाकरे साहेबांना आपले काका हिंदुहृदयसम्राट होते, याचाही विसर पडलाय्!

नव्वदच्या दशकात मराठी तरुणांना उद्योजक बनवण्याचे स्वप्न दाखवून काय केले गेले, हे महाराष्ट्र विसरलेला नाही. मुंबईत मायकल जॅक्सनचा कॉन्सर्ट आयोजित करण्यात आला होता. तत्कालीन शिव उद्योग सेनेच्या माध्यमातून हजारो मराठी तरुणांनी आणि पालकांनी त्या कार्यक्रमाची महागडी तिकिटे खरेदी केली. कारण त्यातून गोळा होणारा कोट्यवधींचा निधी राज्यातील बेरोजगार तरुणांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी भांडवल म्हणून दिला जाईल, असे सांगण्यात आले होते. त्या कार्यक्रमाला आज तीन दशके उलटून गेली, पण त्या वेळी संकलित झालेला तो निधी नेमका कुठे गेला आणि त्यातून किती मराठी पोरांच्या हातांना रोजगार मिळाला, किती जणांचे प्रपंच मार्गी लागले, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे.

अशाच नेत्यांनी माथी भडकवल्यामुळे हजारो निष्पाप मराठी तरुणांवर दंगली, तोडफोड आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी गुन्हे दाखल होत असतात, हा इतिहास आहे. यांच्या स्वार्थासाठी आक्रमक झालेले असंख्य तरुण आजही न्यायालयांच्या फेऱ्या मारत आहेत, अनेकांचे करीअर उद्ध्वस्त झाले आहे. अनेक तरुण पश्चात्तापग्रस्त झालेले आहेत. एके काळी साहेब-साहेब म्हणून नेत्यांच्या मागे फिरणाऱ्या आणि नेत्यांच्या शब्दावर वाट्टेल ते करणाऱ्या या तरुणांसाठी या नेत्यांनी नंतर काहीही केले नाही. कधी मराठी माणूस, कधी विकासाची पोकळ ब्लू प्रिंट, कधी मोदींचे समर्थन, तर कधी विरोध; पुन्हा अचानक हिंदुत्वाची शाल पांघरूण भोंग्यांचे राजकारण आणि निवडणुका जवळ आल्या की पुन्हा सोयीस्कर तडजोडी अशा सततच्या कोलांटउड्यांमुळे तशीही राज साहेबांची विश्वासार्हता प्रश्नांकित झालेली आहे. असाच दुटप्पीपणा पालघरमध्ये जेव्हा दोन निष्पाप साधूंची निर्घृण हत्या करण्यात आली, तेव्हाही दिसला. देशासाठी सुवर्ण जिंकणाऱ्या मराठी खेळाडूला भेटायला साहेबांना वेळ नसतो. लोक विचारतात- नेमके करतात तरी काय साहेब? म्हणे, 'बदल आवश्यक आहे. हाफ पॅन्टची फुल नाही का झाली, त्यामुळे रिजिम चेंज झालीच पाहिजे...' इंग्रजी भाषेत एक वाक्य आहे- ''बी द चेंज यू वाँट टू सी इन द वर्ल्ड''. अर्थात जो बदल आपल्याला पाहायचा किंवा घडवायचा असतो, त्याची सुरुवात स्वतःपासून करावी लागते. राज साहेब, रिजिम चेंजची सुरुवात तुमच्या पक्षापासून कधी बरं करताय, असा प्रश्न त्यांना विचारावासा वाटतो. तुमच्या जागेवर दुसऱ्या कुणाला तरी द्या की संधी, पक्षप्रमुख म्हणून. तुमच्या ज्येष्ठ बंधूंना पण सांगा की पक्षप्रमुखपदाची संधी दुसऱ्या कुणाला दे म्हणून! होतेय् का बघा रिजिम चेंज...? नाही ना? तुमच्या पक्षाचा निर्णय तुम्ही घेणे समजू शकतो. लोकशाहीत सत्तांतराचा निर्णय घेण्याचा अधिकार नागरिकांना असतो. कुण्या एकट्याला नाही! पण, यातले काहीही अशा नेत्यांच्या ध्यानी येत नाही. त्यामुळे ते वाट्टेल तसे बरळत असतात.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दल राज ठाकरे यांनी केलेली वक्तव्ये त्यांच्या वैचारिक स्तराचे दर्शन घडविणारी आहेत. ज्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने गेली १०० वर्षे अविरतपणे, कोणत्याही प्रसिद्धीच्या हव्यासाविना, केवळ समाज आणि राष्ट्र उभारणीसाठी आपले आयुष्य समर्पित केले, त्या संघावर टीका करण्याची त्यांची पात्रता नाही. संघाचे स्वयंसेवक जेव्हा काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत पूर, भूकंप, चक्रीवादळ अशा राष्ट्रीय आपत्तींच्या वेळी स्वतःचा जीव धोक्यात घालून लोकांच्या मदतीला धावून जातात, तेव्हा तिथे जात, पात किंवा भाषा-प्रांत पाहिला जात नाही. स्वातंत्र्यानंतर राजकीय विरोध, खोट्या चौकशा आणि बंदी सहन करूनही संघाने कधीही राष्ट्रविरोधी किंवा हिंसक मार्ग पत्करला नाही. उलट संघाने नेहमीच लोकशाहीच्या चौकटीत राहून समाज जोडण्याचे काम केले. एकीकडे एका शतकाची निःस्वार्थी, तळागाळातील समाजसाधना करणारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारखी संघटना आणि दुसरीकडे केवळ भावनिक भाषणबाजी, प्रांत-भाषावाद आणि स्वार्थी वृत्ती, अशी ही विसंगती कुणाच्याही लक्षात यावी. तरीही, ज्यांच्या कारनाम्यांमुळे असंख्य तरुण अडचणीत आले, त्यांनी मराठी अस्मितेचा ढोल बडवायचा यापेक्षा दुसरा हास्यास्पद प्रकार असू शकत नाही. स्वतःची राजकीय पोळी भाजण्यासाठी, स्वतःचे राजकीय अस्तित्व कायम ठेवण्यासाठी राज ठाकरेंना महाराष्ट्राच्या जनतेने आता चांगल्या पद्धतीने ओळखले आहे. पारखून घेतलेले आहे. आता तरी राजसाहेबांनी आत्मपरीक्षण करावे.

आपण काकांच्या पक्षातून बाहेर पडून काय तीर मारले, याचा अंदाज घ्यावा. जमल्यास आपल्या 'महाराष्ट्रव्यापी' पक्षाचे आमदार-खासदार-नगरसेवक यांचा हिशेब मांडून पाहावा. आपण तरुणांना आणि महाराष्ट्राच्या जनतेला दिलेली आश्वासने स्मरून पाहावीत. राजकारण आणि समाजकारण असेच होत नसते. एखाद्या समाजसेवी संघटनेवर टीकाटिप्पणी करण्याची पात्रता येण्यासाठी किमान आपला पक्ष तरी नीट आणि सबळ असावा लागतो. तो तसा नाही, हे साऱ्यांनाच ठावूक असेल तर त्या पक्षाच्या प्रमुखालाच ठावूक नाही असे कसे म्हणता येईल? राजसाहेबांनी अशी उथळ विधाने करण्यापेक्षा स्वतःचा आणि पक्षाचा आलेख उंचावला पाहिजे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या संघटनेवर टीकाटिप्पणी करून सत्तांतर होणार नाही आणि त्यांचा पक्षही वाढणार नाही. शेवटी प्रश्न पत आणि पात्रतेचा असतो. या दोन्ही गोष्टी मिळवाव्या लागतात आणि त्यासाठी फार कष्ट उपसावे लागतात. त्यांना हेही समजले पाहिजे की, लोकतांत्रिक देशात सत्तांतर होणे स्वाभाविकच असले तरी ते निवडणुकीतूनच होणे अपेक्षित आहे. तसे भारतात आणि महाराष्ट्रातही अनेकदा झालेले आहे. रस्त्यावरच्या मोर्चांवरून आणि अशा वक्तव्यांवरून सत्तांतरे व्हायला लागली तर लोकतांत्रिक व्यवस्था आणि निवडणूक प्रक्रिया गुंडाळून ठेवावी लागेल. ■

९२७०३३३८८६

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





# जय जवान जय किसान सैनिकी शाळेस तिहेरी मुकुट

## शालेय शहर खो-खो व सेपाक टकरा स्पर्धेत विजेतेपद, मैदानी स्पर्धेतही उल्लेखनीय कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**

शालेय शहर क्रीडा स्पर्धांमध्ये नेहरूनगर येथील जय जवान जय किसान मुलांची सैनिकी शाळा व ज्युनिअर कॉलेजने खो-खो व सेपाक टकरा स्पर्धेत विजेतेपद पटकावित तिहेरी मुकुट संपादला. तसेच मैदानी स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करून शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशात मानाचा तुरा रोवला.

१४ वर्षांखालील मुलांच्या शहर खो-खो स्पर्धेत त्यांनी दमाणी प्रशालेचा ७ गुणांनी पराभव करून दिमाखदार विजेतेपद पटकावले. या सामन्यात वेदांत चव्हाण आणि मोहम्मद मुजावर यांनी अष्टपैलू कामगिरी केली.

१४ व १७ वर्षांखालील मुलांच्या सेपाक टकरा स्पर्धेतही शाळेच्या संघांने सोशल प्रशालेच्या संघांवर मात करून विजय मिळवला. संघास महेश चव्हाण, रवी चव्हाण आणि सदा गुजले यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष सुभाष चव्हाण, प्राचार्य रवींद्र चव्हाण, कमांडट अशोक, जाधव, मुंडे यांनी अभिनंदन केले.

**विजयी खो-खो संघ :** यश सासवे, रंजीत कोळी, रामेश्वर हिरापुरे, ऋषभ काळे, हर्षवर्धन जाधव, स्वराज्य डोके, श्रेयश चव्हाण, विराज तरंगे, संविधान सरवदे, आर्यन राठोड, हर्षद देशमाने, युवराज शाहरुख, पृथ्वीराज राठोड, वेदांत चव्हाण. मोहम्मद मुजावर.

**विजयी सेपाक टकरा संघ :** १४ वर्षांखालील संघ : युवराज साठे, प्रद्युम्न भालेकर, शिवतेज काळे, विराट गिरे, आदित्य चाबुकस्वार. १७ वर्षांखालील संघ: प्रेम बिराजदार, अमित कोळी, अथर्व निकाळजे,आदर्श हिपळ्या, असद नदाफ.

**मैदानी स्पर्धेतील कामगिरी:** १७ वर्षांखालील मुले : ४ बाय ४०० मीटर प्रथम (आदित्य कदम, आर्यन पाटील, शंभुराजे साळुंखे, युवराज शाहरुख, प्रथमेश). भालाफेक : सुशांत साळुंखे (प्रथम). थाळीफेक : सुशांत साळुंखे (द्वितीय). पाच किलोमीटर चालणे : लक्ष्मण मेंदर्गे, (तृतीय). १९ वर्षांखालील मुले : भालाफेक : हर्षद चौरे (द्वितीय). क्रॉस कंट्री : मुरलीधर दिकोंडा (पाचवा).



## दूर्वाची विभागीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**

एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलची इयत्ता आठवीतील विद्यार्थिनी दूर्वा नंदकिशोर दांडगे हिने जिल्हा तलवारबाजी स्पर्धेत १४ वर्षांखालील वयोगटातील फॉइल या प्रकारात प्रथम क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले.

या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर तिने विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. दूर्वाचे प्राचार्या रूपाली महेश हजारे यांनी अभिनंदन करून आगामी विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तिच्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात भर पडली आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः डि. धाराशिव सब डि. व ता. वाशी पैकी मौजे तेरखेडा तसेच आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

१) डि.धाराशिव सब डि. व ता. वाशी पैकी मौजे तेरखेडा येथील जमीन जमीन ग.नं. ४८९ यापैकी प्लॉट नं. २३ याचे क्षेत्र १५७.५० चौ.मी. (याचाच ग्रामपंचायत मिळकत नं.१९७२) यासी चतुःसिमा :- पुर्वेस - ३३ फुटी रोड, दक्षिणेस - ६ मी. रुंदीचा रोड, पश्चिमेस - प्रवीण घुले यांची जागा, उत्तरेस - गणेश रकटे यांची जागा तसेच ग.नं. ४१९ यापैकी प्लॉट नं. २४ याचे क्षेत्र १२०.०० चौ.मी. (याचाच ग्रामपंचायत मिळकत नं. १९७१) यासी चतुःसिमा :- पुर्वेस - गणेश रकटे यांची जागा, दक्षिणेस - ६ मी. रुंदीचा रस्ता, पश्चिमेस - खुला प्लॉट, उत्तरेस - गणेश रकटे यांची जागा. ही दोन्ही मिळकती एकमेकालगत असून एकूण क्षेत्र २७७.५० चौ.मी. जागा त्यावर बांधण्यात येणारे आरसीसी इमारत आतील सर्व तदंगभूत वस्तुसह व वहिवाटीचे वापराचे हक्कासह जागा.

वर क. १ मध्ये नमूद मिळकत ही गणेश लिंबराज रकटे यांचे खरेदी मालकीची आहे. सदर मिळकतीत त्यांना घर बांधकाम करण्यासाठी आमचे अशिल सांगली अर्बन को. ऑप. बँक लि., शाखा बार्शी यांचेकडे कर्ज मागणी केली असून त्याना रुपये ७०,००,०००/- चे कर्ज आमचे अशिल बँकेने मंजूर केलेले आहे सदर कर्जाकरीता गणेश लिंबराज रकटे यांनी कर्जदार म्हणून त्यांची वर नमूद मिळकत आमचे अशिल बँकेचे हक्कात गहाण तारण देण्याचे मान्य केले असून तसा दस्त नोंदवून देणेचेही त्यांनी कबुल केलेले आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असलेचा भरवसा त्यांनी आमचे अशिल बँकेस दिलेला असून सदर मिळकत अन्य कोणत्याही बँकेकडे अगर वित्तीय संस्थेकडे गहाण तारण दिलेली नाही, कोणत्याही न्यायालयात न्यायप्रविष्ठ नाहीत अशीही ग्वाही त्यांनी दिलेली आहे.

तरी या जाहीर नोटीसीने सर्वत्रास कळविण्यात येते की, वर नमूद मिळकती संबंधाने जर कोणाचे काही गहाण, दान, लिज, बोजा व हस्तांतर अगर कर्जबोजाचे हक्क अधिकार असल्यास संबंधीतानी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून आठ दिवसांत आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन आमची खातरजमा करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होवू नये व आमचे अशिलाचे हक्काची सर्वत्रास जाणीव व्हावी म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. दिनांकः २३/१०/२०२६

सही/-
**ॲड. श्री. प्रसाद जे. कुलकर्णी**
**बी.एस.एल., एलएल.बी.**
**लक्ष्मीनृसिंह, कासारवाडी रोड, सिध्देश्वर नगर**
**बार्शी ता. बार्शी, जि. सोलापूर**
**(अशिलातर्फे पॅनल ॲडव्होकेट)**

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील सिव्हिल लाईन येथील सिटी सर्व्हे नं. ३३२१ टी.पी.स्कीम नं. ०३ याचे क्षेत्र ६१.०१ चौ.मी. इतकी आहे. यामध्ये चार खोल्या, संडास, बाथरुम आहे व तसेच नळ व लाईट कनेक्शनची सोय असलेली घरजागा. यासी चतुःसिमा :- पूर्वेस - बोळ, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - समीर शेख यांची जागा, उत्तरेस - राहुल सलगर यांची जागा.

वर नमूद घर जागा ही प्रशांत संजीव यादव यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची आहे. प्रशांत संजीव यादव यांचे दि. १५/११/२०१५ रोजी निधन झाले आहे. त्यांचे मृत्युपश्चात मयताची आई रेणुका संजीव यादव व पत्नी पद्मलता प्रशांत यादव असे कायदेशीर वारसदार आहेत. सदरहु प्रशांत संजीव यादव यांची पत्नी नामे पद्मलता प्रशांत यादव यांनी सदरहु घर जागा आमचे अशिल यांना विक्री करण्याचे ठरवून आमचे अशिलांकडून इशारा दाखल रक्कम स्विकारुन रितसर आमचे अशिलांचे नावे दि. ११/०८/२०२६ रोजी नोटराईज्ड इशारा पावती व करारपत्र लिहून दिले आहे. तसेच सदरहु मालकांनी सदरहु घरजागा ही निर्वेध व निजोखमी असल्याची हमी व खात्री आमचे अशिलांना दिली आहे. तरी परंतु सदर घर जागेवर अन्य कोणाचा हक्क, दावा, लिज, गहाण, दान, बक्षीस, पोटगी, खरेदी-विक्री व इतर स्वरुपाचे करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०८ (आठ) दिवसांच्या आत आपले हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर आणून देऊन खात्री करुन घ्यावी. जर मुदतीत कोणाची हरकत न आल्यास सदरील घरजागा ही निर्वेध व निजोखमी आहेत असे समजून आमचे अशिलांनी सदर घरजागेचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली ता. २३/१०/२०२६.

सही/-
**ॲड. जगदिश महादेव बिडवे**
**चेंबर नं. १०५, बेसकर कॉम्प्लेक्स,**
**बॉम्बे मर्कंटाईल बँकेवरती, सिव्हिल चौक,**
**सिध्देश्वर पेठ, सोलापूर मो.नं. ८८८८३५०६६५**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

### जाहीर नोटीसेस हरकत व खुलासा

सोलापूर येथील तमाम लोकांस कळविण्यात येते की, दि. १६/१०/२०२६ रोजी अ. जब्बार अ. सत्तार मुर्शद यांच्यातर्फे दैनिक सुराज्य मध्ये पान नं. ५ वर दिलेल्या जाहीर नोटीस/सुचना यास हरकत व खुलासा येणेप्रमाणे : दि. १६/१०/२०२६ रोजी अ. जब्बार अ. सत्तार मुर्शद यांच्यातर्फे दैनिक सुराज्य मध्ये पान नं. ५ वर दिलेल्या जाहीर नोटीस/सुचना मधील संपूर्ण मजकूर खोटा व चुकीचा असून तो आमची संस्था मुस्लीम कब्रस्तान (रहिमतबी व दर्गाह हजरत माँसाब) ट्रस्ट वक्फ संस्था, सिध्देश्वर पेठ, सिध्देश्वर मंदिरासमोर, सोलापूर रजि. क्र. MSBW/13/2008 या संस्थेस मान्य नाही.

मुस्लिम कब्रस्तान रहिमतबी व दर्गाह हजरत माँसाब व वक्फ संस्थेचे पूर्वीचे ट्रस्टी नामे १. अब्दुल रहमान उमर शेख, २. समीर रईस हुंडेकरी, ३. अ. गफार अ. सत्तार मुर्शद यांनी आपल्या ट्रस्टी पदाचा आणि चेअरमन अ. जब्बार मुर्शद यांनी आपल्या चेअरमनपदाचा दिनांक २७/०३/२०२६ रोजी त्यांच्या सर्व पदांचा स्वतः राजीखुशीने सह्या करुन राजीनामा दिलेला आहे आणि वक्फ संस्थेने त्यांचा राजीनामा मंजूर करुन ठराव पारीत केलेला आहे. तसेच संस्थेच्या पुढील व्यवस्थापनाबाबत नविन चेंज रिपोर्ट (बदल अहवाल) मे. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ छ. संभाजीनगर येथे कायदेशीररित्या दाखल करण्यात आलेले आहे. सदर चेंज रिपोर्ट (बदल अहवालानुसार) विश्वस्त मंडळात ठराव पारिता करुन नविन ट्रस्टींची आणि चेअरमनची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार हे सर्व नविन ट्रस्टी आणि चेअरमन नामे १. आसिफ मुर्शद, २. बशिर मुर्शद, ३. अफझल मुर्शद, ४. अ. जब्बार अ. सत्तार मुर्शद हेच कायदेशीर वक्फ संस्थेचे ट्रस्टी असून संस्थेचे चेअरमन म्हणून दाऊद हुसेन मुर्शद असून हे सर्व ट्रस्टीचे लोक सध्या व्यवस्थापन करीत आहे. त्यामुळे यापुढील वक्फ संस्थेतर्फे भाडेकरार करणे, भाडे वसुल करणे, संस्थेचे ऑडीट करणे, संस्थेचे दैनंदिन खर्च बघणे व इतर आर्थिक व्यवहार हे सर्व करण्याचे अधिकार मुस्लीम कब्रस्तान रहिमतबी व दर्गाह हजरत माँसाब वक्फ संस्थेतर्फे चेअरमन म्हणून श्री दाऊद हुसेन मुर्शद यांना देण्यात आलेले आहे.

सबब सर्व संस्थेच्या भाडेकरूंना या जाहीर नोटीसेस हरकताने व खुलाशाने कळविण्यात येते की, यापूर्वीचे राजीनामा दिलेल्या ट्रस्टींकडे / चेअरमनकडे अथवा इतर कोणत्याही तिऱ्हाईत व्यक्तीकडे (थर्ड पर्सन) जागेसाठी प्रस्ताव पाठवणे, भाडेकरार करणे, भाडे जमा करणे किंवा इतर कोणतेही आर्थिक आणि कायदेशीर व्यवहार व करार करणे हे बेकायदेशीर व अनाधिकृत व्यवहार समजण्यात येईल. जर असे व्यवहार कोणत्याही भाडेकरूनी केल्यास अगर तसे आढळून आल्यास तो त्यांचा वैयक्तिक व्यवहार मानला जाईल आणि सदरचे भाडे / व्यवहार हे मुस्लीम कब्रस्तान रहिमतबी व दर्गाह हजरत माँसाब व वक्फ संस्थेमध्ये जमा करण्यात आलेले नाही असे समजण्यात घोषित करण्यात येईल तसेच कोणतेही भाडेकरार हे अवैध/अनाधिकृत समजण्यात येईल असे कोणतेही बेकायदेशीर व्यवहार केल्यास त्याची जबाबदारी हे मुस्लीम कब्रस्तान रहिमतबी व दर्गाह हजरत माँसाब वक्फ संस्थेची राहणार नाही. मुस्लीम कब्रस्तान रहिमतबी व दर्गाह हजरत माँसाब वक्फ संस्थेच्या अधिकृत ऑफिसमध्ये (कार्यालयामध्ये) नवीन चेअरमन नामे श्री दाऊद हुसेन मुर्शद यांच्याकडे आपले रितसर प्रस्ताव मांडून कायदेशीर भाडेकरार करुन घ्यावे तसेच त्यांच्याकडेच आपले भाडे जमा करुन त्यांच्याकडून रितसर भाडेपावती घेऊन जावे, याची सर्वांनी नोंद घ्यावी. हे जाहीर नोटीसेस हरकत व खुलासा येणेप्रमाणे : दि. २३/१०/२०२६

शिक्का

सही/-
**दाऊद हुसेन मुर्शद (चेअरमन,)**
**मुस्लीम कब्रस्तान (रहिमतबी व दर्गाह हजरत माँसाब) ट्रस्ट वक्फ संस्था, सोलापूर**
**मो. नं. ७७९८२३२३६७**

### जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र. /२०२६

**अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु.डी. यांचे कोर्टात**

१) **कु. सुभद्रा गिरजप्पा नारंगकर**
रा. चपळगांव, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
२) **श्री. दिलीप गिरजप्पा नारंगकर**
रा. चपळगांव, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर,
ह.मु. बी-४/२०२, ऋतू एन्क्लेव्ह, घोडबंदर रोड,
मुच्छाला कॉलेजसमोर, कासारवडवली, ठाणे - ४००६०७ — **अर्जदार**

विरुध्द

**कोणीही नाही - सामनेवाले**

ज्या अर्थी वरील अर्जदारानी या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं. /२०२६ हा इंडियन सक्सेशन ॲक्टचे कलम ३७२ प्रमाणे दाखल केला असून अर्जदार क्र. १ व २ यांचे वडील गिरजप्पा ईश्वर नारंगकर दि. ३१/०८/२००६ रोजी निधन झाले आहे. व अर्जदार क्र. १ व २ यांची आई श्रीमती पार्वती गिरजप्पा नारंगकर यांचे देखील दि. १०/०४/२०२५ रोजी निधन झाले आहे. मयत गिरजप्पा ईश्वर नारंगकर यांचे पश्चात अर्जदार क्र. १ यांना कुटूंब निवृत्ती वेतन मिळणेकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार हेच कै. गिरजप्पा ईश्वर नारंगकर व कै. श्रीमती पार्वती गिरजप्पा नारंगकर यांचे कायदेशीर वारस असल्याने तसा वारसा दाखला मिळणेकामी अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे कै. गिरजप्पा ईश्वर नारंगकर व कै. श्रीमती पार्वती गिरजप्पा नारंगकर यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दिनांक ०१/१२/२०२६ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

आज रोजी मे. कोर्टाच्या हुकुमाप्रमाणे माझ्या सहीने हे जाहीर प्रसिध्दीकरण केले. ता. २३/१०/२०२६

कोर्टाचा शिक्का

सही/-
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय अक्कलकोट**

## निधन वृत्त...

### पूजा कुंभार



**अकलूज, दि. २३ ऑक्टोबर-**

यशवंत नगर महर्षी नगर येथील पूजा (महानंदा) रमण कुंभार वय ५० यांचे अल्पशा आजाराने शुक्रवार दिनांक २३ ऑक्टोबर रोजी पहाटे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अकलूज विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे माजी संचालक भारत कुंभार यांच्या त्या भावजई होत. अकलूज येथील लिंगायत स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### शंकरराव सुरवसे



**अक्कलकोट, दि. २३ ऑक्टोबर-**

तालुक्यातील बासलेगावचे माजी उपसरपंच व श्री भवानी देवी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष शंकरराव मारुतीराव सुरवसे यांच्या अल्पशा आजाराने दि. २२ ऑक्टोबर रोजी निधन झाले आहे. ते ५५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुली व एक मुलगा नातवंड असा परिवार आहे. त्यांच्यावर बासलेगाव येथे गुरुवारी सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.

### बाबा बावचे



**मंगळवेढा, दि. २३ ऑक्टोबर-**

ढवळस (ता. मंगळवेढा ) येथील ज्येष्ठ नागरिक बाबा नारायण बावचे (वय ७५) यांचे शुक्रवार २३ ऑक्टोबर रोजी सकाळी अकरा वाजता हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा, सून व तीन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. मोरेवाडी ( डोंगरगाव) येथील शिक्षक संजय बावचे गुरुजी यांचे ते चुलते होते.

### जाहीर नोटीस / प्रसिध्दीकरण

तमाम लोकांना विशेषतः ता. बार्शी पैकी शहर बार्शी व आसपासचे परीसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल किसनलाल रघुनाथदास अट्टल ट्रस्ट, बार्शी, ता. बार्शी यांचे सदस्य श्री. लक्ष्मीकांत श्रीवल्लभ काबरा यांनी माहिती दिलेवरून आणि सदर नोटीस देणेस सांगितलेने या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल किसनलाल रघुनाथदास अट्टल ट्रस्ट, बार्शी, श्रीराम मंदिर टाकणखार रोड, बार्शी, जि. सोलापूर या संस्थेचे श्रीराम मंदीराचे जिर्णो धाराचे काम साधारण मागील २ वर्षापुर्वी करण्यात आलेले होते व आहे त्यावेळी सदर ट्रस्टचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र कोठेतरी गहाळ झालेले आहे. त्याबाबत आमचे अशिलाने इतरत्र शोध घेतला परंतु सदरचे प्रमाणपत्र आढळून आले नाही म्हणून शेवटी आमचे अशिलानी बार्शी शहर पोलिस स्टेशनला दि. २०/१२/२०२४ रोजी रितसर तक्रार दिलेली आहे. परंतु आजपावेतो सदरचे प्रमाणपत्र आमचे अशिलास मिळून आलेले नाही. तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की वरील नमूद संस्थेचे प्रमाणपत्र जर कोणास सापडले तर त्यांनी खालील नमूद पत्यावर संपर्क करून आणून दयावे. आमचे अशिलातर्फे संबंधीतास योग्य ते बक्षिस दिले जाईल. संस्थेचे हिताचे दृष्टीने सदरचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. हि जाहीर नोटीस / प्रसिध्दीकरण दिले असे. ता. २०/०१/२०२६

सही/-
**ॲड. श्री. संतोष गोपीनाथ गायकवाड**
**पत्ता - जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी समोर**
**श्री स्वामी समर्थ कॉम्प्लेक्स बार्शी, ता. बार्शी,**
**जि. सोलापूर मो.नं. ९८५०५८७७१५**
**(अशिलातर्फे ॲडव्होकेट)**

## CHANGE IN NAME

I here by declare that my old name **SWAMINI ANIL DANGE** Has been changed to **UJWALA ANIL DANGE** Residing At/Post – Block No. 27, Sharada Nagar, Solapur-413004

## IDFC FIRST Bank Limited

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

### आर्थिक मालमत्तेचे प्रतिभूतीकरण आणि पुनर्रचना तसेच प्रतिभूती हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत नोटीस

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेले तारण कर्ज घेतले होते. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या तारणावर (गहाणखत) सुरक्षित करण्यात आली आहेत. ते संबंधित कर्ज करारांच्या अटी व शर्तींचे पालन करण्यास अपयशी ठरल्यामुळे आणि त्यांच्या खात्यातील व्यवहार अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज खाते 'एनपीए' (अनुत्पादक मालमत्ता) म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. त्यांच्याकडून **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते) देय असलेली रक्कम खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद केलेल्या संबंधित नोटीसनुसार दिली आहे, आणि सदर रकमेवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून कंत्राटी दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 147567460 | मालमत्तेवर कर्ज | १. उत्तरेश्वर भीमराव सराडे<br>२. भीमराव श्रीपती सराडे<br>३. सुलभा उत्तरेश्वर सराडे | 02-Sep-2026 | INR 5,44,887.32/- |

**मालमत्तेचा पत्ता :-** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक १३० असलेली संपूर्ण जमीन व मिळकत, ज्याचे क्षेत्रफळ १५०० चौरस फूट, म्हणजेच १३९.४० चौरस मीटर आहे. त्यावरील बांधकामाचे क्षेत्रफळ ५०० चौरस फूट, म्हणजेच ४६.४६ चौरस मीटर आहे आणि मोकळ्या जागेचे क्षेत्रफळ १००० चौरस फूट, म्हणजेच ९२.९३ चौरस मीटर आहे. ही मालमत्ता मौजे बिटारगाव (वांगी), जिल्हा परिषद सोलापूरच्या हद्दीत, तालुका करमाळा, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र - ४१३२०२ येथे स्थित आहे. मालमत्तेच्या चतु:सीमाः पूर्वेस - ग्रामपंचायत रस्ता, पश्चिमेस - ग्रामपंचायत रस्ता. उत्तरेस - अर्जुन धनवे यांची मालमत्ता, दक्षिणेस - मोकळी जागा

याद्वारे तुम्हाला आवाहन करण्यात येते की, वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या ती **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) त्यांच्या संबंधित तारखांपासून करारातील व्याजदरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादी रकमा या प्रकाशनाच्या (जाहिरातीच्या) तारखेपासून ६० दिवसांच्या आत अदा कराव्यात. तसे न केल्यास, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडची** देय रक्कम वसूल करण्यासाठी, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कायदेशीर कारवाई सुरू करणे स्वाक्षरीकर्त्यास भाग पडेल. याशिवाय, सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत तुम्हाला उपरोक्त सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्टा (लीज) किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

**दिनांक : 24/10/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

**स्वाक्षरी/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, ज्याचे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण झाले असून सध्या ते आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

### जाहीर प्रसिध्दीकरण

निशाण नंबर ६
दि.कि.अर्ज क्र. ६७/२०२६

**बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात**

**करण लक्ष्मण काळुखे तर्फे**
**अ.पा.क. आई पुनम लक्ष्मण काळुखे**
रा. केम, ता. करमाळा, जि. सोलापूर — **अर्जदार**

विरुध्द

**महाराष्ट्र शासन वगैरे - सामनेवाला**

तमाम लोकांना विशेषतः मौजे ढवळस, ता. माढा, जि. सोलापूर येथील व परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार यांनी बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात दि. कि. अर्ज क्रमांक ६७/२०२६ हा मौजे ढवळस, ता. माढा, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नंबर १६१ पैकी अर्जदार नंबर १ चे हिश्याचे क्षेत्रातील दक्षिण बाजूची मिळकत क्षेत्र ०१ हे. ४० आर, आकार ०१ रु. ९५ पैसे हे विक्रीस काढलेले असून त्याची विक्री परवानगी मिळणेसाठीचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याने कळविण्यात येते की, वरील अज्ञान अर्जदार नंबर १ याचे नावे असलेल्या वरील नमूद मिळकतीबाबत विक्री परवानगी मिळणेबाबतचा आदेश पारीत होणेबाबत कोणाची काही तक्रार असलेस अथवा कोणाचा काही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हितसंबंध असल्यास हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून १ महिन्याचे आत किंवा पुढील नेमलेली तारीख ०१/१२/२०२६ रोजी स्वतः अथवा विधीज्ञामार्फत या न्यायालयात हजर राहून हरकत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाची हरकत न आलेस अर्जदाराने मागणी केलेप्रमाणे अर्जदाराचा पुरावा घेवून पुढील योग्य ते आदेश पारीत केले जातील. तदनंतर कोणाची काही एक तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. हे जाहीर प्रसिध्दीकरण आज दि. २३/१०/२०२६ रोजी माझी सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**सही/-**
**लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**अधिक्षक**
**अति. जिल्हा न्यायालय,**
**बार्शी, ता. बार्शी**

### जाहीर प्रसिध्दीकरण

निशाण नंबर ५
दि.कि.अर्ज क्र. ६६/२०२६

**बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात**

**करण लक्ष्मण काळुखे तर्फे**
**अ.पा.क. आई पुनम लक्ष्मण काळुखे**
रा. केम, ता. करमाळा, जि. सोलापूर — **अर्जदार**

विरुध्द

**महाराष्ट्र शासन वगैरे - सामनेवाला**

तमाम लोकांना विशेषतः मौजे ढवळस, ता. माढा, जि. सोलापूर येथील व परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार यांनी बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात दि. कि. अर्ज क्रमांक ६६/२०२६ हा मौजे ढवळस, ता. माढा, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नंबर १६१ पैकी अर्जदार नंबर १ चे हिश्याचे क्षेत्रातील उत्तर बाजूची मिळकत क्षेत्र ०० हे. ६० आर, आकार ०० रु. ८० पैसे हे विक्रीस काढलेले असून त्याची विक्री परवानगी मिळणेसाठीचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याने कळविण्यात येते की, वरील अज्ञान अर्जदार नंबर १ याचे नावे असलेल्या वरील नमूद मिळकतीबाबत विक्री परवानगी मिळणेबाबतचा आदेश पारीत होणेबाबत कोणाची काही तक्रार असलेस अथवा कोणाचा काही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हितसंबंध असल्यास हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून १ महिन्याचे आत किंवा पुढील नेमलेली तारीख ०१/१२/२०२६ रोजी स्वतः अथवा विधीज्ञामार्फत या न्यायालयात हजर राहून हरकत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाची हरकत न आलेस अर्जदाराने मागणी केलेप्रमाणे अर्जदाराचा पुरावा घेऊन पुढील योग्य ते आदेश पारीत केले जातील. तदनंतर कोणाची काही एक तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. हे जाहीर प्रसिध्दीकरण आज दि. २३/१०/२०२६ रोजी माझी सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**सही/-**
**लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**अधिक्षक**
**अति. जिल्हा न्यायालय,**
**बार्शी, ता. बार्शी**

**श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसी, उमरगा

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी उपकार्यालयासमोर, उमरगा, जि. धाराशिव – ४१३६०६.
Telephone: 02475-253254
E-mail: scopomerga@gmail.com Website: www.scopomerga.org

Approved by Pharmacy Council of India (PCI) New Delhi & Govt. of Maharashtra. Recognized by DTE, Mumbai
Affiliated to Maharashtra State Board of Technical Education, Mumbai

## डी. फार्मसी प्रवेश प्रक्रिया सूचना २०२६-२७

**संस्था कोड : २६१९**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रथम वर्ष डी. फार्मसी पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्याकरिता पात्र व इच्छुक असलेल्या उमेदवारांकडून केंद्रीभूत प्रवेश फेरी झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अनु. क्र. | क्रियाकल्प | वेळापत्रक |
|---|---|---|
| ०१ | संस्थास्तरावरील प्रवेशाकरिता उपलब्ध असलेल्या प्रवर्गनिहाय जागांची माहिती प्रदर्शित करणे. | २५/१०/२०२६ सकाळी ११:३० वा. |
| ०२ | अर्जांची नोंदणी व पडताळणी करणे. | २५/१०/२०२६ ते २६/१०/२०२६ दुपारी ०३:०० वा. पर्यंत |
| ०३ | तात्पुरती गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे. | २६/१०/२०२६ सायंकाळी ०४:०० वाजता |
| ०४ | तात्पुरती गुणवत्ता यादी संदर्भात जर काही तक्रार वा आक्षेप असल्यास, ते सादर करणे अथवा नोंदवणे. | २६/१०/२०२६ ते २७/१०/२०२६ सकाळी ११:०० वा. पर्यंत |
| ०५ | अंतिम गुणवत्ता यादीचे प्रदर्शन. | २७/१०/२०२६ सकाळी ११:३० वा. |
| ०६ | संस्थेमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून आवश्यक कागदपत्रे व शुल्क भरून प्रवेशाची निश्चिती करणे. | २७/१०/२०२६ ते २८/१०/२०२६ सायंकाळी ०५:०० वा. पर्यंत |

**टीप: दिनांक २८/१०/२०२६ रोजी वर नमूद केल्यानुसार प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवरील प्रवेशाकरिता अतिरिक्त प्रवेश फेरी राबविण्यात येईल व त्याबाबतचे वेळापत्रक महाविद्यालयाच्या सूचना फलक तसेच संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.**

प्रवेश पात्रता आणि प्रवेश प्रक्रिया ही तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्या नियमानुसार करण्यात येईल व प्रवेशाचे संपूर्ण वेळापत्रक महाविद्यालयाच्या वेबसाईटवर व सूचना फलकावर वेळोवेळी प्रदर्शित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अधिक माहितीसाठी संपर्क:- 9325099319 / 9945464003 / 9370884018 / 9860000875**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### सिंधू उपांत्य फेरीत; अश्मिताचा पराभव

**पॅरिस :** दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधू हिने सरळ गेममध्ये विजय मिळवित फ्रेंच ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे. दुसरीकडे, अश्मिता चालिहा हिची या स्पर्धेतील प्रभावी कामगिरी उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आली. या स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत, माजी विश्वविजेत्या सिंधूने पूर्ण वर्चस्व गाजवत चीन तैपेईच्या चिऊ पिन-चियन हिचा २१-१३, २१-१४ असा पराभव केला. हा सामना जिंकण्यासाठी तिला ३९ मिनिटे लागली. मात्र, २७ वर्षीय अश्मिता चालिहा हिचा प्रवास येथेच थांबला. तिने गुरुवारी झालेल्या उप-उपांत्यपूर्व फेरीत जपानच्या तीन वेळा विश्वविजेती ठरलेल्या अकाने यामागुची हिच्यावर धक्कादायक विजय मिळवला होता. भारतीय खेळाडूने माजी विश्वविजेती आणि ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती जपानची नोझोमी ओकुहारा हिच्याविरुद्ध कडवी झुंज दिली, परंतु तिला १०-२१, २१-१७, १६-२१ अशा फरकाने पराभवाचा सामना करावा लागला.

### अनाहत पहिल्यांदाच पीएसए गोल्ड-लेव्हल उपांत्य फेरीत

**नवी दिल्ली :** भारतीय स्क्वॅशपटू अनाहत सिंग हिने अमेरिकेतील रेडवुड सिटी येथे सुरू असलेल्या 'सिलिकॉन व्हॅली ओपन' स्क्वॅश स्पर्धेत इजिप्तच्या सहाव्या मानांकित साल्मा हानी हिच्यावर पाच गेमच्या थरारक लढतीत विजय मिळवत, आपल्या कारकिर्दीत पहिल्यांदाच पीएसए गोल्ड-लेव्हल स्क्वॅश स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली आहे. जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या आणि आठ वेळा विश्वविजेतेपद पटकावलेल्या इजिप्तच्या नूर अल शेरबिनी हिचा सरळ गेममध्ये पराभव केल्यानंतर, दुसऱ्याच दिवशी १८ वर्षीय अनाहतने साल्मा हानीचा ४२ मिनिटांच्या लढतीत ४-११, ११-८, ४-११, ११-२, ११-५ असा पराभव केला.

### अंतिम, अमनची माघार

**नवी दिल्ली :** आशियाड क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता अमन सेहरावत आणि रौप्यपदक विजेती अंतिम पंघालने शनिवारी सुरू होणाऱ्या 'वर्ल्ड रेसलिंग चॅम्पियनशिप'मधून माघार घेतली आहे. आता कझाकस्तानमधील अस्ताना येथे होणाऱ्या या स्पर्धेत सुजीत कलकल भारताचे मुख्य आव्हान असेल. ■

# भारताचा झिम्बाब्वेवर विजय

## प्रतिका रावलचे दमदार नाबाद शतक



सामनावीर
प्रतिका रावल
नाबाद १००
चेंडू ९६
चौकार १५

**बडोदरा, २३ ऑक्टोबर**

सलामीवीर प्रतिका रावलने झळकावलेले दमदार (नाबाद १००) शतक आणि शेफाली वर्माच्या (नाबाद ६४) अर्धशतकाच्या बळावर भारतीय महिला संघाने झिम्बाब्वेविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात १३७ चेंडू शिल्लक ठेवीत ९ गड्यांनी दणदणीत विजय नोंदविला. सामनावीर ठरलेल्या प्रतिकाचे हे चौथे वन-डे शतक ठरले.

याबरोबरच भारताने तीन सामन्यांच्या महिला वन-डे मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. आता उभय संघादरम्यान मालिकेतील दुसरा वन-डे सामना रविवारी तसेच तिसरा वन-डे सामनाही बुधवार, २८ ऑक्टोबर रोजी याच मैदानावर होणार आहे.

झिम्बाब्वेची हंगामी कर्णधार नोमवेलू सिबांडाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, मात्र बिलव्हड बिझा वगळता त्यांच्या इतर फलंदाजांना भारतीय गोलंदाजांसमोर खेळपट्टीवर फार वेळ टिकता आले नाही. भारताने झिम्बाब्वेला ४९.५ षटकांत १९७ धावांत गुंडाळले. भारताने २७.१ षटकांत १ बाद २०० धावा काढून आपला पहिला विजय साकार केला.

झिम्बाब्वेकडून बिलव्हड बिझासह सलामीवीर मॉडेस्टर मुपाचिकवा (२५), चिपो मुगेरी-त्रिपानो (२१) व मिचेली मावुंगाने (२९) थोडी फार झुंज देत संघाच्या धावसंख्या उभारणीला हातभार लावला. बिलव्हड बिझाने एकाकी झुंज देत ९२ चेंडूंत ५ चौकारांच्या मदतीने ६२ धावांची खेळी करून झिम्बाब्वेला समाधानकारक धावसंख्या उभारून दिली. झिम्बाब्वेचा डाव गुंडाळताना भारताच्या डावखुरी फिरकी गोलंदाज श्री चरणीने २३ धावांत ४ बळी टिपण्याची किमया केली. क्रांती गौडने ४२ धावांत ३ बळी, तर दीप्ती शर्माने २ बळी व शेफाली वर्माने १ बळी टिपला.

भारताला विजय मिळवून देताना प्रतिका रावल व कर्णधार स्मृती मंधानाने १५.३ षटकांत ९४ धावांची सलामी भागीदारी करून संघाचा पाया मजबूत केला. मात्र मंधाना ऑलिंडर चारेच्या फिरकीला बळी पडली व तिने बिझाच्या हातात झेल सोपविला. मात्र पुढे प्रतिका रावल व शेफाली वर्माने झिम्बाब्वेच्या गोलंदाजीविरुद्ध बहारदार फलंदाजी केली. या दोघींनीही नाबाद खेळी करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. प्रतिका रावलने ९६ चेंडूंत १५ चौकारांच्या मदतीने नाबाद १०० धावा ठोकल्या, तर शेफाली वर्माने ३३ चेंडूंत ५ चौकार व ४ षट्कारांसह नाबाद ६४ धावांची विजयी खेळी केली.

**जिंतिमाणी कलिताचे पदार्पण**

या पहिल्या एकदिवसीय सामन्यात जिंतिमाणी कलिताने एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. झिम्बाब्वेची नियमित कर्णधार जोसेफिन न्कोमो दुखापतीमुळे सामन्यातून बाहेर झाली असून संघाची हंगामी कर्णधार म्हणून नोमवेलो सिबांडा जबाबदारी सांभाळत आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# भारताचा ३० सुवर्णांसह ११४ पदकांचा विक्रम

### आशियाड पॅरा क्रीडा

**नागोया, २३ ऑक्टोबर**

भारताच्या पॅरा-ॲथ्लिट्सनी सर्व अपेक्षांना मागे टाकत आयची-नागोया आशियाड पॅरा क्रीडा स्पर्धेत आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी केली आहे. शुक्रवारी स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी शानदार कामगिरी करीत भारताने ३० सुवर्णपदकांसह एकूण ११४ पदके जिंकून नवा विक्रम प्रस्थापित केला.

नागोया येथे शुक्रवारी पार पडलेल्या आशियाई पॅरा गेम्सच्या शेवटच्या दिवशी भारतीय खेळाडूंनी उत्कृष्ट प्रदर्शन केले. या दिवशी नऊ सुवर्णपदके जिंकल्यामुळे भारताची एकूण पदकसंख्या मागील सर्व विक्रमांच्या पुढे गेली.

या स्पर्धेसाठी भारताने १६८ सदस्यांचे पथक पाठवले होते, जे २०२३ मध्ये हॅण्गझोऊ येथे झालेल्या स्पर्धेतील पथकाच्या तुलनेत निम्म्याहून कमी होते. हॅण्गझोऊ आशिडा पॅरा क्रीडा स्पर्धेत भारताने २७ सुवर्णपदकांसह १०८ पदके जिंकली होती, परंतु नागोया येथे ३० सुवर्ण, ३५ रौप्य आणि ४९ कांस्य पदके जिंकून भारताने कामगिरीचा स्तर उंचावला आहे.

स्पर्धेच्या शेवटी भारत पदक तालिकेत चौथ्या स्थानावर होता. काही स्पर्धा शनिवारी संपणार असल्याने अंतिम क्रमवारीत बदल होऊ शकतो, परंतु या उर्वरित अंतिम फेऱ्यांमध्ये भारताचा कोणताही खेळाडू सहभागी नव्हता.

पॅरा-ॲथलेटिक्सने पुन्हा एकदा भारताच्या पदकांच्या मोहिमेत आघाडी घेतली असून, एकूण ६५ पदके मिळवून दिली. शेवटच्या दिवशी बॅडमिंटन, नेमबाजी आणि तिरंदाजीमधील खेळाडूंनीही मोलाचे योगदान दिले, ज्यामुळे भारताच्या या विक्रमी कामगिरीत केवळ ॲथ्लेटिक्सचाच नव्हे, तर इतर खेळांचाही मोठा वाटा राहिला. ◂ (वृत्तसंस्था)

# मोनाला विश्वविक्रमासह दुसरे सुवर्ण



**नागोया, २३ ऑक्टोबर**

भारतीय पॅरा नेमबाज मोना अग्रवाल हिने शुक्रवारी आशियाड पॅरा क्रीडा स्पर्धेत महिलांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशन्स (एसएच१) प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत विश्वविक्रम प्रस्थापित केला आणि सुवर्णपदक पटकावले.

तिने आयची प्रीफेक्चर जनरल शूटिंग गॅलरीमध्ये ३५७.५ गुण मिळवून हा नवा विश्वविक्रम नोंदवला आणि या स्पर्धेतील आपले दुसरे सुवर्णपदक जिंकले.

याआधीचा ३५६ गुणांचा विश्वविक्रम स्वीडनच्या ॲना बेन्सनच्या नावावर होता, जो तिने यावर्षी जुलै महिन्यात नोवी साद येथे केला होता. अग्रवालने दक्षिण कोरियाच्या ली युनरीने गेल्या महिन्यात चांगवोन येथे नोंदवलेला ३५५.७ गुणांचा आशियाई विक्रमही मोडीत काढला.

चीनच्या झांग सुइपिंगने ३५३.७ गुणांसह रौप्यपदक, तर दक्षिण कोरियाच्या किम मियोंगने ३४४.४ गुणांसह कांस्यपदक मिळवले. भारताचीच अवनी लेखरा ३३३.२ गुणांसह चौथ्या स्थानावर राहिली.

अग्रवालने महिलांच्या १० मीटर एअर रायफल स्टँडिंग (एसएच१) प्रकारात २५०.० गुणांसह स्पर्धा विक्रम प्रस्थापित करत सुवर्णपदक जिंकले होते, तर अवनी लेखराने २४९.६ गुणांसह रौप्यपदक पटकावले होते. ◂ (वृत्तसंस्था)

# तिरंदाजीत हरविंदर सिंग, विजय सुंडीचा सुवर्णभेद




**नागोया, २३ ऑक्टोबर**

पॅरालिम्पिक विजेचा हरविंदर सिंग आणि त्याचा जोडीदार विजय सुंडी या भारतीय जोडीने शुक्रवारी आशियाड पॅरा क्रीडा स्पर्धेतील रिकर्व्ह तिरंदाजी प्रकारात पुरुष दुहेरीचे सुवर्णपदक पटकावले. त्याच वेळी, महिला दुहेरी प्रकारात भारतीय संघाला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

अंतिम फेरीत हरविंदर व विजयने चीनच्या युन डुओ व झाओ लिक्स्यू या जोडीचा ५-१ असा पराभव केला. पहिल्या सेटमध्ये दोन्ही संघांनी ३५ गुण मिळवल्यामुळे तो सेट बरोबरीत सुटला. मात्र, त्यानंतर भारतीय जोडीने सामन्यावर नियंत्रण मिळवले. त्यांनी दुसरा सेट ३७-३६ आणि तिसरा सेट ३८-३६ अशा फरकाने जिंकून ५-१ गुणांसह विजेतेपद निश्चित केले.

महिला दुहेरीच्या अंतिम फेरीत भावना चौधरी आणि पूजा जात्यान यांना चीनच्या गाओ झिहान आणि वांग सुएकियान यांच्याकडून ०-६ असा पराभव पत्करावा लागला, ज्यामुळे त्यांना रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. ◂ (वृत्तसंस्था)

# मानसी जोशी-थुलसिमथीने जिंकले सुवर्णपदक

## थुलसिमथी मुरुगेसनने एका दिवसात मिळविली तीन पदके



मानसी जोशी



थुलसिमथी मुरुगेसन

**नागोया, २३ ऑक्टोबर**

आशियाड पॅरा क्रीडा स्पर्धेत शुक्रवारी महिलांच्या दुहेरी (एसएल३-एसएल५) गटातील बॅडमिंटन स्पर्धेत मानसी जोशी व थुलसिमथी मुरुगेसनने सुवर्णपदक जिंकले. याबरोबरच थुलसिमथी मुरुगेसनसाठी हा दिवस अत्यंत स्मरणीय ठरला. तिने एका दिवसात एकूण एक सुवर्ण व दोन रौप्यपदके आपल्या नावावर केली.

पॅरिस पॅरालिम्पिक्समध्ये रौप्यपदक विजेती ठरलेली २४ वर्षीय थुलसिमथी हिने मानसी जोशीसोबत जोडी करीत महिला दुहेरी (एसएल३-एसएल५) गटाचे विजेतेपद मिळविले. अंतिम सामन्यात त्यांनी चीनच्या यांग किउक्सिया व जिओ झुक्सियान या जोडीचा २८ मिनिटांत २१-१६, २१-१३ असा पराभव केला.

याआधी, महिला एकेरी (एसयू५) गटाच्या अंतिम सामन्यात थुलसिमथीला यांग किउक्सियाकडून १८-२१, ११-२१ असा पराभव पत्करावा लागला, त्यामुळे तिला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

त्यानंतर, मिश्र दुहेरी (एसएल३-एसयू५) गटाच्या अंतिम सामन्यात तिने नितेश कुमारसोबत जोडी केली. या सामन्यात भारतीय जोडीला इंडोनेशियाच्या लिआनी ओक्टिला व हिकमत रमदानी या जोडीकडून ११-२१, २१-१९, १४-२१ असा पराभव स्वीकारावा लागला आणि त्यांना आणखी एका रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. ◂ (वृत्तसंस्था)

### नवीनला सुवर्ण, नित्याला रौप्यपदक

यानंतर नवीनने आपली क्षमता सिद्ध करत इंडोनेशियाच्या फ्रेडी सेतियावानचा ३६ मिनिटांत २१-९, २१-१७ असा पराभव करून सुवर्णपदक आपल्या नावावर केले. २०१८ आणि २०२२ च्या आवृत्तीत सुवर्णपदक जिंकणाऱ्या प्रमोद भगतला यावेळी रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

महिला एकेरीच्या एसएच६ प्रकाराच्या अंतिम सामन्यात भारताच्या नित्या श्री सुमती सिवनला चीनच्या ली फेंगमेईकडून १२-२१, १२-२१ असा पराभव पत्करावा लागला व त्यामुळे तिला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. ■

### नितीशने प्रमोदवर मात करत सुवर्णपदक पटकावले

आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धेत शुक्रवारी झालेल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या नितीश कुमारने पुरुष एकेरीच्या एसएल३ प्रकारात, तर नवीन शिवकुमारने एसएल४ प्रकारात सुवर्णपदके जिंकली.

दोन पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेत्यांमधील लढतीत नितीशने उत्कृष्ट खेळ करत आपलाच देशबांधव प्रमोद भगतचा २१-१८, २१-१६ असा पराभव केला.

आशियाड पॅरा क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकल्याचा खूप आनंद होत आहे, असे नितीशने सांगितले. नितीशने पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकले होते.

मी आशियाड पॅरा क्रीडा स्पर्धेत सलग दोन सुवर्णपदके जिंकली होती आणि इथे तिसरे सुवर्ण जिंकण्याचा माझा प्रयत्न होता, पण आज माझे काही फटके चुकले आणि माझा अंदाजही थोडा चुकला, म्हणूनच मला रौप्यपदकावर समाधान मानावे लागत आहे, असे प्रमोद भगत म्हणाला. ■

### टेबल टेनिसमध्ये जेहान-शुभमला कांस्य

**नागोया :** आशियाड पॅरा क्रीडा स्पर्धेत शुक्रवारी भारताच्या जेहान दोराब मदान व शुभम वाधवा या पुरुष दुहेरी (एमडी४) टेबल टेनिस प्रकारात कांस्य पदक पटकावले. भारतीय जोडीला 'गट अ' मधील आपल्या शेवटच्या सामन्यात दक्षिण कोरियाच्या पार्क जिनचियोल आणि किम क्युंग-ह्युन यांच्याकडून ०-३ असा पराभव पत्करावा लागला. भारतीय जोडीला कोरियन प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध १२-१४, ७-११, ५-११ अशा फरकाने पराभव स्वीकारावा लागला, तरीही ते आपल्या गटात अव्वल चारमध्ये राहिल्यामुळे पदक मिळविण्यात यशस्वी ठरले.

जेहान भारतीय पथकातील सर्वात वयोवृद्ध खेळाडू ठरले आहेत. ते एकेकाळी रेसिंग ड्रायव्हर होते. जेहानने २०२३ च्या आयटीटीएफ इजिप्त पॅरा ओपनमध्ये पहिले आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक जिंकले होते - आणि २९ वर्षीय शुभम यांचा हा प्रवास संमिश्र राहिला. बुधवारी झालेल्या 'गट अ'च्या सामन्यात भारतीय जोडीने सौदी अरबच्या राकान अलसाल्मी आणि इब्राहिम अलहसन यांचा ३-१ असा पराभव केला होता. ■

# कसोटी मालिकेच्या तयारीला धार देण्यासाठी भारत 'अ' सज्ज

## भारत 'अ' वि. ऑस्ट्रेलिया 'अ' चार दिवसीय क्रिकेट सामना आजपासून

**लिंकन, २३ ऑक्टोबर**

शनिवारपासून येथे भारत 'अ' वि. ऑस्ट्रेलिया 'अ' यांच्यादरम्यान चार दिवसीय क्रिकेट सामना खेळला जाणार आहे. या सामन्याच्या माध्यमातून भारत अ संघ आपल्या कसोटी मालिकेच्या तयारीला अधिक बळकटी देण्याचा प्रयत्न करणार आहे. या सामन्यात के. एल. राहुल व यशस्वी जयस्वाल यांच्यासारखे वरिष्ठ भारतीय संघातील काही अनुभवी खेळाडूंचा समावेश असून त्यांच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. आगामी महिन्यात होणाऱ्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेच्या पृष्ठभूमीवर हा सामना अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

यष्टीरक्षक-फलंदाज ध्रुव जुरेलच्या नेतृत्वाखाली 'भारत अ' संघ 'बर्ट सटक्लिफ ओव्हल' मैदानावर आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. १९ नोव्हेंबरपासून वेलिंग्टनमध्ये सुरू होणाऱ्या वरिष्ठ संघाच्या महत्त्वपूर्ण 'जागतिक कसोटी अजिंक्यपद' (डब्ल्यूटीसी) मालिकेपूर्वी, स्थानिक परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी हा सामना खेळाडूंना एक उत्तम संधी उपलब्ध करून देईल.

संघात वरिष्ठ भारतीय फलंदाज राहुल व जयस्वालसह देवदत्त पडिक्कल, वॉशिंग्टन सुंदर, साई सुदर्शन व वेगवान गोलंदाज आकाश दीप, अंशुल कंबोज व मुकेश कुमारचा समावेश आहे.

दुखापतग्रस्त ऋषभ पंतच्या जागी यष्टीरक्षक-फलंदाज कुमार कुशाग्राला पहिल्या दोन सामन्यांसाठी संघात स्थान देण्यात आले आहे. भारत 'अ' मालिकेचे महत्त्व खूप मोठे आहे. अनेक कसोटी खेळाडू आणि संधीच्या प्रतीक्षेत असलेले खेळाडू यांच्यासाठी ही मालिका अत्यंत फायदेशीर ठरते, भारतीय वरिष्ठ संघाचे फलंदाजी प्रशिक्षक सितांशु कोटक यांनी या तीन अनधिकृत कसोटी सामन्यांचे महत्त्व विषद केले.

दुसरी आणि तिसरी अनधिकृत कसोटी अनुक्रमे ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर (क्राइस्टचर्च) आणि ७ ते १० नोव्हेंबर (लिंकन) या कालावधीत खेळवली जाणार आहे.

दुसरीकडे, न्यूझीलंड 'अ' संघही या मालिकेचा वापर आपल्या खेळाडूंना अनुभवी भारतीय संघाविरुद्ध आजमावण्यासाठी करेल. कॅन्टरबरीचा रिस मारियू पहिल्या दोन सामन्यांत न्यूझीलंड 'अ' संघाचे नेतृत्व करेल, तर तिसऱ्या सामन्यासाठी कर्णधाराची निवड नंतर केली जाईल. ◂ (वृत्तसंस्था)

# न्यूझीलंड 'अ' संघात ११ आंतरराष्ट्रीय खेळाडू



**लिंकन, २३ ऑक्टोबर**

भारत 'अ' संघाविरुद्ध होणाऱ्या तीन चार-दिवसीय सामन्यांसाठी न्यूझीलंडने १९ खेळाडूंचा मोठा संघ जाहीर केला आहे. यामध्ये सध्याचे आणि माजी अशा ११ आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा समावेश आहे. १९ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या वरिष्ठ संघांच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेपूर्वी, ही मालिका न्यूझीलंडच्या खेळाडूंसाठी लाल चेंडूने खेळल्या जाणाऱ्या क्रिकेटची उत्तम तयारी ठरेल.

पहिली अनधिकृत कसोटी २४ ते २७ ऑक्टोबर दरम्यान लिंकनमधील 'बर्ट सॅटकलिफ ओव्हल'वर खेळवली जाईल. दुसरी कसोटी ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर दरम्यान क्राइस्टचर्चमधील 'हॅगली ओव्हल'वर होईल, तर तिसरी कसोटी पुन्हा लिंकनमध्ये ७ ते १० नोव्हेंबर दरम्यान खेळविली जाईल.

पहिल्या दोन सामन्यांत कँटरबरीचा रिस मारियू न्यूझीलंड 'अ' संघाचे नेतृत्व करेल, तर तिसऱ्या सामन्यासाठी कर्णधाराची निवड नंतर केली जाईल. संघात आदि अशोक, ख्रिस्टियन क्लार्क, डीन फॉक्सक्रॉफ्ट, मॅट फिशर, मिच हे, जेडन लेनॉक्स, बेन लिस्टर, हेन्री निकोल्स आणि टिम रॉबिन्सन यांचा समावेश आहे, ज्यांनी यापूर्वी आंतरराष्ट्रीय स्तरावर न्यूझीलंडचे प्रतिनिधित्व केले आहे.

**न्यूझीलंड अ संघ**

**पहिला सामना :** रीस मारियू (कर्णधार), मॅट बॉयल, मॅक्स चू, ख्रिस्टियन क्लार्क, डीन फॉक्सक्रॉफ्ट, झॅक गिब्सन, मिच हे (यष्टीरक्षक), कर्टिस हीफी, सायमन कीन, जॅडेन लेनॉक्स, जॅरोड मॅके, टिम रॉबिन्सन, फ्रेझर शीट.

**दुसरा सामना :** रीस मारियू (कर्णधार), मॅट बॉयल, ख्रिस्टियन क्लार्क, मॅट फिशर, डीन फॉक्सक्रॉफ्ट, झॅक गिब्सन, मिच हे (यष्टीरक्षक), कर्टिस हीफी, सायमन कीन, जॅडेन लेनॉक्स, जॅरोड मॅके, टिम रॉबिन्सन, फ्रेझर शीट.

**तिसरा सामना :** आदि अशोक, मॅट बॉयल, मॅक्स चू (यष्टीरक्षक), डीन फॉक्सक्रॉफ्ट, कर्टिस हीफी, सायमन कीन, निक केली, बेन लिस्टर, रीस मारियू, जॅरोड मॅके, कॅम पॉल, हेन्री निकोल्स, फ्रेझर शीट. ◂ (वृत्तसंस्था)

# संदीपला विश्वविक्रमासह सुवर्णपदक



**नागोया, २३ ऑक्टोबर**

आयची-नागोया आशियाड पॅरा क्रीडा स्पर्धेत शुक्रवारी भारताच्या संदीपने पुरुषांच्या ४०० मीटर टी६४ शर्यतीत ५२.२८ सेकंदांची वेळ नोंदवित जागतिक विक्रम प्रस्थापित केला आणि सुवर्णपदक पटकावले. याच शर्यतीत भारताच्या अजय कुमारने कांस्यपदक मिळविले.

संदीपने ०.२६४ सेकंदांच्या 'रिॲक्शन टाइम'सह शर्यत पूर्ण केली. त्याने सौदी अरबच्या नूर अलसानापेक्षा ०.८५ सेकंदांनी आघाडी घेतली. अलसानाने ५३.१३ सेकंदांची वेळ नोंदवत रौप्यपदक जिंकले. भारताच्या अजय कुमारने ५३.६१ सेकंदांच्या वेळेसह तिसरे स्थान पटकावले. याआधी, भारताच्या निमिषा चक्कुंगलपरंबिलने महिलांच्या लांब उडी (टी४७) प्रकारात आणि प्रमोद बिजारनियाने पुरुषांच्या १५०० मीटर (टी४६) शर्यतीत रौप्यपदके जिंकली.

निमिषाने ५.३७ मीटरच्या सर्वोत्तम प्रयत्नासह रौप्यपदक मिळविले. श्रीलंकेच्या धनंजना विक्रमसिंघेने ५.५२ मीटरच्या उडीसह सुवर्णपदक पटकावले, हा एक विक्रम ठरला.

पुरुषांच्या १५०० मीटर शर्यतीत, प्रमोदने ४ मिनिटे ०९.६५ सेकंदांची वेळ नोंदवत रौप्यपदक जिंकले.

श्रीलंकेच्या पुवाकपितिकांडे पी. वाहुमपुरागेने ४ मिनिटे ०३.२५ सेकंदांच्या वेळेसह सुवर्णपदक जिंकले.

**भालाफेकमध्ये हनीला विश्वविक्रमासह सुवर्णपदक**



आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या भालाफेक (एफ ३७/३८) स्पर्धेत भारताच्या हनीने ६०.४९ मीटर अंतरासह जागतिक विक्रम प्रस्थापित करून सुवर्णपदक जिंकले. ◂ (वृत्तसंस्था)

# भारतीय गोलंदाजांना लय गवसण्याची गरज

**क्राईस्टचर्च, २३ ऑक्टोबर**

सलामीच्या सामन्यात फलंदाजांनी केलेल्या दमदार कामगिरीमुळे भारताचा बचाव झाला खरा, परंतु शनिवारी येथे होणाऱ्या दुसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात भारतीय गोलंदाजांना आपला सूर गवसणे व न्यूझीलंडच्या आक्रमक फलंदाजांना रोखण्यासाठी मार्ग शोधणे आवश्यक आहे. फलंदाजीसाठी पोषक असलेल्या क्राईस्टचर्चच्या धावपट्टीवर प्रभावी कामगिरी करण्यासाठी भारतीय गोलंदाजांवर दबाव वाढला आहे.

नुकत्याच झालेल्या सामन्यांत गोलंदाजांच्या निराशाजनक कामगिरीनंतर फलंदाजांनी भारताला सावरून घेतले. २२६ धावांचा यशस्वी पाठलाग करून भारताने मालिकेत १-० अशी महत्त्वाची आघाडी घेतली असली, तरी या सामन्याने संघातील अशा काही त्रुटी समोर आणल्या आहेत. त्याचा फटका पाच सामन्यांच्या या मालिकेतील उर्वरित सामन्यांत भारतीय संघाला बसू शकतो.

हार्दिक पांड्या दुखापतींमुळे संघाबाहेर असल्याने भारतासाठी पाचवा व सहावा गोलंदाज निवडणे ही चिंतेची बाब ठरली आहे.

गुरुवारी नितीश रेड्डीला एकही बळी मिळाला नाही व त्याने आपल्या चार षटकांत ४० धावा दिल्या; तर नमन धीरला गोलंदाजी करण्याची संधीच





मिळाली नाही, मात्र त्याने फलंदाजीमध्ये सामना जिंकून देणारी खेळी केली.

मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताच्या मुख्य गोलंदाजांचीही चांगलीच धुलाई झाली. सुमारे भुवनेश्वर कुमारला आपला सर्वोत्तम फॉर्म दाखवता आला नाही. न्यूझीलंडचे सलामीवीर फिन ॲलन व टिम सिफर्टने पॉवरप्लेमध्ये भुवनेश्वर व अर्शदीपच्या गोलंदाजीवर सहजपणे चौकार वसूल केले.

येथील खेळपट्टी फलंदाजीसाठी अत्यंत पोषक असण्याची शक्यता आहे, त्यामुळे गोलंदाजांना चूक करण्यास अजिबात वाव नाही. अक्षर पटेलवरही दबाव असेल, कारण पहिल्या टी-२० सामन्यात त्याने सर्वाधिक धावा दिल्या होत्या.

आम्ही ज्या कडक टप्प्यावर गोलंदाजी करायला हवी होती, त्याऐवजी आम्ही थोडी पुढे गोलंदाजी केली, असे कर्णधार श्रेयस अय्यरने चार गड्यांनी विजय मिळविल्यानंतर मान्य केले. श्रेयसने २८ चेंडूत ४२ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली होती.

**ईशानच्या जागी वैभव**

भारत व न्यूझीलंडच्या चाहत्यांना कदाचित वैभव सूर्यवंशी मैदानात फलंदाजी करताना पाहायला मिळेल. ईशान किशन दुखापतग्रस्त झाल्यामुळे अंतिम अकरा खेळाडूंच्या संघात ही जागा निर्माण झाली आहे. १५ वर्षीय वैभव, अभिषेक शर्मासोबत सलामीला फलंदाजी करेल अशी अपेक्षा आहे, तर सॅमसन तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी येईल. तिलक वर्मा पुन्हा आपल्या मूळ पाचव्या क्रमांकावर परतण्याची शक्यता आहे.

न्यूझीलंडचे वेगवान गोलंदाज मॅट हेन्री व ॲडम मिल्नेने त्यांच्या सुरुवातीच्या स्पेलमध्ये चेंडूला चांगला स्विंग दिला, परंतु त्यांचा टप्पा सॅमसन व अभिषेकला अडचणीत आणण्याइतका प्रभावी नव्हता.

मिचेल सँटनरच्या संघासमोरचे सर्वात मोठे आव्हान म्हणजे फॉर्ममध्ये असलेल्या भारतीय फलंदाजांच्या वरच्या फळीला रोखून धरणे आहे. सॅमसन व अभिषेकने पॉवरप्लेमध्ये न्यूझीलंडच्या गोलंदाजांवर हल्ला चढवत ९४ धावा कुटल्या. सँटनर व फिरकी गोलंदाज मायकेल ब्रेसवेलने मधल्या षटकांमध्ये भारतीय फलंदाजांना अडचणीत आणले होते; आता ते पुन्हा एकदा प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व राखण्याचा प्रयत्न करतील. भारतीय फलंदाजीची खोली पाहता, न्यूझीलंडला सामन्यात टिकून राहण्यासाठी निश्चितपणे अधिक चांगली गोलंदाजी करावी लागेल. ◂ (वृत्तसंस्था)

**भारत-न्यूझीलंड टी-२० दुसरा सामना**

**स्थळ :** क्राईस्टचर्च
**वेळ :** दुपारी १२.३० वाजतापासून (भारतीय प्रमाणवेळेनुसार)
**थेट प्रसारण :** सोनी स्पोर्ट्सवर

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## सोलापूरमध्ये रिक्षांसाठी मॅन्युअल फिटनेस तपासणीची मागणी

**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**

शहरात ऑटोमेटेड टेस्टिंग स्टेशन सुरू झाल्यापासून रिक्षांचे फिटनेस पासिंग करून घेणे अत्यंत अवघड झाले आहे. यामुळे रिक्षाचालकांना मोठ्या आर्थिक आणि मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर, सोलापूरमधील रिक्षांसाठी शासनाच्या नियमानुसार पूर्वीप्रमाणेच 'मॅन्युअल फिटनेस तपासणी' सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी वाहतूक संघटना संयुक्त महासंघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने करण्यात आली आहे. सोलापूरमधील स्थानिक हवामानामुळे रिक्षाच्या वायपरचा वापर अत्यंत कमी होतो, ज्यामुळे दीर्घकाळ वापर न झाल्याने या यंत्रणेत बिघाड संभवतो. तसेच शहरातील खराब रस्त्यांमुळे रिक्षांच्या टायरची मोठ्या प्रमाणावर झीज होते. या अशा तांत्रिक व स्थानिक कारणांमुळे ऑटोमेटेड चाचणीत रिक्षा पास होण्यात अडचणी येत असून चालकांवर अतिरिक्त खर्चाचा भार पडत आहे. रिक्षाचालक हे स्वतःच्या कष्टावर कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे घटक आहेत. त्यामुळे रिक्षांचा प्रत्यक्ष वापर, सुरक्षितता आणि सोलापूरच्या स्थानिक परिस्थितीचा सकारात्मक विचार करून स्वतंत्र व व्यावहारिक तपासणी पद्धत निश्चित करावी. शासनाने रिक्षाचालकांना दिलासा देणारा योग्य निर्णय घ्यावा, असे आवाहन महासंघाचे प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद यांनी केले आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री, परिवहन मंत्री आणि परिवहन विभागाला ईमेलद्वारे व उपजिल्हाधिकाऱ्यांना प्रत्यक्ष निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे.

## दक्षिण आफ्रिकेत मोहम्मद अयाज सुरांचा सोलापूरी झेंडा फडकवणार

**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**

महाराष्ट्राचे महागायक विजेते आणि सोलापूरचे सुपुत्र मोहम्मद अयाज २६ ऑक्टोबर रोजी दक्षिण आफ्रिकेच्या संगीत दौऱ्यावर रवाना होत आहेत. आपल्या मधुर आवाजातून भारतीय संगीताची परंपरा जागतिक स्तरावर पोहोचवणे हा या दौऱ्याचा मुख्य उद्देश आहे. गेल्या अनेक वर्षांपासून संगीत क्षेत्रात कार्यरत असलेल्या अयाज यांनी गझल, भक्तीगीते आणि देशभक्तीपर गीतांच्या माध्यमातून रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. त्यांनी आशा भोसले, अनुराधा पौडवाल, सुरेश वाडकर यांसारख्या दिग्गज कलाकारांसोबत काम केले आहे. त्यांना महाराष्ट्र श्री सन्मान मिळाला असून, ते सोलापूर जिल्ह्याचे नशामुक्त भारत अभियानाचे ब्रँड ॲम्बेसेडर देखील आहेत. हा आंतरराष्ट्रीय दौरा सोलापूरसह संपूर्ण महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानास्पद ठरणार आहे.





## प्रलंबित पायाभूत सुविधांच्या प्रश्नांवर एमआयडीसी अधिकाऱ्यांसोबत बैठक

**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**

चिंचोळी औद्योगिक क्षेत्रातील पायाभूत सुविधांशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्नांचे निराकरण करून त्यावर तातडीने उपाययोजना करण्याच्या दृष्टीने सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांसोबत आज महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस एमआयडीसी विभाग, सांगलीचे कार्यकारी अभियंता सु. वि. कोलप, उपअभियंता प्रदीप खंदारे तसेच एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी श्री. शिवाजी राठोड उपस्थित होते.

बैठकीदरम्यान सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष डी. राम रेड्डी यांनी चिंचोळी औद्योगिक क्षेत्रातील विविध प्रलंबित प्रश्नांची सद्यस्थिती मांडली. या प्रश्नांमुळे उद्योजकांना भेडसावणाऱ्या अडचणी विशद करताना औद्योगिक क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक पायाभूत सुविधांची उपलब्धता आणि प्रलंबित प्रश्नांचे प्राधान्याने निराकरण होणे गरजेचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. यावेळी असोसिएशनच्या वतीने विविध प्रलंबित प्रश्नांबाबत तयार करण्यात आलेल्या निवेदनातील मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्राशी निगडित विषयांवर स्वतंत्र पत्रे त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली, जेणेकरून संबंधित विषयांवर आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक कार्यवाही करता येईल. तसेच काही प्रश्न हे धोरणात्मक स्वरूपाचे असल्याने ते संबंधित वरिष्ठ यंत्रणांकडे आवश्यक शिफारशींसह पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आले आहेत. या विषयांवरही असोसिएशनच्या वतीने वरिष्ठ स्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार आहे. बैठकीत उपस्थित एमआयडीसी अधिकाऱ्यांनी मांडण्यात आलेल्या प्रश्नांबाबत आवश्यक कार्यवाही करण्यासाठी सकारात्मक भूमिका दर्शविली. चिंचोळी औद्योगिक क्षेत्रातील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि उद्योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी संबंधित विभागांमध्ये समन्वय साधून पुढील कार्यवाही होणे अपेक्षित आहे. चिंचोळी औद्योगिक क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास, उद्योगांसाठी आवश्यक पायाभूत सुविधांची उपलब्धता आणि उद्योजकांना भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण या उद्देशाने सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन सातत्याने कार्यरत आहे. या अनुषंगाने संबंधित शासकीय व प्रशासकीय यंत्रणांकडे नियमित पाठपुरावा सुरू ठेवण्यात येईल, असे असोसिएशनच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

# जि.प.च्या २४१ कोटींच्या निधीचे नियोजन

**सिमेंट रस्त्यांऐवजी शाळा दुरुस्ती, जलसंधारणाला प्राधान्य; दुष्काळी परिस्थितीमुळे कामांच्या निकषांत बदल**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑक्टोबर-**

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील विकासकामांच्या प्राधान्यक्रमात बदल करण्यात येणार असून, सिमेंट रस्ते आणि नवीन बांधकामांऐवजी शाळा दुरुस्ती, जलसंधारण, आरोग्य व कृषीविषयक कामांवर भर दिला जाणार आहे. जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) माध्यमातून जिल्हा परिषद सदस्यांनी सुचवलेल्या विविध विकासकामांसाठी २४१ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे निधीच्या प्रतीक्षेत असलेल्या सदस्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

जिल्ह्यातील ग्रामीण भागात पायाभूत सुविधा आणि मूलभूत सोयीसुविधांसाठी निधीची मागणी सातत्याने होत आहे. मात्र, निवडणुकीची आचारसंहिता आणि शासनस्तरावरील मंजुरीच्या प्रक्रियेमुळे विकासकामांसाठी निधी उपलब्ध होण्यास विलंब झाला. आता विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर निधी वितरणाचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे. जिल्हा नियोजन समितीकडे सादर केलेल्या कामांच्या यादीनुसार हा निधी उपलब्ध होणार आहे.

**पाण्याचा वापर लक्षात घेऊन कामांची निवड**

दुष्काळी स्थिती लक्षात घेता अधिक पाणी वापरणाऱ्या कामांना मंजुरी दिली जाणार नाही. सिमेंट रस्ते आणि नवीन बांधकामांना तूर्तास वगळण्यात येणार आहे. नवीन शाळा खोल्या बांधण्याऐवजी अस्तित्वातील शाळांच्या दुरुस्तीला प्राधान्य दिले जाणार आहे. तसेच जलसंधारण, आरोग्य, शिक्षण, समाजकल्याण आणि कृषी विभागांशी संबंधित कामांचा निधीच्या नियोजनात समावेश असेल.

**वाटपाकडे सदस्यांचे लक्ष**

२४१ कोटींचा निधी उपलब्ध होणार असला, तरी प्रत्यक्षात कोणत्या मतदारसंघातील किती कामांना मंजुरी मिळते, याबाबत उत्सुकता आहे. कामांची निवड आणि प्रशासकीय मंजुरीनंतरच निधीचा लाभ संबंधित भागांना मिळणार आहे.

दरम्यान, जिल्हा परिषदेच्या सेस निधीसह १५ व्या वित्त आयोगाच्या निधीच्या वाटपाबाबत अद्याप स्पष्टता नसल्याने सदस्यांसमोरील प्रश्न कायम आहेत.



> सिमेंट रस्ते आणि नवीन बांधकामांच्या निधीबाबत पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून निर्णय घेतला जाणार आहे.
> **- कुशल जैन,**
> **जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी**



## तुळजाभवानीच्या दर्शनाला जाणाऱ्या भाविकांसाठी मोफत आरोग्यसेवा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑक्टोबर-**

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त तुळजापूर येथील कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी पायी जाणाऱ्या भाविकांसाठी श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्राच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार केंद्र सुरू करण्यात आले आहे.

या केंद्राचे उद्घाटन संस्थेचे प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली आणि सोलापूरचे महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी संस्थेचे चेअरमन डॉ. माणिक गुर्रम, व्हाइस चेअरमन राजेशम येमूल, रमेश विडप, डॉ. विजयकुमार आरकाल, आनंद चंदनशिवे, डॉ. लता पाटील, श्रीनिवास क्यातम, लक्ष्मीनारायण कुचन, डॉ. सुधाकर गुंडेली, राजू हौशेट्टी आदी उपस्थित होते.

## महापालिकेच्या ५६ अधिकारी, कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

**वेळेत काम न केल्याबद्दल ३७ हजारांचा दंड**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**

आपली तक्रार/ माय सोलापूर ॲप व लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अर्ज मुदतीत निकाली न काढल्याप्रकरणी सोलापूर महापालिकेने ५६ अधिकारी व कर्मचाऱ्यांना एकूण ३७ हजार २०० रुपयांचा दंड करण्यात आला आहे. संबंधितांकडून नियमानुसार दंड वसूल करण्याचे आदेश सामान्य प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त युवराज गाडेकर यांनी काढले आहेत.

महापालिकेच्या आपली तक्रार पोर्टल, माय सोलापूर ॲप तसेच लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत प्रलंबित अर्जांची दखल घेत प्रशासनाने संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे. मुदतीत तक्रारी व अर्ज निकाली न काढणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून नियमानुसार दंड वसूल करण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले आहेत. महापालिकेने नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण व्हावे, यासाठी ऑनलाइन तक्रार प्रणाली सुरू केली आहे. तसेच लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत १३६ सेवा अधिसूचित करण्यात आल्या आहेत. या सेवांशी संबंधित अर्ज वेळेत निकाली काढणे व पोर्टलवरील माहिती अद्ययावत ठेवण्याच्या सूचना यापूर्वीही देण्यात आल्या होत्या. मात्र अद्याप अनेक तक्रारी व अर्ज प्रलंबित असल्याचे आढळून आल्याने कारवाई केली आहे. आपली तक्रार/ माय सोलापूर ॲप वर प्रकरणे प्रलंबित ठेवल्याप्रकरणी २६ कर्मचाऱ्यांना ८ हजार २५० रुपये तसेच लोकसेवा अधिनियम हक्क अंतर्गत अर्ज प्रलंबित ठेवल्याने ३० कर्मचारी व अधिकाऱ्यांना २८ हजार ९५० रुपये असे एकूण ५६ कर्मचारी व अधिकाऱ्यांना एकूण ३७ हजार २०० रुपये दंड आकारण्यात आला आहे. हा दंड संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या माहे ऑक्टोबर पेड इन नोव्हेंबरच्या वेतनातून वसूल करावे, असे सहाय्यक आयुक्त युवराज गाडेकर यांनी आदेशात नमूद केले आहे.



## सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**

अन्नदान सेवा सोसायटीतर्फे नुकताच सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार सोहळा झाला. ज्येष्ठ उर्दू - मराठी साहित्यिक अय्युब अहमद नल्लामंदू यांच्या अध्यक्षतेखाली व जागतिक कीर्तीचे डिसले गुरुजी यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

श्री राष्ट्र संत तुकडोजी महाराज महाविद्यालयाची मुख्याध्यापिका अश्विनी चव्हाण, टवेंटी - टवेंटी शुगर लातूरचे व्हा. चेअरमन समीर भागवत सलगर, प्रा. पी. पी. कुलकर्णी, सखुबाई हिराचंद नेमचंदच्या मुख्याध्यापिका नीता येरमाळकर, दिलीप माने सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सैफन शेख याची प्रमुख उपस्थिती होती. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत दीपप्रज्वलनाने कार्यक्रमास प्रारंभ केला. डॉ. जैनोदीन पटेल यांनी प्रास्ताविक केले. डॉ. वाहेद जमादार, इरफान लालकोट, डॉ. हारुन बागबान, डॉ. आसीफ इक्बाल यांनी सर्व प्रमुख पाहुण्याचे परिचय करत सत्कार केले. कवयित्री शाहीन सदफ यांनी सावित्री फुले यांच्या कार्यावर कविता सादर केले. सूत्रसंचालन डॉ. ए.ए. विजापुरे यांनी केले तर आभार डॉ. वाहेद जमादार यांनी मानले.

**यांचा झाला सन्मान**

आदर्श शाळा सोशल उर्दू हायस्कूल घरकुल, आदर्श मुख्याध्यापक डॉ. हारून बागबान, डॉ आसिफ इक्बाल, मसररत बिजापूरे, तसेच आदर्श शिक्षक म्हणून शाफिया कौसर शौकत अली शेख, शबाना शाहभाई, फरहान नल्लामंदू, तहसीन कोतकुंडे, शाहीनशकीलनल्लामंदू,आफ्रिन पटेल, तनवीर अम्नान बिजापूरे, आर्शिया होटगी, शाहीन शेख, रिजवाना प्यारे, शमशाद शामलिक, फौजिया शेख, असरार अबुबकर नल्लामंदू, नसीमा शेख, बासित बागलकोटे, इरफान बानकरी, आसीया कौसर बिजापूरे, मुशिरा पानगल, फरहाना पठान, फौजिया बागबान, सयाम सय्यद, अनिसा शेख, उमर फारूक बिद्री, बीबी आयेशा मनियार, राहत डोणगावकर, नजमा चांदा, अस्मा पठाण, निलोफर शेख,माजीद बडेघर , बिबी शबनम नदाफ, रिजवाना बेलीफ, आरेफा शेख, तस्किन माजीद चांदा, हिना कौसर देशमुख, आलिया परवीन शेख, फिरोजा जमादार, विकारूनीसा कोटी, इमरान काझी, हमिदा बागवान, इसाक बाटगर, परविन सय्यद, सबिहा मुजावर, रियाज सय्यद, बदरुनिसा दफेदार यांना स्मृतिचिन्ह शाल बुके देऊन गौरवविण्यात आले.

## ए. जी. पाटील पॉलिटेक्निक मध्ये कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**

येथील ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिटयूटमध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाद्वारे कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय व राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या निर्देशांनुसार महाविद्यालयात दशभुजा रुपी न्यायशक्ती - जागर नारीशक्तीचा: ती चे विधी कवच या विशेष अभियानांतर्गत कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात उपस्थितांचे स्वागत, दीपप्रज्वलन करून झाली. प्राध्यापिका एल. एस. बिराजदार यांनी प्रास्ताविक केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्या. अमोलकुमार अ. देशपांडे, सारथी फाउंडेशनचे संस्थापक सचिव रामचंद्र वाघमारे, प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले, उपप्राचार्य एस. के. मोहिते आदींच्या उपस्थितीत झाले. सारथी फाउंडेशनचे संस्थापक सचिव रामचंद्र वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना नशा आणि अंमली पदार्थांच्या सेवनाचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम तसेच संबंधित कायद्यांविषयी माहिती दिली.

मुख्य वक्ते न्यायाधीश अमोलकुमार देशपांडे यांनी युवक-युवतींना बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण करणारा पोक्सो कायदा आणि शैक्षणिक संस्थांमधील रॅगिंग प्रतिबंधक कायदा यांवर मार्गदर्शन केले. प्राध्यापिका एल. एस बिराजदार यांनी आभार मानले. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.



## पुल्ली कन्या प्रशालेत ८३ विद्यार्थिनींना मोफत चष्म्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभाग, सोलापूर, शंकरशेठ साबळे नेत्रालय, आणि एच. व्ही.देसाई आय इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने सौ. भू.म.पुल्ली कन्या प्रशालेतील विद्यार्थिनींसाठी मोफत नेत्रतपासणी उपक्रम राबविण्यात आला होता. या उपक्रमांतर्गत नेत्रतपासणी केलेल्या विद्यार्थिनींपैकी ८३ विद्यार्थिनींना आज मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले.

हा उपक्रम केंद्रीय विशेष शिक्षक रूपाली कैंची यांच्या प्रयत्नातून व प्रोजेक्ट को-ऑर्डिनेटर डॉ. प्रियांका कांबळे व त्यांचे सहकारी यांच्या सहकार्याने आणि उपमुख्याध्यापक तुकाराम श्रीराम व पर्यवेक्षक परमेश्वर बाबळसुरे उपस्थितीत संपन्न झाले. मुख्याध्यापिका उमा कोटा यांनी आभार मानले.

## केसरी टूर्सला सलग इंडिया ट्रॅव्हल अवॉर्ड्सचा सन्मान

**'बेस्ट इंटरनॅशनल ग्रुप टूर ऑपरेटर' पुरस्काराने गौरव; संचालिका झेलम चौबळ पाटील यांनी स्वीकारला पुरस्कार**




**तभा वृत्तसेवा,**
**नवी दिल्ली, दि. २३ ऑक्टोबर-**

केसरी टूर्सला इंडिया ट्रॅव्हल अवॉर्ड्स २०२६ मध्ये 'बेस्ट इंटरनॅशनल ग्रुप टूर ऑपरेटर' या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. सलग तिसऱ्या वर्षी हा सन्मान प्राप्त करत केसरीने आंतरराष्ट्रीय समूह सहलींच्या क्षेत्रातील आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीची मोहोर उमटविली आहे. केसरी टूर्सच्या वतीने संचालिका झेलम चौबळ पाटील यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

पर्यटन आणि आदरातिथ्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या संस्था व व्यक्तींना डीडीपी ग्रुपतर्फे आयोजित इंडिया ट्रॅव्हल अवॉर्ड्समध्ये दरवर्षी सन्मानित करण्यात येते. ऑनलाइन मतदान आणि परीक्षक मंडळाच्या मूल्यमापनाच्या आधारे विविध श्रेणींतील पुरस्कार विजेत्यांची निवड केली जाते. आंतरराष्ट्रीय समूह सहलींच्या आयोजनासाठी केसरी टूर्सला मिळालेला हा पुरस्कार संस्थेसाठी अभिमानाचा क्षण आहे.

जगभरातील विविध पर्यटनस्थळांचा अनुभव देताना सहलींचे सुयोग्य नियोजन, दर्जेदार सेवा आणि पर्यटकांच्या अपेक्षांना प्राधान्य देण्याची भूमिका केसरीने सातत्याने जपली आहे. पर्यटकांचा विश्वास आणि केसरी परिवारातील प्रत्येक सदस्याचे योगदान या वाटचालीत मोलाचे ठरले आहे. सलग तिसऱ्या वर्षी मिळालेल्या या पुरस्कारामुळे पर्यटकांना अविस्मरणीय प्रवासानुभव देण्याच्या केसरीच्या प्रयत्नांना अधिक बळ मिळाले आहे.

या यशाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना झेलम चौबळ पाटील म्हणाल्या, सलग तिसऱ्या वर्षी हा पुरस्कार केसरी टूर्सला मिळत असल्याचा आम्हाला मनापासून आनंद आहे. गेल्या ४२ वर्षांपासून केसरीने विश्वासाचा वारसा जपला आहे आणि याच विश्वासाच्या बळावर आमची वाटचाल अधिक भक्कम होत आहे. या प्रवासात साथ देणारे आमचे पर्यटक, विश्वासू भागीदार, प्रत्येक केसरीयन आणि सर्व हितचिंतकांचे आभार. हा सन्मान साजरा करताना पर्यटकांना दर्जेदार सेवा, संस्मरणीय अनुभव आणि आनंददायी सहली देण्याची बांधिलकी केसरी टूर्सने पुन्हा अधोरेखित केली आहे.

**केसरी टूर्सविषयी :**

१९८४ साली भारतीय कौटुंबिक सहलींच्या माध्यमातून केसरी टूर्सची सुरुवात झाली. केवळ १३ पर्यटकांसह राजस्थानच्या पहिल्या सहलीतून सुरू झालेला हा प्रवास आज अष्टविनायकापासून अंटार्क्टिकापर्यंत विस्तारला आहे. केसरीचा हा ४२ वर्षांचा प्रवास म्हणजे पर्यटकांनी दाखवलेल्या विश्वासाची पोचपावती आहे. लाखो पर्यटकांच्या पाठिंब्याने आणि आशीर्वादांनी केसरी टूर्सने पर्यटन क्षेत्रातील एक विश्वासार्ह आणि अग्रगण्य नाव म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे.

मुंबई आणि महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता केसरीच्या शाखांचे जाळे संपूर्ण भारतात विस्तारले आहे. भारतातील सहलींबरोबरच युरोप, अमेरिका, मिडल ईस्ट, साऊथ ईस्ट एशिया, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि अंटार्क्टिका अशा जगभरातील विविध प्रदेशांमध्ये केसरी टूर्स सहलींचे आयोजन करते. महिलांसाठी खास 'माय फेअर लेडी टूर्स', नवविवाहितांसाठी 'हनिमून टूर्स', ज्येष्ठांसाठी 'सेकंड इनिंग टूर्स', धार्मिक यात्रांसाठी 'मरीगोल्ड टूर्स', कॉर्पोरेट क्षेत्रासाठी 'MICE टूर्स', विद्यार्थ्यांसाठी 'स्टुडंट्स स्पेशल टूर्स', तर वैयक्तिक आवडीनुसार 'केसरी सिलेक्ट'च्या कस्टमाईज्ड टूर्स, असे विविध पर्याय केसरी उपलब्ध करून देते. तसेच, 'केसरी अवेडिंग्स'द्वारे पसंतीच्या पर्यटनस्थळी विवाहसोहळ्यांचे आयोजनही केले जाते. प्रवासोपयोगी विविध वस्तूंच्या खरेदीसाठी केसरीचे ऑनलाइन स्टोअर उपलब्ध आहे. यासोबतच, जगभरातील क्रूझ पॅकेजेसच्या बुकिंगसाठी केसरीने नुकतीच 'केसरी क्रूझ' ही सेवा सुरू केली आहे.

# तहसीलदारांना दिली जीवे मारण्याची धमकी; राहुल गायकवाडवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑक्टोबर-**

बनावट सह्या व जावक क्रमांक टाकून कंत्राटी कामाची देयके मंजूर करून शासकीय रकमेचा अपहार केल्याप्रकरणी व शासकीय कामात अडथळा आणून तहसीलदारांना जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात एका विरुद्ध अपहार, खंडणी, शासकीय कामात अडथळा केल्याचा गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राहुल शांतीकुमार गायकवाड (रा. ए ४४, अभिषेक नगर, मुरारजी पेठ, सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत तहसीलदार किरण दिगंबर जमदाडे (वय-५५, रा.वडाळा, ता.उत्तर सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. हा प्रकार २८ ऑक्टोबर २०२४ ते २१ ऑक्टोबर २०२६ या दरम्यान सोलापूर येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात घडला.




यातील आरोपी राहुल गायकवाड याने वरील कालावधीत बनावट सह्या व कार्यालयाचे बनावट जावक क्रमांक टाकून ती कागदपत्रे खरी असल्याचे भासवून उप जिल्हाधिकारी कार्यालयात सादर केली. रोजगार हमी योजना कंत्राटी तत्वावर दक्षिण सोलापूर तहसीलदार कार्यालयात काम केल्याबाबतची देयके मंजूर करून शासकीय रकमेचा अपहार करून शासनाची फसवणूक केली. तसेच सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये यातील आरोपीने पुरवलेल्या वाहनाची देयके नियमानुसार आरोपीला पूर्तता करून दिली होती. मात्र आरोपीने त्याच्या मागणीप्रमाणे जास्तीचे १६ लाख रुपये मंजूर केले नाहीत, तसेच त्याच्या पत्नीस ग्रामसेवक पदावरून निलंबित केल्याचा राग आपल्या मनात धरला होता.

यातील फिर्यादी हे २१ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास निवडणूक शाखा दक्षिण सोलापूर तहसील कार्यालय येथे निवडणूक पूर्वतयारीचे काम करीत असताना आरोपीने तेथे येऊन 'माझ्या बिलाचे काय केले?' असा जाब विचारला. तेव्हा फिर्यादीने नियमानुसार काम झाल्याचे सांगताच, आरोपीने टेबलवरील निवडणुकीची कागदपत्रे खाली फेकून दिली. तसेच फिर्यादी हे दिव्यांग असल्याचे माहित असताना देखील आरोपीने दिव्यांगाबाबत घृणास्पद व अपमानदर्शक शब्द वापरून, 'मागणीप्रमाणे पैसे न दिल्यास खल्लास करीन व तुझ्या घरच्यांना सोडणार नाही' अशी धमकी देऊन पैशांची मागणी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम १३२, ३०८(४), २२९, ३१८(४), ३३६(२), ३३६(३), ३४०(२), ३५१(२), ३५२, लोकप्रतिनिधी अधिनियम कलम १३६(१)(ख) व दिव्यांग व्यक्ती अधिनियम कलम १२(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'उजनी'तील डेटा सेंटर प्रकल्पांबाबत काकोडकर समितीची पुनर्रचना करा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२३ ऑक्टोबर-**



उजनी धरण परिसरातील प्रस्तावित डेटा सेंटर, ग्रीन हायड्रोजन, फ्लोटिंग सोलर, बॅटरी स्टोरेज आणि अणुऊर्जा प्रकल्पांच्या संभाव्य परिणामांचा अभ्यास करण्यासाठी नियुक्त डॉ.अनिल काकोडकर समितीची पुनर्रचना करावी. नागरिकांच्या प्रश्नांना 'गैरसमज' न मानता वस्तुनिष्ठ पुराव्यांच्या आधारे त्यांचे निराकरण करावे, अशी मागणी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी महाराष्ट्र राज्याच्या उद्योग मंत्रालयाच्या प्रधान सचिवांकडे एका निवेदनाद्वारे केली.

उजनी धरण हे सोलापूर जिल्ह्यातील पिण्याचे पाणी, सिंचन, शेती आणि मत्स्यव्यवसायासाठी महत्त्वाचे असल्याने प्रस्तावित प्रकल्पांचा जलसुरक्षा व पर्यावरणावर होणारा एकत्रित परिणाम शास्त्रीय पद्धतीने तपासावा. या समितीत जलसंपदा, पर्यावरण, कृषी, मत्स्यव्यवसाय आणि अणुसुरक्षा क्षेत्रांतील स्वतंत्र तज्ज्ञांसह शेतकरी, मच्छिमार व प्रकल्पप्रभावित नागरिकांचा समावेश करावा. काकोडकर समितीचा मसुदा अहवाल सार्वजनिक करुन जनसुनावणी घ्यावी, असेही या निवेदनात म्हटले आहे.

# दिवाळीपूर्वीच ग्रामसेवकांना मिळणार पदोन्नतीची भेट

## उत्कृष्ट कामासाठी 'आदर्श ग्रामसेवक' पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑक्टोबर-**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या माध्यमातून गावांच्या विकासाला गती देण्यासाठी ग्रामसेवकांनी झोकून देऊन काम करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांनी केले.

दरम्यान, जिल्ह्यातील ग्रामसेवकांना दिवाळीपूर्वीच कालबद्ध पदोन्नती आणि आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून, उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामसेवकांना 'आदर्श ग्रामसेवक' पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. गावाच्या विकासात योगदान देणाऱ्या आणि प्रशासकीय कामकाजात कार्यक्षमता दाखविणाऱ्या ग्रामसेवकांना आदर्श ग्रामसेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. यासाठी गावातील सामाजिक कार्य, दप्तराची अद्ययावत नोंद, घरपट्टी व पाणीपट्टीची शंभर टक्के वसुली, नियमित पाणीपुरवठा आणि गाव तंटामुक्त ठेवण्यासाठी केलेले प्रयत्न या बाबींना महत्त्व दिले जाणार आहे.पेपरलेस कामकाज, मनरेगाअंतर्गत कामांची प्रभावी अंमलबजावणी, सर्व नोंदवह्या व्यवस्थित ठेवणे आणि शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, अशा विविध निकषांवर ग्रामसेवकांच्या कामगिरीचे मूल्यमापन होणार आहे. आदर्श ग्रामसेवक पुरस्कारासाठी तालुकास्तरावरून कामगिरीचे अहवाल मागविले आहेत. पैकी दोन तालुक्यांचे अहवाल प्राप्त असून, उर्वरित तालुक्यांचे अहवाल २ तारखेपर्यंत सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

### पदोन्नतीचे प्रस्ताव अंतिम छाननीत

ग्रामसेवकांना कालबद्ध पदोन्नती आणि आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यासाठी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. हे प्रस्ताव प्राप्त झाले असून, सध्या त्यांची अंतिम छाननी सुरू आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र ग्रामसेवकांना योजनेचा लाभ दिला जाणार आहे. त्यामुळे दिवाळीपूर्वी ग्रामसेवकांना आर्थिक लाभासह पदोन्नतीची आनंदवार्ता मिळण्याची शक्यता आहे.

# बालाजी अमाईन्सला 'बेस्ट ग्रीन प्रॉडक्ट'साठी प्रतिष्ठेचा एफआयसीसीआयचा पुरस्कार

## डायमिथाइल कार्बोनेटच्या स्वदेशी उत्पादनाची दखल

## देशाच्या रासायनिक उद्योगातील आत्मनिर्भरतेला बळ




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**

बालाजी अमाईन्स लिमिटेडला फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री तर्फे प्रदान करण्यात येणारा एफआयसीसीआयचा केमिकल्स अँड पेट्रोकेमिकल्स पुरस्कार २०२६ 'बेस्ट ग्रीन प्रॉडक्ट' या श्रेणीत प्रदान करण्यात आला. स्वदेशी रासायनिक उत्पादनांच्या विकासासाठी आणि शाश्वत औद्योगिक उपाययोजनांसाठी कंपनीने दिलेल्या योगदानाची या पुरस्काराद्वारे दखल घेण्यात आली.

१९२७ मध्ये स्थापन झालेली फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ही भारतातील प्रमुख औद्योगिक व व्यावसायिक संघटनांपैकी एक आहे. औद्योगिक विकास, व्यापारवृद्धी आणि आर्थिक प्रगतीला चालना देण्यात या संघटनेची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. FICCI तर्फे प्रदान करण्यात येणारे केमिकल्स अँड पेट्रोकेमिकल्स पुरस्कार रासायनिक व पेट्रोकेमिकल क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी आणि योगदानाची दखल घेऊन प्रदान केले जातात

मुंबई येथील आयटीसी मराठा हॉटेलमध्ये २२ ऑक्टोबर रोजी झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात भारत सरकारच्या रसायने आणि पेट्रोकेमिकल्स विभाग, रसायने आणि खते मंत्रालयाचे, सचिव तेजवीर सिंग यांच्या हस्ते बालाजी अमाईन्स लिमिटेडचे वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी विनोद चुंगे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी डॉ. जी. व्यंकटेश सहसचिव (पेट्रोकेमिकल्स), रसायने आणि पेट्रोकेमिकल्स विभाग व दीपांकर आरोन सहसचिव (रसायने) रसायन आणि पेट्रोकेमिकल विभाग, रसायन आणि खते मंत्रालय उपस्थित होते याच श्रेणीत एचपीसीएल-मित्तल एनर्जी लिमिटेड या कंपनीलाही पुरस्काराने गौरविण्यात आले.

# कर्जाचा बोझा व जप्ती असलेल्या घराची केली विक्री; दोघांविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑक्टोबर-**

कर्जाचा बोझा व जपती असलेल्या दहिटणे येथील घराची विक्री करून १० लाख रुपयाची फसवणूक केल्याप्रकरणी एका बहिण भावाविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रजनी सुभाष तंबाके व कल्येश सुभाष तंबाके अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपी बहीण भावाचे नाव असून याबाबत अंकुश दिगंबर कुंटला (रा. इंदिरा नगर, नळदुर्ग, धाराशिव) यांनी फिर्याद दिली आहे.

दि.१ फेब्रुवारी २०२४ ते २२ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत मेहता नगर, दहिटणे, सोलापूर येथील प्लॉट नं. ४४, सर्व्हे नं. ३४/२ मधील घराबाबत हा प्रकार घडला.




फिर्यादीचा विश्वास संपादन करून वरील आरोपींनी दहिटणे येथील त्यांच्या घरावर ज्ञानदीप फायनान्स व शिवकृपा पतपेढी, मुंबई यांचे कर्जाचा बोझा व जपती आली असतानाही, ती महत्त्वाची माहिती फिर्यादीस न देता आरोपींनी ते घर १० लाख रुपये घेऊन फिर्यादीला विक्री केले. दरम्यान आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर फिर्यादीने आरोपीकडे पैसे मागितले असता आरोपीने फिर्यादीला पैसे परत न करता फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांना झेड प्लस सुरक्षा द्या



## सकल मराठा समाजाची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**

मराठा समाजाचा संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांना पाचशे कोटी रुपये दिले, अशा संभाषणाची ऑडिओ क्लिप प्रसारमाध्यमांद्वारे महाराष्ट्रातील जनतेसमोर ऐकवली व ती रक्कम भाजपमधील नेत्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र श्रीकांत शिंदे यांचे मार्फत मनोज दादांना दिले असं ते संभाषण होतं. या संभाषणामुळे भाजप व शिंदे सेना यांच्यामध्ये उलट सुलट आरोप प्रत्यारोपांना सुरुवात झाली आहे, व अशातच ही सर्व बाब मनोज जरांगे पाटील यांनी प्रसार माध्यमांद्वारे जनतेसमोर आणल्यामुळे त्यांच्याही जीवितास धोका निर्माण झाला असल्याने जरांगे पाटील यांना झेड प्लस सुरक्षा द्यावी, अशी मागणी सोलापुरातील सकल मराठा समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांच्याकडे करण्यात आली आहे.

मनोज जरांगे-पाटील यांनी प्रसार माध्यमांद्वारे जनतेसमोर आणल्यामुळे त्यांच्या जीवितास याद्वारे धोका निर्माण झाला आहे, सदर संभाषणामधील व्यक्तींची नावे खासदार नरेश म्हस्के यांनी वाचलेली आहेत. जरांगे पाटलांवर बोलणारे रेखा कोंडे, अमोल खुणे, ललिता तारक, अजय बारस्कर, योगेश केदार यांचीही नार्को टेस्ट करावी व जे दोषी आढळतील त्या सर्वांवर कडक कारवाई करावी, असेही या निवेदनात म्हटले आहे.

# कारच्या धडकेत महापालिकेच्या तीन महिला सफाई कर्मचारी जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑक्टोबर-**

कर्तव्यावर जात असताना कारने धडक दिल्याने सोलापूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातील तीन महिला सफाई कर्मचारी गंभीर जखमी झाल्या. ही घटना शुक्रवारी पहाटे साडेपाचच्या सुमारास मधला मारुती चौकात घडली. जखमी कर्मचाऱ्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सविता अरुण सोनकांबळे, कौशल्या यादव रोकडे आणि गोदाबाई रंगनाथ गजघाटे अशी जखमी महिला कर्मचाऱ्यांची नावे आहेत. या तिन्ही महिला बाळीवेस ते गेंट्याल टाकी परिसरात दैनंदिन साफसफाईचे काम करण्यासाठी रिक्षाने जात होत्या. त्यावेळी कर्नाटक पासिंगच्या केए ३१ ए ४८३२ क्रमांकाच्या कारने त्यांना धडक दिली. जखमींवर विविध रुग्णालयात उपचार करण्यात आले.

# जिल्ह्यात रस्ते अपघातांचे प्रमाण वाढले; दुचाकी खरेदीवेळी हेल्मेट मिळणे आवश्यक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**

जिल्ह्यात रस्ते अपघातांचे प्रमाण लक्षात घेता दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. दुचाकी वाहन खरेदी करताना ग्राहकांना नियमानुसार हेल्मेट उपलब्ध करून देण्याच्या तरतुदींचे सर्व विक्रेते व डीलर्स यांनी काटेकोर पालन करावे, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांनी केले आहे.

रस्ते अपघातांमध्ये डोक्याला गंभीर दुखापत होण्याचा धोका कमी करण्यासाठी दुचाकी चालकासह सहप्रवाशानेही योग्य दर्जाचे हेल्मेट वापरणे आवश्यक आहे. हेल्मेटचा वापर केवळ कायदेशीर बंधन म्हणून न पाहता स्वतःच्या जीविताच्या संरक्षणासाठी महत्त्वाची बाब म्हणून पाहावे, असेही परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे. नवीन दुचाकी वाहन खरेदी करताना ग्राहकांनी संबंधित विक्रेत्याकडून नियमानुसार हेल्मेट मिळत असल्याची खात्री करावी. हेल्मेट भारतीय मानक ब्युरोच्या (इखड) निर्धारित मानकांनुसार प्रमाणित असल्याची तपासणी करावी. हेल्मेटसाठी स्वतंत्रपणे अतिरिक्त रक्कम आकारली जात असल्यास संबंधित बिल व पावती जतन करून ठेवावी. वाहन विक्रेत्याकडून लागू नियमांचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक पुराव्यांसह प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर येथे तक्रार नोंदवावी.



सर्व दुचाकी वाहन विक्रेते व डीलर्स यांनी नवीन वाहन विक्रीच्या वेळी ग्राहकांना हेल्मेट उपलब्ध करून देण्यासंबंधीच्या लागू कायदेशीर तरतुदींचे पालन करावे. ग्राहकांना इखड/खडख प्रमाणित हेल्मेट उपलब्ध करून देतानाच हेल्मेट दिल्याची पावती अथवा आवश्यक पुरावा जतन करावा. वाहन विक्री व्यवहार, हेल्मेट, ॲक्सेसरीजची बिले व संबंधित कागदपत्रांच्या नोंदी व्यवस्थित ठेवाव्यात. ग्राहकांना हेल्मेट देण्यास नकार देणे किंवा संबंधित नियमांचे उल्लंघन करणे टाळावे, असेही त्यांनी सांगितले.

### रस्ता सुरक्षा ही सर्वांची जबाबदारी

दुचाकीस्वारांनी स्वतःच्या तसेच सहप्रवाशाच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक प्रवासात योग्य हेल्मेटचा वापर करावा. नागरिक, वाहन विक्रेते व डीलर्स यांनी रस्ता सुरक्षा नियमांचे पालन करून अपघातांमधील जीवितहानी कमी करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी पाटील यांनी केले आहे.

# पत्रकारितेत विश्लेषण, संयम आणि स्वतंत्र विचार महत्त्वाचे : सुशीलकुमार शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑक्टोबर-**

पत्रकारितेचे मुख्य काम केवळ बातम्या देणे नसून घडणाऱ्या घटनांचे विश्लेषण करणेही महत्त्वाचे आहे. पत्रकारांनी राजकीय आणि सामाजिक घडामोडींचा अभ्यास करून त्यातील चांगल्या-वाईट बाबी जनतेसमोर मांडल्या पाहिजेत. पत्रकारांनी कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित व्यक्तींच्या कामाचे मूल्यमापन करताना त्यातील चांगल्या आणि त्रुटीपूर्ण बाबींचे विश्लेषण करावे. दरम्यान, पत्रकारितेत संयम, अभ्यास आणि स्वतंत्र विचार यांना महत्त्व आहे, असे प्रतिपादन माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केले.




महाराष्ट्र संपादक परिषद, मुंबई यांच्या वतीने कै. यशवंत पाध्ये स्मृती राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभ शुक्रवारी सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या हॉलमध्ये आयोजित करण्यात आला होता. यावेळी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीकुमार शिंदे यांच्या हस्ते सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर नागणसूर बम्मलिंगेश्वर मठाचे मठाधिपती श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी, ज्येष्ठ विधिज्ञ धनंजय माने, नगरसेवक मनीष केत, प्रमोद बोडके, महाराष्ट्र संपादक परिषदेचे अध्यक्ष संजय मलमे, कार्याध्यक्ष प्रकाश कुलथे, गोरख तावरे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, पाच हजार रुपये रक्कम, शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे पुढे म्हणाले, पत्रकारांच्या सुविधा आणि कल्याणासाठी काम करण्याची तळमळ असणे आवश्यक आहे. केवळ पत्रकारितेचे लेबल लावून पुढे जाण्यापेक्षा पत्रकारांच्या प्रश्नांसाठी प्रत्यक्ष काम करणे महत्त्वाचे आहे. पत्रकारांच्या निवासासाठी सोलापुरात उभारण्यात आलेल्या गृहनिर्माण प्रकल्पाचे त्यांनी विशेष कौतुक केले.

महाराष्ट्र संपादक परिषदेचे अध्यक्ष संजय मलमे यांनी महाराष्ट्र संपादक परिषदेच्या कार्याचा आढावा मांडत आठवणींना उजाळा दिला. यापूर्वी हा पुरस्कार स्व.बाळासाहेब ठाकरे यांनाही देण्यात आला होता. या पुरस्काराची मोठी परंपरा असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी ॲड. धनंजय माने, मनीष केत यांचीही भाषणे झाली. महाराष्ट्र संपादक परिषदेचे कार्याध्यक्ष प्रकाश कुलथे यांनी प्रास्ताविक केले. श्रमिक पत्रकार संघाचे खजिनदार विजय गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. सरचिटणीस आफताब शेख यांनी आभार मानले.

यावेळी श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी म्हणाले, चांगले कार्य करणाऱ्या व्यक्तीचा गौरव हा त्याच्या वयावर किंवा इतर कोणत्याही बाबीवर अवलंबून नसतो, तर त्याच्या गुणांवर आणि कार्यावर अवलंबून असतो. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' ही भावना मनात ठेवून समाजासाठी निष्ठेने काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान होणे आवश्यक आहे. सत्कारमूर्ती विक्रम खेलबुडे यांनी पुरस्काराच्या रूपाने मिळालेली पाच हजार रुपयांची रक्कम दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी देण्याची घोषणा केली.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



दसरा, दिवाळीनिमित्त
यल्लम्मा हॅण्डलूम 20% पर्यंत सूट
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं.१ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो.9371289887
शाखा नं.२ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो.९३७२३५१८६०

# माझ्या नातवाने पंतप्रधान मोदी यांच्या वाढदिवसाचे बॅनर लावले तर काय बिघडलं?

## माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचा सवाल

### नवीन माणसाची काय हालत होतं हे मी जवळून बघितलं

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**

मीसुध्दा पंतप्रधानांना भेटत असतो. अशा भेटीगाठीद्वारे आपली फिलॉसॉफी काय कुठे जाते काय? माझा नातू शिखर पहारिया याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छापर बॅनर लावले तर काय बिघडलं? असा उपरोधिक सवाल माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी उपस्थित केला.



महाराष्ट्र संपादक परिषदेच्या वतीने सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांना कै.यशवंत पाध्ये स्मृती राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्याच्या अनुषंगाने ते सोलापुरात आले असता आजपर्यंतची वाटचाल आणि राजकीय किस्से याविषयी त्यांनी दिलखुलास गप्पा मारल्या.

तत्वाने उभी राहिलेली माणसं मलादेखील या खूपवेळ म्हणाले; या इकडं... इकडं येऊन काय करणार? मी तिकडं आहे तर तिकडंच काम बघतो. इकडं येऊन परत तुमच्यात ढवळाढवळ नको आणि इकडं आला तर नवीन माणसाची काय हालत होतं हे मी जवळून बघितलं, असेही ते म्हणाले.

मलाही भारतीय जनता पार्टीमध्ये ऑफर होती. मात्र मी गेलो नाही. कारण माझ्या पक्षातून भाजपात गेलेल्या जाणकार नेत्यांचे काय हाल होत आहेत; हे आपणा सर्वांना माहित आहे, त्यामुळे मी आहे त्याठिकाणीच बरा आहे, असा राजकीय चिमटा घ्यायलाही ते विसरले नाहीत.

गेल्या २५ वर्षांपूर्वीही असाच प्रकार घडला होता; मात्र काँग्रेसमधून गेलेली मंडळी काही दिवसात परत फिरली. राजकीय क्षेत्रात अशा घडामोडी घडत असतात. याही गोष्टी पत्रकारांनी समजून घ्याव्यात, अशीही अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

### बॅनर 'ते' आणि 'हे'

सोलापूर लोकसभा निवडणुकीपूर्वी म्हणजे ऑगस्ट २०२३ मध्ये प्रणिती शिंदे यांचे सोलापूर शहरात 'भावी खासदार' म्हणून मोठे बॅनर झळकले होते. या बॅनरमुळे राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चा सुरु झाली होती, ज्यावर स्वतः प्रणिती शिंदे यांनी त्यावेळी काहीशी नाराजीही व्यक्त केली होती. विशेष म्हणजे, सन २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत सोलापूर मतदारसंघातून त्या खासदारपदी निवडून आल्या. दरम्यान, सप्टेंबर २०२६ मध्ये सुशीलकुमार शिंदे यांचे नातू शिखर पहारिया यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शुभेच्छापर बॅनर लावले होते. याही बॅनरची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगली होती.




## जुना देगाव नाका येथे तरुणाची गळफासाने आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.२३ ऑक्टोबर-**

एका ३३ वर्षीय तरुणाने घरातील छताच्या लाकडीवाशाला ओढणीच्या साह्याने गळफास घेऊन आत्म हत्या केल्याची घटना जुना देगाव नाका परिसरातील साठे पाटील वस्ती येथे शुक्रवार, दि.२३ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली.

अमोल अनिल जाधव (रा. साठे पाटील वस्ती, जुना देगाव नाका, सोलापूर) असे गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. तो वरील ठिकाणी ओंकार गुंड यांच्या घरात भाड्याने राहण्यास होता. शुक्रवारी दुपारी त्याचा मृतदेह घरामध्ये गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. ही खबर सलगर वस्ती पोलिसांना समजली असता हवालदार एस.आर.पांढरे यांनी घटनास्थळी पोहोचून सदरचा मृतदेह नातेवाईकांच्या साह्याने खाली उतरवून शासकीय रुग्णालयात विच्छेदनासाठी दाखल केला. मात्र त्याच्या मृत्युचे कारण समजू शकले नाही.

# ऐतिहासिक महत्व असलेली मंगळवार पेठ पोलिस चौकी कोसळण्याच्या बेतात



### प्रशासनाला देण्यात आली पूर्वकल्पना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**

ऐतिहासिक महत्व असलेली व जोडभावी पेठ पोलिस ठाणे अंतर्गत येणाऱ्या मंगळवार पेठ पोलिस चौकी धोकादायक बनली असून या चौकीतील अंतर्गत बाजू कोसळण्याच्या बेतात आहे. येथे कार्यरत असलेले पोलिस कर्मचारी आणि नागरिक जीव मुठीत धरुन वावरत असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे, यासंदर्भात जोडभावी पेठ पोलिस ठाण्याकडून जावक क्रमांक ३६४७/२०२६ या पत्रान्वये प्रशासनाला पूर्वकल्पना देण्यात आल्याचे सांगण्यात येते.

मंगळवार पेठ पोलिस चौकीचे पत्रे पूर्णपणे जीर्ण झाले असून, भिंतींचे प्लास्टर निखळत आहे. इमारत आतून अत्यंत खिळखिळी झाली आहे. दरवाजे आणि स्वच्छतागृहाची अवस्था दयनीय झालेली आहे. दरम्यान, याठिकाणी कोणतीही दुर्घटना घडण्यापुर्वी वा जीवितहानी होण्यापुर्वी या चौकीची दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी अभिनव सामाजिक संस्थेने सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता परदेशी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली.

या पोलिस चौकीची आतल्या बाजूने झालेली पडझड रोखण्यासाठी तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करुन मजबुतीकरण करण्यात यावे. अंतर्गत भागातील खराब झालेले प्लास्टर काढून नवीन प्लास्टर व दर्जेदार रंगरंगोटी करावी. चौकीचे जीर्ण व गळणारे पत्रे बदलून त्या ठिकाणी नवीन मजबूत पत्रे बसवावेत. चौकीचे दरवाजे आणि वॉशरुमची (स्वच्छतागृह) तातडीने दुरुस्ती व नूतनीकरण करण्यात यावे, असेही या निवेदनात म्हटले आहे.

अभिनव सामाजिक संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा मीनल दास, संपर्क प्रमुख सरोजिनी मकाई, जिल्हाध्यक्षा अरुणा जाधव, जिल्हा उपाध्यक्ष स्वाती घंटे, शहराध्यक्षा जयश्री रानसर्जे, शहर कार्याध्यक्षा सुनीता घंटे, शहर दक्षिण उपाध्यक्ष योगेश्री निंबाळे आदींच्या शिष्टमंडळाने हे निवेदन दिले.

# आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी भाविक तुळजापूरकडे मार्गस्थ

### सोलापूर-तुळजापूर महामार्ग वाहतुकीसाठी 3 दिवस बंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑक्टोबर-**

कोजागिरी पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी सोलापूर शहर-जिल्हासह कर्नाटकातील असंख्य भाविक आई राजा उदोऽऽ उदो, सदानंदीचा उदोऽऽ उदोचा गजर करीत तुळजापूरला पायी मार्गस्थ झाले आहेत. दरम्यान, सोलापूर-तुळजापूर हा महामार्ग वाहतुकीसाठी ३ दिवस बंद राहणार असून या मार्गावरुन ये-जा करणाऱ्या वाहनांसाठी पर्यायी मार्ग दिले आहेत.

भाविकांची सुरक्षा, वाहतूक कोंडी टाळणे आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे यासाठी सोलापूर-तुळजापूर महामार्गावरील सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतुकीवर तात्पुरती बंदी घालण्यात आली आहे. पोलीस आयुक्त एम.राजकुमार यांनी हा आदेश पारित केला असून, दि.२३ ऑक्टोबर रोजीच्या मध्यरात्री १ वाजल्यापासून ते २६ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहणार आहे.

या आदेशानुसार सोलापूर शहरातील जुना तुळजापूर नाका ते तुळजापूर शहर हा मुख्य मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांसाठी पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. तर पोलीस खात्याची वाहने, शासकीय व खाजगी अत्यावश्यक सेवेची वाहने आणि ज्या वाहनांना पोलिसांनी विशेष परवानगी दिली आहे, अशा वाहनांना या निर्बंधांतून सूट देण्यात आली आहे. पायी जाणाऱ्या या भाविकांना जागोजागी मोफत महाप्रसाद वाटप केला जातो. पाणी, औषधेही विनामुल्य दिली जातात. अनेक अन्नदाते गेल्या आठवड्यापासूनच या वारीच्या तयारीला लागल्याचे दिसत होते. या मार्गावर पोलिस प्रशासनाकडून चोख बंदोबस्तही ठेवला जातो. भाविकांच्या सेवेसाठी एस.टी. म हामंडळाकडून अनेक जादा गाड्यांचे नियोजन करण्यात आले आहे. तुळजापूर नगरीही दुमदुमली असून, कोजागिरी यात्रेसाठी लाखो भाविक तुळजापुरात दाखल होत आहेत.



### जिल्हा, नगरपालिका व मंदिर प्रशासन सज्ज

मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कर्नाटकातून लाखो भाविक तुळजापूरला येत असून, आई जगदंबेचे दर्शन घेवून ते आपली वारी पोहोच करतात. दरवर्षी भाविकांत मोठी वाढ होत असल्याने धाराशिव जिल्हा प्रशासन, तुळजापूर नगरपालिका आणि मंदिर प्रशासनाकडून भाविकांच्या सोयी-सुविधाही मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आल्याची माहिती तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील, धाराशिवचे जिल्हाधिकारी तथा तुळजाभवानी देवस्थानचे अध्यक्ष किर्तीकुमार पुजार यांनी दिली.

# माझे-तुझे, आपले-परके या भावनेत दडले दुःखाचे मूळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑक्टोबर-**

मनुष्याच्या जीवनातील दुःखांचे मूळ अनेकदा बाह्य परिस्थितीत नसून तुलना, अपेक्षा, राग-द्वेष आणि 'माझे-तुझे, आपले-परके' या भावनेत असते. 'त्याच्याकडे आहे, माझ्याकडे नाही' अशा तुलनेतून असंतोष वाढतो. तुलना थांबली की समाधानाची सुरुवात होते. त्यामुळे बाह्य परिस्थिती बदलण्यापेक्षा स्वतःची विचारपध्दती आणि जीवनाकडे पाहण्याची दृष्टी बदलणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन सुप्रभसागर महाराज यांनी केले.




इतरांच्या चुका शोधण्याऐवजी स्वतःच्या चुका ओळखून त्यांत सुधारणा करणे, दिखावा टाळून साधेपणा स्वीकारणे, प्रत्येक जीवामध्ये आत्मतत्त्व पाहून समतेची भावना जोपासणे आवश्यक आहे. माणसांचा स्वार्थासाठी उपयोग करण्याऐवजी त्यांना प्रेम, विश्वास, आपुलकी द्यावी. गटबाजी व मतभेदा मुळे नात्यांमध्ये दुरावा निर्माण करण्यापेक्षा माणुसकीला प्राधान्य द्यावे. मनुष्यजन्म, उत्तम संस्कार आणि सद्गुरुंचे मार्गदर्शन ही मोठी पुण्याई आहे.

गुरुमंत्र हा केवळ उच्चारण्याचा विषय नसून श्रध्दा, समर्पण आणि आचरणाचा मार्ग आहे. गुरुंनी दाखविलेल्या मार्गावर प्रामाणिकपणे चालणे हीच खरी गुरुदक्षिणा आहे, असेही त्यांनी सांगितले. याप्रसंगी वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ.रणजित गांधी, माया गांधी, पराग शहा, वैभव गांधी आदी उपस्थित होते. शनिवार, दि.२४ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता वालचंद शिक्षण समूहातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी 'सम्यकज्ञान' या विषयावर विशेष प्रवचन आयोजित करण्यात आले आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

# सोलापुरात 'पदवीधर'साठी ७१.४२ तर 'शिक्षक'साठी ८९ टक्के मतदान



जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन यांनी सिध्देश्वर प्रशाला, नॉर्थकोट येथील मतदान केंद्रावरील मतदान प्रक्रियेची पाहणी करताना घेतलेले छायाचित्र.



पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीसाठी मतदान करताना युवती.



नगरसेवक सुमित वाघमोडे यांनी आपल्या आईसमवेत मतदानाचा हक्क बजावले.



पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीत मतदारांनी मतदानासाठी अशा पध्दतीने रांगा लावल्या होत्या.

## 'बालेवाडी'कडे मतपेट्या रवाना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑक्टोबर-**

पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी शुक्रवार, दि.२३ ऑक्टोबर २०२६ रोजी अगदी उत्साही वातावरणात मतदान पार पडले. सकाळी संथगतीने सुरु झालेली मतदान प्रक्रिया दुपारनंतर वेगाने झाली. सोलापूर जिल्ह्यात 'पदवीधर'साठी ७१.४२ टक्के तर 'शिक्षक'साठी ८९ टक्के मतदान झाले. निवडणूक प्रक्रिया सुरळीत, शांततेत आणि पारदर्शक वातावरणात पार पडली, अशी माहिती जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन यांनी दिली.

शहर-जिल्ह्यातील आलेल्या सर्व मतपेट्या येथील रामवाडी गोडावूनमध्ये एकत्र करुन त्याची पूर्ण तपासणी करण्यात आली आणि त्या मतपेट्या रात्री उशिराने तगड्या पोलिस बंदोबस्तात पुणे येथील 'बालेवाडी'कडे रवाना करण्यात आले. पुणे विभाग पदवीधर मतदारसंघासाठी ४७ तर शिक्षक मतदारसंघासाठी ३० उमेदवार रिंगणात आहेत. सोलापूर जिल्ह्यात पदवीधर मतदारसंघासाठी ११७, तर शिक्षक मतदारसंघासाठी ७६ अशी एकूण १९३ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली होती.

सोलापूर जिल्ह्यात पदवीधर मतदारसंघासाठी एकूण ४९ हजार ७२२ मतदार नोंदणीकृत होते. यामध्ये ३७ हजार ७३० पुरुष आणि ११ हजार ९९२ महिला मतदारांचा समावेश आहे. शिक्षक मतदारसंघासाठी जिल्ह्यात एकूण १५ हजार ३०३ मतदार होते. यामध्ये १० हजार ९२७ पुरुष आणि ४ हजार ३७६ महिला मतदारांचा समावेश आहे. पदवीधर मतदारसंघाकरिता ७०५ तर शिक्षक मतदारसंघाकरिता ४६० असे एकूण १ हजार १६५ कर्मचारी नियुक्त करण्यात आले होते.

निवडणूक आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी सोलापूर विभागासाठी २, कुर्डूवाडी विभागासाठी २ आणि पंढरपूर विभागासाठी २ अशी एकूण ६ भरारी पथके कार्यरत होती. ही पथके आचारसंहितेच्या अनुषंगाने लक्ष ठेवून आवश्यक कार्यवाही करीत असल्याने कोणताही अनुचित प्रकार न घडता शांततेत मतदान पार पडले, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

**तालुकानिहाय मतदान केंद्रांची संख्या याप्रमाणे**

करमाळा : पदवीधर-१०, शिक्षक-८ मतदान केंद्रे, माढा : पदवीधर-१३, शिक्षक-९ मतदान केंद्रे, बार्शी : पदवीधर-११, शिक्षक-९ मतदान केंद्रे, मोहोळ : पदवीधर-११, शिक्षक-७ मतदान केंद्रे, सोलापूर शहर उत्तर : पदवीधर-८, शिक्षक-२ मतदान केंद्रे, सोलापूर शहर मध्य : पदवीधर-४, शिक्षक-१ मतदान केंद्र, अक्कलकोट : पदवीधर-१०, शिक्षक-१० मतदान केंद्रे, दक्षिण सोलापूर - पदवीधर-१०, शिक्षक-६ मतदान केंद्रे, पंढरपूर : पदवीधर-१५, शिक्षक ९ मतदान केंद्रे, सांगोला : पदवीधर-१२, शिक्षक-९ मतदान केंद्रे, माळशिरस : पदवीधर-१३, शिक्षक-६ मतदान केंद्रे.

### सोमवारी बालेवाडी येथे होणार मतमोजणी

पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघासाठी सोमवार, दि.२७ ऑक्टोबर २०२६ रोजी पुणे येथील बालेवाडी येथे मतमोजणी होणार आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया दि.३१ ऑक्टोबर २०२६ पूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन आहे, असे जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन यांनी सांगितले.

### दुपारनंतर वाढला मतदानाचा वेग

सकाळी १० वाजेपर्यंत ११.४८ टक्के, दुपारी १२ वाजता २९.६७ टक्के, दुपारी २ वाजता ५८.८३ टक्के मतदान झाले. दुपारपर्यंत ९००३ जणांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदान प्रक्रियेसाठी ३८६ जंबो बॅलेट बॉक्स आणि ८० अतिरिक्त बॅलेट बॉक्स, असे एकूण ४६६ जंबो बॅलेट बॉक्स उपलब्ध करुन देण्यात आले होते.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी -१५७३

**वैष्णव तो जया । अवघी देवावरी माया ।**

प्रत्येक जीव हा कोणावर ना कोणावर तरी प्रेम करीतच असतो. इतर कोणावर प्रेम नसेल तर किमान स्वत:वर तरी त्याचे प्रेम असतेच. पण जगाच्या पाठीवर असे कांही लोक आहेत की जे विशिष्ट व्यक्तीवर प्रेम न करता सर्व प्राणी मात्रावर प्रेम करतात. आपल्या प्रेमात ते कसलाही दुजाभाव ठेवत नाहीत. सर्वांवर सारखे प्रेम करणाऱ्यांची संख्या कमी असली तरीही अशा महात्म्यांची समाजाला फार गरज आहे, हे निश्चित आहे. संसारात अडकलेला जीव हा माझा, तो परका असे म्हणून प्रेमात दुजाभाव करतो. केवळ प्रेमात दुजाभाव करतो असे नाही तर एखाद्यावर प्रेम करतो आणि एखाद्याचा द्वेष करतो. मानवाच्या अशा दुजाभाव



वृत्तीमुळेच समाजात विविध प्रकारच्या दऱ्या, विषमता निर्माण झाल्या आहेत. ईर्षा, मोह, स्वार्थ, मत्सर, अहंकार आदीने भरलेल्या या समाजात आजही वैष्णवांनी मात्र समतेचा धडा गिरवण्याचे त्यांचे कार्य चालूच ठेवले आहे. सर्व जीवमात्राच्या ठिकाणी एका भगवंताला पाहणारा हा वैष्णव सर्वांवर सारखी माया करतो आहे. या वैष्णवांना धन, संपत्ती, मान हे सर्व कांही जीवासमोर काडीप्रमाणे आहे. अर्थात जीवावरील प्रेमाव्यतिरिक्त यांना कशाचीही गरज नसते. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात, वैष्णव तो जयों अवघी देवावरी मायों नाही आणिक प्रमाण । तन धन तृण जन ।

नरसी मेहतांच्या वैष्णव जन तो तेणे कहिऐं जो पीर पराई जानें रें या महात्मा गांधीजींच्या आवडत्या गीताप्रमाणे वैष्णवांना आप-पर हा भेद नसतो. जो सर्व जीवावर सारखेच प्रेम करतो, सर्व जीवात एका ईश्वराला पाहतो, जो समत्व जोपासतो तो वैष्णव असतो. वैष्णव होण्यासाठी कपाळाला गंध, गळ्यात माळ, मुखात भगवंताचे नाम असावेच लागते असे नाही. तर प्रत्यक्षात समत्वाची कृती असावी लागते. बाह्य पेहरावापेक्षा अंतर्गत वर्तन अत्यंत महत्वाचे असते. संसारात अडकलेला जीव वैष्णव होण्यास खऱ्या अर्थाने पात्र होत नसला तरीही वैष्णवांच्या पंक्तीला बसण्याचा प्रयत्न करू शकतो, हे या प्रसंगी विसरता येणार नाही. आम्ही वैष्णव नाही, त्यामुळे आम्हाला सर्व जीवावर सारखे प्रेम करण्याची गरज नाही असे म्हणून चालत नाही. सर्व जीवाचे जाऊ द्या, पण आपण आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यावर तरी सारखे प्रेम करतो का? या प्रश्नाचे उत्तर आपण शोधायला हवे. मुलगी आणि सुन, जावई आणि मुलगा, सासू आणि आई, सासरा आणि वडील यांच्यावर तरी आपण सारखे प्रेम करतो का? जर आपण आपल्याच घरात प्रेमात दुजाभाव ठेवत असू तर समाजावर, सर्व जीवावर सारखे प्रेम करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. संत श्री ज्ञानोबा-तुकोबाजींच्या वचनावर विश्वास ठेवणाऱ्यांना प्रेमाच्या समत्वाचे पाऊल उचलावेच लागणार आहे, हे आपण विसरू नये. जय जय राम कृष्ण हरी.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : शनिवार,
दि. २४ ऑक्टोबर २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - अश्विन
तिथी - शु. त्रयोदशी
ऋतु - शरद (दक्षिणायन)
नक्षत्र- उ. भाद्रपदा (२०.३१)
योग - व्याघात (२०.००)
करण - गरज (२४.५१)
राहू काल : शनिवार
दु. १०.३० ते १२.००

दिनविशेष : २००३: प्रसिद्ध सुपरसोनिक प्रवासी विमान 'कॉन्कर्ड' चे शेवटचे व्यावसायिक उड्डाण झाले. १९९७: प्रसिद्ध सतारवादक पंडित रविशंकर यांना जपानचा प्रतिष्ठित 'प्रिमियम इंपिरिअल' पुरस्कार जाहीर झाला. २०००: सामाजिक कार्यकर्ते बाबा आमटे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला.

# ५८ स्थानकांवर रेल जनसंवाद उपक्रम यशस्वी

विशेष मोहीम ६.० अंतर्गत रेल जनसंवादला प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**

सोलापूर विभाग, मध्य रेल्वे यांच्यावतीने विशेष मोहीम ६.० अंतर्गत विभागातील ५८ रेल्वे स्थानकांवर 'रेल जनसंवाद' उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. भारतीय रेल्वेच्या देशभरातील ७,००० हून अधिक स्थानकांवर हा उपक्रम एकाच वेळी आयोजित करण्यात आला.

सोलापूर विभागात या उपक्रमाचे नेतृत्व विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांनी पंढरपूर स्थानकाहून केले. यावेळी पंढरपूर रेल्वे स्थानक येथे शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून रेल्वे सेवांमध्ये सुधारणा करण्यासाठी मौल्यवान सूचना आणि अभिप्राय दिले.

सोलापूर स्थानकावर अपर विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांनी प्रवाशांशी संवाद साधून त्यांच्या सूचना, अभिप्राय आणि प्रवासी सुविधांशी संबंधित समस्या जाणून घेतल्या. विभागातील इतर स्थानकांवरही रेल्वे अधिकाऱ्यांनी प्रवासी आणि संबंधित घटकांशी संवाद साधून त्यांना आपली मते मांडण्याची संधी दिली.

प्रवाशांकडून प्राप्त झालेल्या सूचनांवर आणि तक्रारींवर नियोजनबद्ध पद्धतीने कार्यवाही करण्यासाठी अभिप्राय फॉर्म भरून घेण्यात आले. प्राप्त मुद्द्यांचे पुढील तीन श्रेणींमध्ये वर्गीकरण करण्यात आले: अल्पकालीन: तातडीने किंवा कमी कालावधीत सोडवता येणाऱ्या समस्या. मध्यमकालीन: संबंधित विभागांमधील समन्वय, नियोजन आणि अंमलबजावणी आवश्यक असलेले विषय. दीर्घकालीन: धोरणात्मक बदल, व्यापक नियोजन किंवा वरिष्ठ स्तरावरील मंजुरी आवश्यक असलेले विषय. सोलापूर विभागातील 'रेल जनसंवाद' उपक्रमात सहभागी झालेली ५८ स्थानके पुढीलप्रमाणे आहेत: पंढरपूर, सोलापूर, कलबुरगि, अक्कलकोट रोड, दुधनी, गाणगापूर रोड, शाहाबाद, वाडी, कुर्डुवाडी, जेऊर, धाराशिव, लातूर, बार्शी टाउन, सांगोला, हरंगुळ, होटगी, केम, मोहोळ, मरतूर, टिकेकरवाडी, सलगरे, कवठे महांकाळ, मोडनिंब, माढा, कुलाली, बोरोटी, ताज सुलतानपूर, मालीकपेठ, वाशिंबे, अनगर, औसा रोड, वाकाव, तिलाटी, भाळवणी, हिरेनंदुरू, वडशिंगे, बाळे, शेंद्री, भिगवण, जिंती रोड, मुंढेवाडी, पाकणी, केत्तूर, बबलाद, सावळगी, गौडगाव, मलठाण, येडशी, पांगरी, ढालगाव, पोफळज, अरग, ढवळस, जत रोड, ढोकी, बोरीबेल, हुन्सीहडगील आणि नागणसूर.

## विचारांची मांडणी करण्यास शिका




आपल्या इच्छा-आकांक्षा आपल्या स्वत:च्या किंवा इतरांच्या मार्गात अडथळे निर्माण करणार नाहीत. अशा पद्धतीने आपल्या विचार व आचारांची मांडणी करण्यास आपण शिकू शकतो. कुठल्याही इच्छेचा उगम कसा होतो, ती कार्य कसे करते आणि तिचे परिणाम काय होतात हे समजावून घेऊन इच्छांची निवड करता येते. फक्त उपयुक्त, सहाय्यभूत ठरणाऱ्या इच्छाच अमलात आणून अडथळे निर्माण करणाऱ्या इतर इच्छांचा आपण संपूर्ण त्याग करायला हवा, असे प्रतिपादन परमपूज्य अक्षयश्रीजी महाराज यांनी केले.

बलिदान चौक येथील जैन स्थानकात आयोजित अक्षय चातुर्मासात बोलताना त्या म्हणाल्या, बुद्धिमान आणि ज्ञानवंत या दोघांमध्ये फरक असतो. कोणत्याही अनुचित कार्यात सहभाग तर लांबच राहिले आपण अशा कार्याला प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष अनुमोदनही देऊ नका. सदैव सत्कर्म करा. कुप्रवृत्ती पासून दूर राहा. जेथे हिंसा असते तेथून लांब राहा. कोणत्याही परिस्थितीत कार्यास आमंत्रण देऊ नका. क्रोधाला मार्ग करून द्या. कोणत्याही परिस्थितीत क्रोध व्यक्त होऊ नये याची दक्षता घ्या.जेव्हा क्रोध येईल तेव्हा थोड्या काळापुरता स्थान बदला.स्थान सोडणे हा उत्तम पर्याय होय. त्यामुळे आपला क्रोध देखील शांत होईल, मन देखील शांत होईल. क्रोधाचे स्वरूप पूर्वी एवढे राहणार नाही.

**- मल्लेश पुरवंत**

## संविधानाच्या रक्षणासाठी उद्या तिरंगा मार्च

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**

देशाचे संविधान वाचविणे, निवडणूक प्रक्रियेतील कथित अनियमितता आणि पेपरफुटीच्या विरोधात 'आम्ही, भारताचे लोक' या संघटनेच्या वतीने रविवारी, २५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता सोलापुरात संविधान तिरंगा मार्च काढण्यात येणार आहे, अशी माहिती समीउल्लाह शेख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून या मार्चला सुरुवात होऊन जिल्हा परिषदेच्या पुनम गेट येथे त्याची सांगता होणार आहे. यानंतर तेथे जाहीर सभा होणार आहे. या सभेला महाराष्ट्रातील प्रसिद्ध शोधपत्रकार निरंजन टकले यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रियेच्या (एसआयआर) नावाखाली देशभरात १३.५० कोटी, तर महाराष्ट्रात दोन कोटी मतदारांची नावे वगळण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या भूमिकेवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांच्या कार्यकाळात निष्पक्ष निवडणुका होण्याबाबत शंका व्यक्त करण्यात आली आहे.

या पत्रकार परिषदेस यशवंत फडतरे, फारूख शेख, साधना गायकवाड, विशाखा उबाळे, पायल कडाळे, आफताब पटेल, खालीद मन्सूर उपस्थित होते.




## दत्त मंदिर देवस्थानात भरतनाट्यम् व ब्रतुकम्मा महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**

अतुल्य सेवा प्रतिष्ठान व जनसेना शाखा सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने पूर्व विभाग दत्त मंदिर देवस्थान येथे सेवा प्रतिष्ठान जनसंपर्क कार्यालय समोर भरतनाट्यम् व ब्रतुकम्मा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला.

यावेळी ३५० ते ४०० महिलांचा यात सभा होत्या. यावेळी १५० महिलांना साडी वाटप करण्यात आले. उत्कृष्ट नृत्यासाठी तीन, उत्कृष्ट वेशभूषेसाठी तीन, उत्कृष्ट बतकम्मा सजावट साठी तीन चाटला पैठणी साडी देण्यात आले. त्यावेळी सोलापूर महानगरपालिकेचे महिला बालकल्याण सभापती निर्मला हरी जंगम यांच्या उपस्थिती असून कार्यक्रममध्ये सहभाग होऊन भरतनाट्यम यांना पारितोषिक वितरण करण्यात आले तसेच ब्रतुकम्मा कार्यक्रमास विजेत्यांना त्यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आली. यावेळी जनसेना शाखेचे प्रमुख अध्यक्ष आनंद अवधूत, सचिव अनिल कोंडा, उपाध्यक्ष निखिल चेन्नूर, वीर महिला पुष्पा पिस्के, कृष्णा आडम, व्यंकटेश पासकंटी, अभिषेक दुडम, पवन गुडली, गणेश संगम, नागेश वाईटला, गणेश पोतन, बाळकृष्ण राजगिरी, शेखर बोम्मा. उत्कृष्टसाठी पर्यवेक्षिका म्हणून वकील स्नेहा नारा उपस्थित होते.

## वाहन धडकेत रस्ता ओलांडणारी महिला ठार

**सोलापूर :** कुंभारी येथे वाहन धडकेत पादचारी महिला ठार झाली. निर्मला दिलीप मठपती (वय ५२, रा. कुंभारी दक्षिण सोलापूर) असे त्या महिलेचे नाव आहे. त्या गुरुवारी रात्री दहाच्या सुमारास कुंभारी येथील टाटा शोरूम समोरून पायी रस्ता ओलांडत असताना चार चाकी वाहनाने धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झाल्याने त्यांना मुलगा चन्नप्पा याने उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात अर्धवट शुद्धीत दाखल केले असता त्यांचा आज शुक्रवारी सकाळी सहा वाजता मृत्यू झाला.



## न्यायाधीश अमोलकुमार देशपांडे यांनी घेतले मश्रूम गणपतीचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**

विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तराचे न्यायाधीश अमोलकुमार देशपांडे यांनी तुळजापूर रोडवरील हिप्परगा येथील श्री मश्रूम गणपतीचे दर्शन घेऊन आरती व पूजा केली. यावेळी मंदिराचे पुजारी संजय पतंगे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी महाराष्ट्र व गोवा नोटरी संघटनेचे उपाध्यक्ष ॲड. लक्ष्मण माराडकर, सीनियर क्लर्क नितिन उपरे, कर्मचारी राहुल बिराजदार, मश्रूम गणपती मंडळाचे अध्यक्ष राजू हौशैट्टी, भैया पतंगे, ईश्वर पतंगे, नागराज हौशैट्टी व भक्तगण उपस्थित होते. यावेळी देशपांडे यांनी मंदिर परिसराची पाहणी करून माहिती घेतली. मंदिरातील स्वच्छता, शिस्त, धार्मिक नियमावली आणि भाविकांसाठी उपलब्ध सुविधांचे त्यांनी कौतुक केले.

## रोटरीतर्फे आज पल्स पोलिओ जनजागृती रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**

जागतिक पोलिओ दिनाचे औचित्य साधून रोटरी सोलापूर परिवारातर्फे शनिवार, दिनांक २४ ऑक्टोबर रोजी शहरात पल्स पोलिओ जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

ही रॅली शनिवारी सकाळी ८ वाजता बिग बाजार, सोलापूर येथून सुरू होईल आणि तिचा समारोप डफरीन चौक येथील आयएमए हॉल येथे होईल. या रॅलीमध्ये सोलापूरमधील सर्व रोटरी क्लबचे सदस्य, आयएमएचे डॉक्टर्स, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, रोटरी स्कूलचे विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन रोटरी परिवाराचे अध्यक्ष रोटे. मितेश पंचमिया, सचिव रोटे. किरणकुमार मुसळे आणि सचिव कॅप्टन पार्थ दावडा यांनी केले आहे.

## एमआयटी विश्वप्रयाग युनिव्हर्सिटीचा उद्या पहिला दीक्षांत समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**

केगाव येथील एमआयटी विश्वप्रयाग युनिव्हर्सिटीचा पहिला दीक्षांत समारंभ रविवार, २५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये होणार आहे. या समारंभात बीसीए, एमबीए आणि एमसीए या अभ्यासक्रमांतील एकूण ९० विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येणार असून, गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे, अशी माहिती कुलसचिव प्रा. प्राणेश मुरनाळ यांनी पत्रकार परिषदेत दिली



**९० विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करणार**

या समारंभाला ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषदेचे (सीएसआयआर) माजी महासंचालक पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. बालाजी अमाइन्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी हे प्रमुख अतिथी असतील. माईर्स एमआयटी शिक्षण समूहाचे संस्थापक अध्यक्ष व कुलपती प्रा. डॉ. विश्वनाथ कराड समारंभाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड - चाटे आणि कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या दीक्षांत समारंभात २०२३-२०२६ या कालावधीतील बीसीए, तसेच २०२३-२०२५ आणि २०२४-२०२६ या कालावधीतील एमबीए व एमसीए अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रदान केली जाणार आहे. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, शैक्षणिक गुणवत्ता, शाश्वत विकास आणि पर्यावरण संवर्धन या मूल्यांच्या आधारे जागतिक दृष्टिकोन असलेले आणि सामाजिक जबाबदारी जपणारे विद्यार्थी घडविण्याचे उद्दिष्ट विद्यापीठाने ठेवले आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करणारा हा पहिला दीक्षांत समारंभ विद्यापीठाच्या शैक्षणिक वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याची माहिती कुलसचिव प्रा. प्राणेश मुरनाळ यांनी दिली. या पत्रकार परिषदेस जनसंपर्क अधिकारी प्रेम मोटे उपस्थित होते.

## चौडेश्वरी पतसंस्थेला प्रगतीपथावर नेणार : चेअरमन पुडूर

चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय नागरी सह. पतसंस्थेला २१ पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**

श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी अरविंद पुडूर व व्हा. चेअरमनपदी अजय रंगम यांची निवड संस्थेच्या संचालक मंडळाच्या सभेत एकमताने करण्यात आली.

श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाची सभा प्राधिकृत अधिकारी के. बी. जमादार यांच्या नियंत्रणाखाली पार पडली. नूतन चेअरमन अरविंद पुडूर व व्हा. चेअरमन अजय रंगम यांची निवड के. बी. जमादार यांनी जाहीर केले. या प्रसंगी श्री तोगटवीर समाजाचे अध्यक्ष नागनाथ कोतम, संचालक अरुण चिंता, विठ्ठल बडगंची, लक्ष्मिकांत उदगिरी, नरेंद्र बत्तुल, मल्लिकार्जुन खंडे, विलास बडगंची, शंकर कोंतम, विष्णु म्याकल, चंद्रकांत रंगम, सौ. उमा पुडूर, अंबिका उदगिरी, विजयकुमार शिंपी, रुपसिंग राठोड, भगवंत फलमारे, ॲड. अंबादास कंदीकोंडा, व्यवस्थापक श्रीकृष्ण डक्का आदी मान्यवर उपस्थित होते.



श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय नागरी सहकारी पतसंस्था ही सोलापूर जिल्ह्यातील अग्रणी पतसंस्था असून सध्या या संस्थेत एकूण ठेवी रु. ३१३५५.९७ लाख रुपये इतके आहेत. एकूण कर्जे रु. २८९२०.११ लाख इतके असून संस्थेचा एकूण व्यवसाय रु. ६०२७६.०८ लाख इतके झालेले आहे. स्थापनेपासून ऑडीट वर्ग अ असून NP प्रमाण ०% आहे. एकूण कर्जापैकी ९९% सुरक्षित कर्जे असलेल्या या पतसंस्थेला आतापर्यंत महाराष्ट्र शासनाच्या सहकारनिष्ठ पुरस्कारासह एकूण २१ पुरस्कार मिळाले आहेत. या यशात सभासद, ठेवीदार, कर्जदार, कर्मचारी व आजीमाजी संचालक मंडळाचा योगदान आहे.

## व्यायामाचा संस्कार आणि व्यसनमुक्त समाज; करमाळ्याचे महेश वैद्य यांचे ध्यासपर्व




बालवयातच जर व्यायामाची आवड निर्माण झाली, तर मूल शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सुदृढ राहते आणि व्यायामाच्या माध्यमातूनच खरी व्यसनमुक्ती शक्य आहे, हा मंत्र घेऊन महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रात अविरत कार्य करणारे एक तपस्वी व्यक्तिमत्व म्हणजे महेश बबनराव वैद्य. विकसित भारतासाठी देशातील सर्व समाज घटक सशक्त आणि निरोगी असणे गरजेचे आहे, याच एका विचाराने सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथील कै. वनमला बबनराव वैद्य मल्टीपर्पज सोशल फाउंडेशन ही त्यांची संस्था गेली अनेक वर्षे ग्राउंड लेव्हलवर काम करत आहे.

### व्हिजन २०४७ : सशक्त भारत अभियान म्हणजे काय?

महेश वैद्य यांचे व्हिजन 'इयत्ता १ ली ते १२ वी मधील विद्यार्थी आणि सर्व प्रकारचे समाज घटक यांना फिट इंडिया कॅम्पेनला जोडणे' हे आहे. या अभियानाची प्रमुख सूत्रे अशी आहेत.

**बालवयातच फिटनेसचा संस्कार:** लहान वयातच जर मुलांना व्यायामाची गोडी लागली तर ते भविष्यात कधीच चुकीच्या मार्गाला जाणार नाहीत. ते शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सुदृढ राहतील. **व्यायामातून व्यसनमुक्ती:** आज मोबाईल, गुटखा, तंबाखू हे सर्वात मोठे व्यसन आहे. मैदानावर घाम गाळणारे मूल कधीच नशेच्या आहारी जाणार नाही. हा त्यांचा ठाम विश्वास आहे. **ग्रामीण भागावर लक्ष:** शहरात सुविधा आहेत, पण खरा भारत खेड्यात आहे. त्यामुळे ग्रामीण भागात फिटनेस कॅम्पचे आयोजन करणे, तेथे प्रचार आणि प्रसार करणे हे त्यांचे मुख्य ध्येय आहे.

### महाराष्ट्रभर फिटनेस कॅम्पचे जाळे

२०४७च्या विकसित भारतासाठी सशक्त भारत अभियानाद्वारे महेश वैद्य हे महाराष्ट्रातील विविध ठिकाणी शाळा, कॉलेज, वस्ती, गाव, तालुका स्तरावर फिटनेस कॅम्पचे आयोजन करत आहेत. परांडा येथील जिजामाता शाळेतील ३०० विद्यार्थ्यांचा उपक्रम असो वा घोटी येथील न्यू इंग्लिश व जि.प. शाळेतील ४०० विद्यार्थ्यांचा उपक्रम, प्रत्येक ठिकाणी ते स्वतः मैदानावर उतरून प्रत्यक्ष कृतीद्वारे व्यायाम शिकवतात. आतापर्यंत ५००च्या वर विविध हायस्कूल कॉलेज, जिम, ग्रामपंचायती येथे सशक्त भारत अभियान प्रत्यक्ष कृतीद्वारे घेतले आहेत. चांगले खेळाडू तयार करण्यासाठी मुलांना प्रथम व्यायामाचे आवड निर्माण करणे गरजेचे आहे त्यातूनच देशाला चांगले क्रीडापटू मिळतील असा ठाम विश्वास आहे.




### केवळ अभियान नाही, तर जनआंदोलन

महेश वैद्य आवर्जून सांगतात, 'खरे तर हे एक मोठे जनआंदोलन आहे. हे एकट्या माझे काम नाही. यासाठी आपल्या सर्वांच्या सहकार्याची खूप गरज आहे. प्रत्येक शिक्षक, प्रत्येक पालक, प्रत्येक सरपंच, प्रत्येक ग्रामस्थ याने या चळवळीत सहभागी व्हायला हवे. त्यांच्या फाउंडेशनच्या माध्यमातून हे अभियान आज सोलापूर, धाराशिवसह संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचत आहे. एक खेळाडू म्हणून, एक प्रशिक्षक म्हणून आणि एक समाजसेवक म्हणून महेश वैद्य यांनी क्रीडा क्षेत्राला वाहून घेतलेले जीवन हे आजच्या युवा पिढीसाठी खरोखरच प्रेरणादायी आहे. त्यांचकै ध्येय एकच '२०४७ पर्यंत प्रत्येक गाव नशा मुक्त आणि प्रत्येक नागरिक सशक्त व्हावा' यासाठी आपणही या सशक्त भारत अभियानात सहभागी व्हा आणि फिट इंडिया चळवळीला बळ द्या, असे आवाहन त्यांनी कै. वनमला बबनराव वैद्य फाउंडेशनच्या (९५६१५०२७८८) वतीने केले आहे.

### सतत साडेचार तास ७,७७७ पुश-अप्सचा विक्रम

महेश वैद्य हे केवळ नशा मुक्त भारत अभियानाचे सोलापूर जिल्हा ब्रँड ॲम्बेसेडर नाहीत, तर ते एक जिद्दी खेळाडू, प्रशिक्षक आणि फिटनेसचे ब्रँड आहेत. १९९२ मध्ये करमाळ्यात त्यांनी साडेचार तास सतत ७७७७ पुश-अप्स करून विक्रम केला. त्यांनी आजपर्यंत महाराष्ट्रातील हजारो विद्यार्थ्यांना शास्त्रशुद्ध व्यायामाचे धडे दिले आहेत. शालेय स्तरापासून ते ग्रामीण भागातील युवकांपर्यंत त्यांनी फिटनेसची चळवळ पोहोचवली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी जिल्हा व राज्य क्रीडा स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी केली आहे. क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या या निस्वार्थ आणि अविरत सेवेबद्दल त्यांना विविध सामाजिक, शैक्षणिक आणि क्रीडा संस्थांकडून अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. तसेच त्यांनी फिटनेस क्षेत्रात अनेक विक्रमी प्रात्यक्षिके आणि जनजागृती मोहीमा राबवून एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे



**स्ट्रेट ड्राईव्ह**
**अजितकुमार संगवे**
**मो.9881133103**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## गौरी जोशी यांना डॉ. कलाम राष्ट्रउभारणी प्रेरणा गौरव पुरस्कार

**सोलापूर, दि. २३ ऑक्टोबर-**

देशाचे माजी राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या ९५ व्या जयंतीनिमित्त ड्रीम फाउंडेशनच्या वतीने पुरस्कार वितरण झाले. यामध्ये सहाय्य व्यसनमुक्ती केंद्राच्या सचिव गौरी प्रसाद जोशी यांचा डॉ. कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. डॉ. कलाम साहित्य संमेलन आणि पुरस्कार वितरण असा दुहेरी कार्यक्रम सोलापुरात झाला, ड्रीम फाउंडेशन, सेवा फाउंडेशन, डॉ. कलाम कौशल्य विकास केंद्र पुणे व ड्रीम आयएएस सेंटर यांच्या वतीने हे संमेलन आणि पुरस्कार वितरण कार्यक्रम झाला. संमेलन अध्यक्ष तथा वरिष्ठ वैज्ञानिक डीआरडीओ पुणे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. ड्रीम फाउंडेशनचे अध्यक्ष काशिनाथ भतगुणकी यांनी सूत्रसंचालन केले.

## डॉ. विजयकुमार केसकर यांचे जागतिक स्तरावर योगदान

**एक लाखांहून अधिक शस्त्रक्रिया; सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणार मुलाखत**

**बार्शी, दि. २३ ऑक्टोबर-**

कर्करोगाचे निदान आणि शस्त्रक्रिया या क्षेत्रात आपल्या अभ्यासपूर्ण ज्ञानाच्या, तंत्रकुशलतेच्या आणि प्रदीर्घ अनुभवाच्या जोरावर जागतिक स्तरावर ठसा उमटवणारे बार्शीचे प्रसिद्ध कर्करोगतज्ज्ञ डॉ. विजयकुमार केसकर यांची विशेष मुलाखत दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरील 'जय हो' या मालिकेतून प्रसारित होत आहे.



एक लाखांहून अधिक शस्त्रक्रिया करण्याची उल्लेखनीय कामगिरी, कर्करोग रुग्णसेवेतील योगदान आणि सामाजिक बांधिलकी जपत केलेला प्रवास या मुलाखतीच्या माध्यमातून प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे. डॉ. विजयकुमार केसकर यांच्या कार्याचा आणि त्यांच्या प्रेरणादायी वाटचालीचा विशेष आढावा घेतला आहे. ज्येष्ठ पत्रकार राजा माने आणि अभिनेत्री समीरा गुजर यांनी त्यांची मुलाखत घेतली आहे. 'विमास' संस्थेच्या माध्यमातून कर्करोग रुग्णसेवेचे कार्य डॉ. विजयकुमार केसकर यांनी आपल्या वैद्यकीय कौशल्याच्या बळावर कर्करोग उपचार क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. रुग्णसेवेला सामाजिक बांधिलकीची जोड देत त्यांनी एक लाखांहून अधिक शस्त्रक्रिया केल्या आहेत. त्यांच्या या कार्यामुळे बार्शीच्या वैद्यकीय क्षेत्राची ओळख व्यापक स्तरावर पोहोचली आहे. केसकर यांच्या पत्नी तथा संस्थेच्या संचालिका वर्षा केसकर आणि चिरंजीव डॉ. विराज केसकर यांच्या भक्कम साथीने त्यांनी 'विराज इन्स्टिट्यूट फॉर मिनिमल ॲक्सेस सर्जरी ॲंड रिसर्च' अर्थात 'विमास' या संस्थेची उभारणी केली. या संस्थेच्या माध्यमातून कर्करोग उपचार, शस्त्रक्रिया आणि रुग्णसेवेच्या क्षेत्रात त्यांनी आपले कार्य पुढे नेले आहे.कर्करोगाचे अचूक निदान, आधुनिक शस्त्रक्रिया तंत्रज्ञानाचा वापर आणि रुग्णकेंद्रित उपचारपद्धती यांसारख्या महत्त्वाच्या विषयांबरोबरच त्यांच्या वैद्यकीय प्रवासातील अनुभवही या मुलाखतीतून समोर येणार आहेत.

# दहा लाख बालकांना देणार जंतनाशक गोळ्या

**जिल्ह्यात २७ ऑक्टोबरला मोहीम; ३ नोव्हेंबरला राहिलेल्या बालकांसाठी मॉप-अप दिन**

**रक्तक्षय रोखण्यासह मुलांच्या शारीरिक व बौद्धिक विकासावर भर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑक्टोबर-**

बालकांमधील जंतसंसर्ग रोखून त्यांचे आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी सोलापूर जिल्ह्यात २७ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय जंतनाशक मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत जिल्ह्यातील १ ते १९ वयोगटातील तब्बल ९ लाख ८३ हजार ७०६ बालकांना जंतनाशक गोळ्या देण्याचे नियोजन आरोग्य विभागाने केले आहे.

शालेय विद्यार्थी, अंगणवाडीतील बालके आणि शाळाबाह्य मुलांपर्यंत पोहोचण्यावर या मोहिमेत विशेष भर देण्यात येणार आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड यांनी ही माहिती देताना पालकांनी आपल्या पाल्यांना जंतनाशक गोळ्या देण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.



लहान मुलांच्या शरीरातील आतड्यांमध्ये जंतांचा प्रादुर्भाव झाल्यास शरीराला आवश्यक पोषक घटकांचे शोषण कमी होते. परिणामी रक्तक्षय, अशक्तपणा, भूक मंदावणे आणि शारीरिक वाढ खुंटण्यासारख्या समस्या उद्भवू शकतात. त्याचा परिणाम मुलांच्या बौद्धिक विकासावर आणि शैक्षणिक प्रगतीवरही होऊ शकतो. त्यामुळे जंतनाशक औषधोपचारातून बालकांचे आरोग्य सुधारण्यास मदत होते.

**शाळा, अंगणवाड्यांमधून गोळ्यांचे वाटप**

मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आरोग्य विभागासह शिक्षण विभाग आणि महिला व बालविकास विभाग यांच्यात समन्वय साधला आहे. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेत, अंगणवाडीतील नोंदणीकृत बालकांना अंगणवाडी केंद्रांमध्ये गोळ्या दिल्या जाणार आहेत. शाळा किंवा अंगणवाडीत न जाणाऱ्या पात्र बालकांसाठी आरोग्य संस्थांमार्फत व्यवस्था केली आहे. २७ ऑक्टोबर रोजी आजारपण किंवा अन्य कारणामुळे जंतनाशक गोळी घेता न आलेल्या पात्र बालकांसाठी ३ नोव्हेंबर रोजी मॉप-अप दिन आयोजित केला आहे. गोळ्यांचे सेवन आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सूचनेनुसार करावे, असे आवाहन केले आहे.

> जिल्ह्यातील १ ते १९ वयोगटातील सर्व पात्र बालकांना जंतनाशक गोळ्यांचा लाभ मिळावा, यासाठी आरोग्य, शिक्षण आणि महिला व बालविकास विभागाच्या समन्वयातून नियोजन केले आहे. पालकांनी आपल्या पाल्यांना या मोहिमेत सहभागी करून घ्यावे.
>
> **- डॉ. सतीश कोपुरवाड,**
> जिल्हा आरोग्य अधिकारी, सोलापूर.

## कलासाधना सांस्कृतिक मंडळाच्या वतीने किल्ला स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ ऑक्टोबर-**

कलासाधना सांस्कृतिक मंडळाच्या वतीने यंदाही पंढरपूर शहरात भव्य किल्ला स्पर्धेचे आयोजन केले आहे. ही स्पर्धा शालेय व खुल्या अशा दोन गटात घेतल्या जाणार आहेत. शालेय गट इयत्ता पहिली ते दहावी असा असून दुसरा खुला गट इयत्ता ११वी ते पुढे असा राहील.

दोन्ही गटात प्रथम क्रमांकास रोख रुपये ३ हजार अधिक संस्थेचे मानचिन्ह, दुसऱ्या क्रमांकास रुपये २ हजार अधिक संस्थेचे मानचिन्ह, तिसऱ्या क्रमांकास १ हजार रुपये अधिक संस्थेचे मानचिन्ह व प्रत्येक सहभागींना सहभागी प्रमाणपत्र दिले जाणार आहे. दि ५ नोव्हेंबर ते ११ नोव्हेंबर पर्यंत सदर स्पर्धा होणार आहे. सहभागासाठी व अधिक माहितीसाठी ९८३४४४६११, ९८१२३६९२९२ आणि ९०११५७७६७७ या क्रमांकावर सम्पर्क साधावा. तसेच १ नोव्हेंबरपर्यंत प्रवेशिका भराव्यात. कार्यक्रमासाठी कलासाधनाचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत बडवे महाजन यांच्यासह मंडळाचे उपाध्यक्ष प्रा. विनायक परिचारक, सचिव ज्ञानेश्वर मोरे, कार्यकारी अध्यक्ष अमरसिंह चव्हाण, डॉ. कैलाश करांडे, राजेंद्र माळी, प्रा. मंदार परिचारक, अरिहंत कोठाडिया, राजकुमार आटकळे, रणजीत पवार, डॉ. बसवराज सुतार, डॉ. आनंद भिंगे, डॉ. किरण बहिरवाडे, अभिराज बडवे, प्रा. राजेंद्र मोरे, राजकुमार शहा, प्रद्युम्न कमठाणकर, बसवराज बिराजदार, अमृत शहा, अनंता नाईकनवरे, महेश देशपांडे, नारायण बडवे, प्रथमेश वांगीकर, अशोक अवताडे, अक्षय बडवे पाटील, महेश अंबिके, शिवाजी यादव,आदी कलासाधनाचे सर्व सदस्य प्रयत्नशील आहेत.

## गर्दीचा फायदा घेत सोन्याची साखळी लंपास

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २३ ऑक्टोबर-**

शहरातील 'तळ्यावरची देवी' भवानी पेठ येथे दसऱ्याच्या दिवशी शिलंगण सोहळ्यादरम्यान गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने एका तरुणाची दीड लाख किमतीची सोन्याची साखळी लांबवली. या प्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



श्रीराम बेकरीजवळ उपळाई रोड, बार्शी येथील रहिवासी ऋषिकेश अशोक काकडे (वय २७) हे दि. २० ऑक्टोबर रोजी रात्री सुमारे ८ वाजता त्यांचे भाऊ अभिषेक काकडे यांच्यासोबत भवानी पेठ येथील तळ्यावरची देवी मंदिरात शिलंगणासाठी गेले होते. देवीच्या पालखीजवळ विडा ठेवण्यासाठी गेले असताना तेथील गर्दीचा फायदा घेऊन एकाने त्यांच्या गळ्यातील १५ ग्रॅम वजनाची आणि सुमारे १ लाख ५३ हजार किमतीची सोन्याची साखळी चोरून नेली. गळ्यात साखळी नसल्याचे लक्षात आल्यावर ऋषिकेश व त्यांच्या भावाने परिसरात शोध घेतला; परंतु ती सापडली नाही. यानंतर ऋषिकेश काकडे यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून बार्शी शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तपास हवालदार शबाना कोतवाल करीत आहे.

## जिल्हा परिषद शाळेपासून एमबीबीएसपर्यंत झेप

**प्रतिकूल परिस्थितीवर मात; ऋतुजा पारसेची डॉक्टर होण्याच्या दिशेने वाटचाल**

**तभा वृत्तसेवा । चंद्रकांत कुंभार**
**अकलूज, दि. २३ ऑक्टोबर-**

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत ऋतुजा पारसे हिने वैद्यकीय शिक्षणासाठीची महत्त्वपूर्ण झेप घेतली आहे. राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा (नीट) च्या माध्यमातून तिची सिंधुदुर्ग येथील एस. एस. पी. एम. मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. जिल्हा परिषद शाळेपासून एमबीबीएसपर्यंत झेप घेणारी तिची यशोगाथा छोट्याशा अपयशाने खचणाऱ्या तरुणांसाठी प्रेरणादायी आहे.



ऋतुजाचा शैक्षणिक प्रवास हा केवळ यशाची कहाणी नसून जिद्द, सातत्य आणि स्वप्नपूर्तीसाठी घेतलेल्या कष्टांचा प्रेरणादायी आदर्श आहे. तिचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चव्हाणवस्ती, तोंडले येथे झाले. त्यानंतर तिने हनुमान हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, तांदुळवाडी येथे माध्यमिक शिक्षण घेतले. पाचवीनंतर तिची केंद्रीय जवाहर नवोदय विद्यालयासाठी पोखरापूर येथे निवड झाली होती. पुढे तिने संत तुकाराम इंटरनॅशनल स्कूल, लातूर येथे उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले.

शालेय शिक्षणापासूनच ऋतुजाने वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. हे स्वप्न साकार करण्यासाठी तिने सातत्याने अभ्यास, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर वाटचाल केली. अखेर एनटीएमार्फत घेण्यात आलेल्या नीट परीक्षेत मिळवलेल्या यशाच्या बळावर तिने एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवला. आपल्या स्वप्नपूर्तीच्या दिशेने पहिले महत्त्वाचे पाऊल टाकले. ऋतुजाच्या या यशामागे तिच्या आई-वडिलांचे मोलाचे योगदान आहे. प्रतिकूल आर्थिक परिस्थिती असतानाही त्यांनी तिच्या शिक्षणाला प्राधान्य दिले, तिला प्रोत्साहन दिले आणि तिच्या स्वप्नांना बळ दिले. त्याचबरोबर प्राथमिक शाळेपासून ते उच्च माध्यमिक शिक्षणापर्यंत मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचाही तिच्या यशात महत्त्वाचा वाटा आहे. शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचा विश्वास आणि स्वतःची मेहनत यांचा सुंदर संगम ऋतुजाच्या यशातून दिसून येतो.

**ध्येयाला प्रामाणिक प्रयत्नांची जोड दिल्यास यश निश्चित**

सामान्य परिस्थितीतून असामान्य यशाकडे वाटचाल करणाऱ्या ऋतुजाने आपल्या कर्तृत्वाने परिसरातील विद्यार्थ्यांसमोर प्रेरणादायी उदाहरण उभे केले आहे. मनात ध्येय निश्चित असेल आणि त्यासाठी प्रामाणिक प्रयत्नांची जोड असेल, तर यशाचा मार्ग नक्कीच खुला होतो, हे तिने सिद्ध करून दाखवले आहे. तिच्या या यशाबद्दल तांदुळवाडी पंचक्रोशीतील नागरिक, शिक्षक, नातेवाईकांकडून तिचे अभिनंदन होत आहे.

TJSB BANK
TJSB Sahakari Bank Ltd.
(MULTI-STATE SCHEDULED BANK)

## टीजेएसबी बँकेतर्फे डिजिटल अकाउंट ओपनिंग सुविधेचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**ठाणे, दि.२३ ऑक्टोबर-**

देशातील चौथ्या क्रमांकाची बहुराज्यीय नागरी सहकारी बँक असलेल्या टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड ने तंत्रज्ञान क्षेत्रात आणखी एक मोठे पाऊल टाकत दिनांक १७ ऑक्टोबर पासून आपल्या ग्राहकांसाठी डिजिटल अकाउंट ओपनिंग या नावीन्यपूर्ण सुविधेची सुरुवात केल्याची जाहीर केले आहे.

सदर अत्याधुनिक सुविधेमुळे नवीन ग्राहकांना आता बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये न जाता केवळ काही मिनिटात आपले बचत खाते सुरू करता येणार आहे विशेष म्हणजे या डिजिटल सुविधेचा शुभारंभ झी मराठी वाहिनीवरील संगीत कार्यक्रम सारेगमपच्या मंचावर करण्यात आला आहे. बँकेने आपल्या डिजिटल परिवर्तनाचा भाग म्हणून ही सुविधा विकसित केली असून याद्वारे संपूर्ण प्रक्रिया पेपरलेस सुरक्षित आणि जलद केली आहे. ग्राहकांना त्यांच्या सोयीनुसार मोबाईल किंवा लॅपटॉपद्वारे व्हिडिओ केवायसी प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे व खाते उघडता येऊ शकते. याप्रसंगी बोलताना टीजेएसबीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल आरेकर म्हणाले बँकेने डिजिटल आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी गुंतवणूक केली असून ही नवी सुरुवात म्हणजे टीजेएसबीच्या एका नव्या परिवर्तनाची नांदी आहे, तरी सर्व ग्राहकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा.

# कथांच्या माध्यमातून धर्मसमन्वयाचा जागर

धर्म म्हणजे केवळ कर्मकांड नव्हे, धर्म म्हणजे माणसाला माणसाशी जोडणारा प्रेमाचा धागा! संतांची वाणी, महापुरुषांचे विचार आणि अध्यात्माची शिकवण माणसाच्या मनात सद्भावना रुजवते. समाजात बंधुभाव, समरसता आणि एकात्मतेची भावना निर्माण करते; मात्र आज धर्माच्या नावावर भिंती उभ्या राहत असताना, त्या भिंती पाडून माणसांना जोडण्याचं काम काही संत आपल्या आचरणातून करीत आहेत. पूजनीय स्वामीजी राष्ट्रसंत श्री गोविंददेवगिरीजी महाराज हे त्यापैकीच एक महत्त्वाचं नाव आहे. विविध धार्मिक ग्रंथांवरील कथा-प्रवचनांच्या माध्यमातून त्यांनी अध्यात्म, संतपरंपरा, राष्ट्रपुरुषांचे विचार आणि सामाजिक समरसतेचा अनोखा संगम घडवून आणला आहे. 'ग्रंथ वेगवेगळे, विचार वेगवेगळे; पण माणुसकीचा संदेश एकच!' ही भावना स्वामीजींच्या कार्यामागे असल्याचे त्यांच्या विविध विषयांवरील कथांमधून जाणवते.

पूजनीय गोविंददेवगिरी महाराजांच्या कथाविश्वात भारतीय अध्यात्म आणि संतपरंपरेचा मोठा आवाका दिसून येतो. श्रीमद्भागवत कथा, वाल्मीकी रामायण, महाभारत संदेश कथा, महाभारत शांतिपर्व, भगवद्गीता प्रवचन, ज्ञानेश्वरी भावकथा, दासबोध प्रवचन, तुकाराम गाथा, एकनाथी भागवत आणि संत एकनाथ महाराजांनी रचलेलं भावार्थ रामायण अशा विविध ग्रंथांमधील विचार ते श्रोत्यांसमोर मांडतात. श्रीमद्भागवतापासून बुद्धकथेपर्यंत, ज्ञानेश्वरीपासून दासबोधापर्यंत आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रापासून स्वामी विवेकानंदांच्या जीवनप्रवासापर्यंत अनेक विषय त्यांनी कथांच्या माध्यमातून लोकांसमोर मांडले आहेत.

धार्मिक व्यासपीठावरून इतक्या वैविध्यपूर्ण विषयांची कथारूपाने मांडणी करण्याचा त्यांचा प्रयत्न विशेष उल्लेखनीय आहे. याशिवाय भक्तमाल कथा, श्रीकृष्ण नीती कथा, संत गुलाबराव महाराज चरित्र, गो-कथा, तुलसी रामायण, श्री चैतन्य चरितामृत, शिवपुराण, श्रीदेवी भागवत, विष्णुपुराण, वेदकथा, नवधा भक्ती आणि दत्तभक्ती अशा विषयांचाही त्यांच्या कथांमध्ये समावेश आहे. स्वामी विवेकानंदांच्या जीवनकार्यावर तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रावर आधारित कथाही ते सादर करतात. या विषयांची यादी केवळ त्यांच्या व्यासंगाची व्याप्ती दाखवत नाही, तर भारतीय सांस्कृतिक परंपरेतील विविध प्रवाह एकाच व्यासपीठावर आणण्याचा त्यांचा प्रयत्नही अधोरेखित करते. भक्ती, ज्ञान, वैराग्य, नीती, राष्ट्रप्रेम, कर्तव्य आणि मानवता या मूल्यांचा परस्परांशी असलेला संबंध कथांच्या माध्यमातून उलगडण्याची संधी त्यातून मिळते.

आजच्या धावपळीच्या जीवनात मोठमोठे ग्रंथ वाचण्यासाठी प्रत्येकाला वेळ मिळतोच असं नाही. अशा वेळी कथा हे प्रभावी माध्यम ठरतं. गोष्ट, प्रसंग, संवाद, उदाहरणं आणि कवनांच्या साहाय्यानं एखादा गंभीर विचारही सहजपणे मनापर्यंत पोहोचवता येतो. स्वामीजींच्या कथाप्रवचनांचं वैशिष्ट्यही याच लोकाभिमुख मांडणीत आहे. पूजनीय स्वामीजींच्या कार्यातील एक विशेष उल्लेखनीय पैलू म्हणजे बुद्धकथा. २०१५ मध्ये सिक्कीम येथे बौद्ध धर्मगुरू दलाई लामा यांनी स्वामीजींच्या वाणीतून बुद्धकथेचं श्रवण केलं. या वेळी सुमारे २०० बौद्ध भिक्षू उपस्थित होते. हा प्रसंग केवळ एका धार्मिक कार्यक्रमापुरता मर्यादित नाही. तो भारतीय आध्यात्मिक परंपरेतील संवाद, परस्पर आदर आणि विचारांच्या देवाणघेवाणीचं महत्त्व अधोरेखित करणारा आहे. भगवान बुद्धांच्या जीवनातील करुणा, अहिंसा, समता आणि प्रज्ञेची शिकवण कथारूपानं मांडणं म्हणजे समाजाला आत्मपरीक्षणाची संधी देणे होय. बुद्धांनी माणसाच्या दुःखाचा विचार केला. दुःखातून मुक्त होण्याचा मार्ग सांगितला. करुणेला जीवनाचं अधिष्ठान मानलं. अशा विचारांची कथा जेव्हा विविध पार्श्वभूमीतील श्रोत्यांपर्यंत पोहोचते, तेव्हा धर्माची व्याप्ती केवळ उपासनेपुरती राहत नाही, तर ती मानवी जीवनाच्या उन्नतीशी जोडली जाते. बुद्धांचा करुणेचा संदेश आणि संतपरंपरेतील मानवतेचा विचार यांच्यात संवाद घडवून आणणं, हीच खरी सामाजिक समरसतेची दिशा आहे.

बौद्ध धर्मगुरू आणि महाथेरो भन्ते डॉ. राहुल बोधी हे देश-विदेशात बौद्ध धर्माचा प्रचार व प्रसार करतात. स्वामीजींविषयी त्यांच्या मनात विशेष आदर आणि श्रद्धा आहे. एकदा पूजनीय स्वामीजींनी भन्ते डॉ. राहुल बोधी यांना आळंदी येथील आपल्या वेदश्री तपोवन आश्रमात निमंत्रित केले. ते आश्रमात आल्यानंतर स्वामीजींनी ज्या विनम्रतेनं आणि आत्मीयतेनं त्यांचं स्वागत केलं. त्यामुळे भन्तेजी भावूक झाले. स्वामीजींची साधुता, साधेपणा आणि विनयशीलता पाहून आपण प्रभावित झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. एका बौद्ध संताचं वेदविद्येच्या आश्रमात सन्मानानं स्वागत होणं, हा समाजासमोर ठेवलेला महत्त्वाचा आदर्श आहे. इथं धर्माची ओळख भेद निर्माण करणारी नसून परस्परांचा सन्मान करणारी ठरते. वेदपरंपरा आणि बौद्ध परंपरा यांच्यातील संवादातून एकात्मतेचा संदेश पुढं येतो. संतत्वाची खरी कसोटी केवळ विद्वत्तेत नसते; ते माणसाशी कसे वागतात, यावरही असते.

मोठेपणाचा गाजावाजा करण्याऐवजी दुर्सयाला सन्मान देण्यात जे समाधान मानतात, त्यांच्या वागण्यातूनच विनम्रतेचं सामर्थ्य दिसतं. स्वामीजींच्या स्वागताच्या प्रसंगानं हाच विचार अधोरेखित केला. आपल्या धर्माचा अभिमान बाळगणं आणि दुर्सया धर्माचा आदर करणं, या दोन गोष्टी परस्परविरोधी नाहीत. उलट, स्वतःच्या परंपरेवर निष्ठा ठेवून दुर्सयाच्या श्रद्धेचा सन्मान करता येतो, हे अशा प्रसंगांतून समाजाला शिकायला मिळतं. स्वामीजींच्या कथाकार्यातील आणखी एक महत्त्वाचा विषय म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचं चरित्र. महाराष्ट्राच्या



अस्मितेचं प्रतीक असलेल्या शिवरायांचं जीवन म्हणजे केवळ पराक्रम आणि युद्धांची गाथा नव्हे. ते स्वराज्याची संकल्पना, लोककल्याण, संघटनकौशल्य, धैर्य, दूरदृष्टी आणि न्यायनिष्ठेचं प्रेरणादायी उदाहरण आहे.

शिवरायांच्या जीवनातील प्रसंग कथारूपानं सांगितले, तर इतिहास केवळ तारखांपुरता किंवा पुस्तकांपुरता मर्यादित राहत नाही. तो जिवंत अनुभव बनतो. शिवरायांनी प्रतिकूल परिस्थितीत स्वराज्य उभं केलं. सामान्य माणसाला स्वराज्याच्या ध्येयाशी जोडलं आणि रयतेच्या हिताला महत्त्व दिलं. या मूल्यांचा आजच्या पिढीला परिचय करून देणं गरजेचं आहे. धार्मिक व्यासपीठावरून शिवचरित्राची कथा सांगणं म्हणजे इतिहास, संस्कार आणि राष्ट्रप्रेरणा यांची सांगड घालण्याचा प्रयत्न होय; मात्र अशा कथांमधून इतिहासातील घटनांची अचूकता, संदर्भांची शुद्धता आणि महापुरुषांच्या विचारांचा समतोल राखणंही तितकंच महत्त्वाचं आहे. शिवरायांचा पराक्रम सांगताना त्यांच्या न्यायप्रियतेची, सर्वसामान्यांविषयीच्या आस्थेची आणि स्वराज्याच्या व्यापक संकल्पनेचीही चर्चा झाली पाहिजे. कारण महापुरुषांचं चरित्र हे केवळ गौरवासाठी नसतं, तर ते वर्तमानातील प्रश्नांना उत्तर शोधण्यासाठी प्रेरणा देत असतं. ज्ञानेश्वर माउलींची ज्ञानेश्वरी, संत तुकारामांची गाथा, संत एकनाथांचं साहित्य आणि समर्थ रामदासांचा दासबोध हे महाराष्ट्राच्या वैचारिक परंपरेचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. या साहित्यामध्ये भक्तीबरोबरच विवेक, सदाचार, आत्मपरीक्षण आणि समाजहिताचा विचार आढळतो. संतांनी सामान्य माणसाच्या भाषेत जीवनाचं तत्त्वज्ञान सांगितलं.

अभंग, ओव्या, भारुडं आणि दृष्टांत यांच्या माध्यमातून कठीण विचारही लोकांपर्यंत पोहोचवले. स्वामीजींच्या कथांमध्ये अशा कवनांचा, संतवचनांचा आणि प्रसंगांचा आधार घेतला, तर श्रोत्यांना विषयाशी सहज जोडता येतं. उदाहरणार्थ, संत तुकाराम महाराजांचा समतेचा विचार, संत ज्ञानेश्वरांची विश्वात्मक दृष्टी आणि समर्थ रामदासांचा कर्तव्यनिष्ठेचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. या विचारांची आधुनिक जीवनाशी सांगड घालून मांडणी केली, तर कथा केवळ धार्मिक श्रवण न राहता जीवनाला दिशा देणारा संवाद ठरू शकतं. लोकभाषेतील कथाकथनाचं हे सामर्थ्य आहे. माणूस आपल्या भाषेत ऐकतो, तेव्हा विचार त्याच्या मनाला अधिक जवळचा वाटतो. एखादी गोष्ट, एखादी ओवी किंवा एखादा प्रसंग मनात दीर्घकाळ रेंगाळतो. म्हणूनच कथाव्यासपीठ हे समाजप्रबोधनाचं प्रभावी माध्यम बनू शकतं. श्रीमद्भागवत आणि भगवद्गीतेपासून बुद्धकथेपर्यंत, शिवपुराणापासून शिवचरित्रापर्यंत आणि संतसाहित्यापासून स्वामी विवेकानंदांच्या विचारांपर्यंतचा विषयविस्तार हा स्वामीजींच्या कथाकार्याचा वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे. या सर्व परंपरांमध्ये विषय, तत्त्वज्ञान आणि साधनेच्या पद्धती वेगवेगळ्या असल्या, तरी मानवी जीवन अधिक अर्थपूर्ण करण्याची आकांक्षा अनेक ठिकाणी दिसून येते. कुठं भक्तीला महत्त्व आहे, कुठं विवेकाला; कुठं करुणेला, तर कुठं कर्तव्य आणि लोककल्याणाला. या विविधतेचा आदर राखत त्यांच्यातील विधायक मूल्यं लोकांसमोर मांडणं हे कथाकाराचं महत्त्वाचं काम आहे. धर्माचा उपयोग माणसांना विभाजित करण्यासाठी नव्हे, तर त्यांच्यातील सद्भावना वाढविण्यासाठी व्हावा. एका परंपरेतील व्यक्तीनं दुर्सया परंपरेतील व्यक्तीचा आदर करणं, एकमेकांचे विचार ऐकणं आणि परस्परांच्या श्रद्धेचा सन्मान करणं, यातूनच सामाजिक समरसता बळकट होते.

स्वामीजींनी बौद्ध धर्मगुरूंचं केलेलं स्वागत असो किंवा बुद्धकथेच्या माध्यमातून भगवान बुद्धांचे विचार मांडणे असो; अशा उपक्रमांकडं याच व्यापक भूमिकेतून पाहायला हवं. हे कार्य किती मोठ्या प्रमाणावर झालं, यापेक्षा त्यातून कोणती मूल्यं समाजापर्यंत पोहोचतात, हे अधिक महत्त्वाचं आहे. आज समाजासमोर अनेक आव्हानं आहेत. तरुण पिढीसमोरील दिशेचे प्रश्न, वाढती सामाजिक दरी, परस्परांविषयीचा अविश्वास आणि मूल्यशिक्षणाची गरज या पार्श्वभूमीवर धार्मिक आणि सांस्कृतिक व्यासपीठांची जबाबदारी वाढली आहे.

कथा सांगताना केवळ भूतकाळाचं वर्णन करून थांबता कामा नये. त्या कथेतून आजच्या माणसानं काय शिकावं, समाजानं कोणती दिशा स्वीकारावी आणि पुढील पिढीला कोणती मूल्यं द्यावीत, याचंही मार्गदर्शन झालं पाहिजे. भगवद्गीतेतील कर्मयोगाचा विचार कामाप्रती निष्ठा शिकवू शकतो. बुद्धकथा करुणा आणि आत्मपरीक्षणाची प्रेरणा देऊ शकते. शिवचरित्र धैर्य, संघटन आणि लोकहिताचा विचार जागवू शकते. संतसाहित्य अहंकार कमी करून परस्परांविषयी प्रेम आणि आदर निर्माण करू शकते. या विचारांना दैनंदिन जीवनाशी जोडलं, तर कथाव्यासपीठाचं सामाजिक योगदान अधिक प्रभावी ठरेल. यासाठी अभ्यास, संदर्भांची अचूकता, विषयाचं गांभीर्य आणि श्रोत्यांशी आत्मीयतेनं संवाद साधण्याची क्षमता आवश्यक आहे. धार्मिक परंपरांचं वर्णन करताना दुर्सया परंपरेचा अवमान होणार नाही, याची काळजी घेणंही महत्त्वाचं आहे.

विविधतेतून एकता शोधण्याची भूमिका हीच समरसतेची खरी ओळख ठरते. पूजनीय स्वामीजींच्या विविध विषयांवरील कथाप्रवचनांचा विचार केला, तर त्यात भारतीय ग्रंथपरंपरेची समृद्धी, संतसाहित्याची लोकाभिमुखता, महापुरुषांच्या जीवनातील प्रेरणा आणि धर्मांमधील संवादाची शक्यता दिसून येते. बुद्धकथेपासून शिवचरित्रापर्यंत आणि ज्ञानेश्वरीपासून श्रीमद्भागवतापर्यंतचा हा प्रवास अनेक विषयांना एका व्यासपीठावर आणतो. संतत्व म्हणजे केवळ उपदेश करणं नव्हे, तर आपल्या वागण्यातून आदर्श निर्माण करणं होय.

दुसऱ्याचा सन्मान करणं, विनम्रतेनं वागणं आणि माणसांमधील अंतर कमी करण्याचा प्रयत्न करणं, हीदेखील अध्यात्माचीच रूपं आहेत. भन्ते डॉ. राहुल बोधी यांच्या स्वागताच्या प्रसंगातून समोर आलेला संदेश याच विचाराशी जोडलेला आहे. धर्माची खरी उंची दुर्सयाला कमी लेखण्यात नसते, तर दुर्सयाला सन्मान देण्यात असते. कथा संपते, श्रोते घरी परततात; पण त्या कथेतून मिळालेला विचार त्यांच्या मनात राहिला, वागण्यात उतरला आणि समाजात सद्भावना वाढवू लागला, तर त्या कथाकथनाचं खरं सार्थक होतं. पूजनीय स्वामीजींच्या कथाकार्यातून अशीच विचारप्रेरणा, समरसतेची भावना आणि माणुसकीचा संदेश अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचो, हीच सदिच्छा.

पूजनीय स्वामीजींद्वारे विविध विषयांवर कथा-प्रवचन १) श्रीमदब भागवत कथा २) वाल्मीकि रामायण ३) महाभारत सन्देश कथा ४) महाभारत शांति पर्व कथा ५) भगवद्गीता प्रवचन ६) ज्ञानेश्वरी भावकथा ७) दासबोध प्रवचन ८) तुकाराम गाथा ९) एकनाथी भागवत १०)भावार्थ रामायण (एकनाथ महाराज कृत) ११)भक्तमाल कथा १२) श्रीकृष्ण नीति कथा १३)संत गुलाबराव महाराज चरित्र कथा १४)गो कथा १५)बुद्ध कथा १६)छत्रपति शिवाजी महाराज चरित्र कथा १७) तुलसी रामायण १८) श्री चैतन्य चरितामृत १९) स्वामी विवेकानंद चरित्र २०) शिवपुराण कथा २१) श्री देवी भागवत कथा २२) वेद कथा २३) विष्णु पुराण २४) नवधा भक्ति कथा २५) दत्त भक्ति कथा

**-अरुणकुमार एस. मुंदडा**
**ज्येष्ठ पत्रकार, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)**
asmundada.freelancer@gmail.com

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्री रुक्मिणी मातेला पारंपरिक अलंकारांचा साज

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.२३ ऑक्टोबर-

नवरात्र महोत्सवानिमित्त श्री क्षेत्र पंढरपूर येथील श्री रुक्मिणी मातेला पारंपरिक पोषाखासह विविध मौल्यवान अलंकार परिधान करण्यात आले आहेत.

यावेळी श्री रुक्मिणी मातेला सोन्याचा मुकुट, नवरत्नांचा हार, खड्यांची बिंदी, चिंचपेटी हिरवी, तन्मणी, सोन्या-मोत्यांचे ताणवड, चंद्रहार, मोत्याचा कंठा, पेट्यांची बिंदी, मोत्याचे मंगळसूत्र, सोन्याचे बाजूबंद, रुळजोड, पैंजणजोड, नथ आदी पारंपरिक अलंकारांनी सजवले आहे. याबाबतची माहिती श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.





## महत्त्वाचे...



### पिलीव विकास सोसायटी तज्ज्ञ संचालकपदी अर्जुन वाघ, आबा माने

पिलीव, दि. २३ ऑक्टोबर-

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील पिलीव विकास सह सेवा संस्थेच्या स्वीकृत तज्ञ संचालकपदी अर्जुन शत्रुघ्न वाघ व आबा माने या दोघांच्या बिनविरोध निवडी करण्यात आल्या. पाच वर्षांपासुन रखडलेल्या निवडीला अखेर अवघे चार म पाच महीने मुदत राहिल्यानंतर मुहुर्त मिळाला. यामुळे या दोन्ही संचालकांना ४-५ महिन्यांची मुदत मिळणार आहे. निवडीवेळी चेअरमन पंकज मदने, माजी चेअरमन आनंद पाटील, माजी चेअरमन संग्राम पाटील, संचालक विठ्ठल मदने, महादेव सुळे, जाफर मुलाणी, सिताराम धायगुडे, महेश पाटील उपस्थित होते. निवडीनंतर दोन्ही नूतन तज्ञ संचालकांचा सन्मान करण्यात आला.

### तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

बार्शी, दि. २३ ऑक्टोबर-

शहरातील राऊत चाळ परिसरात राहणाऱ्या तरुणाने अज्ञात कारणावरून राहत्या घरी पंख्याला दोरी बांधून गळफास घेत आत्म हत्या केली. ही घटना गुरुवारी सायंकाळी घडली. प्रविण उर्फ बच्चन नवनाथ रिकीबे (वय ३५, रा. राऊत चाळ, बार्शी) असे मृत तरुणाचे नाव आहे. गुरुवारी सायंकाळी पावणेपाचच्या सुमारास प्रविण रिकीबे यांच्या घरासमोरून रडण्याचा व मोठमोठ्याने ओरडण्याचा आवाज आला. त्यामुळे शेजारी राहणारे किरण काकडे हे घटनास्थळी गेले असता, प्रविण यांनी गेल्या २० ते २५ मिनिटांपासून स्वतःला वरच्या खोलीत कोंडून घेतल्याचे त्यांच्या कुटुंबीयांनी सांगितले. त्यानंतर किरण काकडे आणि त्यांचा मित्र विनोद बोकेफोडे यांनी तातडीने वरच्या खोलीकडे धाव घेऊन बंद दरवाजा तोडला. त्यावेळी रिकीबे यांनी प्रविण खोलीतील फॅनला दोरीच्या साह्याने गळफास घेतल्याचे दिसले. या प्रकरणाचा हवालदार मुंडे तपास करत आहेत.







पहिल्या छायाचित्रात विभागीय आयुक्त शीतल तेली उगले यांनी पुणे येथील मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. दुसऱ्या छायाचित्रात सांगोला येथील जि.प.शाळा, पुजारवाडी येथे पुणे पदवीधर मतदारसंघासाठी जि.प.चे शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांनी सपत्नीक मतदानाचा हक्क बजावला. तिसऱ्या छायाचित्रात माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांनी जवळा, ता.सांगोला येथे मतदानाचा हक्क बजावला.

# सरस्वती ‘लक्ष्मी’वर भारी पडणार

## डॉ. बी.पी.रोंगे; शिक्षक मतदारसंघ निवडणूक, पंढरपुरातील उमेदवारांचा कामावर विश्वास

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.२३ ऑक्टोबर -

विधान परिषदेच्या पुणे विभाग शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघ निवडणुकीत यंदा अखेरच्या टप्प्यातलक्ष्मीदर्शनाची चर्चा होत होती. पदवीधर आणि शिक्षकांच्या प्रश्नांऐवजी चक्क राजकीय आरोप, प्रत्यारोपांच्या फैरी या निवडणूकीच्या प्रचारादरम्यान झाडल्या गेल्या. मात्र आज मतदानानंतर शिक्षक मतदारसंघातील उमेदवार डॉ.बी.पी. रोंगे यांनी देवी लक्ष्मी ऐवजी देवी सरस्वतीचा मतदारांवर प्रभाव पडेल, असे म्हणत आपल्या विजयाचा विश्वास व्यक्त केला.

पंढरपूर शहरात निवडणुकीच्या अखेरच्या दिवशी पैशाची वारेमाप उधळण झाल्याची चर्चा होती. लक्ष्मीदर्शनामुळे पदवीधर आणि शिक्षक मतदारांची दिवाळीअगोदरच मतदारांची दिवाळी झाल्याची चर्चा मतदारांत होती. दरम्यान उमेदवारांचे भवितव्य शुक्रवारी मतदान पेटीत बंद झाले असून येत्या २७ तारखेला या मधील कोणता उमेदवार बाजी मारणार याकडे आता सर्वसामान्यांचे लक्ष लागले आहे.

विधान परिषदेच्या पुणे विभागीय शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघासाठी शुक्रवारी सकाळी आठ वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली. दुपारी बारापर्यंत पदवीधर मतदारसंघात २५ टक्के तर शिक्षक मतदारसंघात ३० टक्के मतदान झाले होते. निवडणुकीत शिक्षक मतदारसंघात भाजपने कौस्तुभ गावडे यांना उमेदवारी दिली. शिवसेनेने उमेदवारी मागे घेतली असली, तरी गनिमी काव्याने अपक्ष उमेदवार सचिन सानप यांना पाठिंबा दिला. माजी आमदार दत्तात्रय सावंत यानी रासपतर्फे उमेदवारी अर्ज दाखल केला. तर स्वेरी महाविद्यालयाचे सर्वेसर्वा डॉ. बी. पी. रोंगे यांनी अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतली. डॉ. रोंगे यांनी पंढरपूर शहरातील द.ह.कवठेकर प्रशालेतील मतदान केंद्रावर तदानाचा हक्क बजाविला. दत्तात्रय सावंत यांनी पुळूज येथील मतदान केंद्रावर आपला मतदानाचा हक्क बजाविला. निवडणुकीत भाजपचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, पालकमंत्री जयकुमार गोरे, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ आणि शिवसेनेचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासारख्या मातब्बर नेत्यांनी प्रचारात सहभाग घेतला. या नेत्यांच्या सहभागामुळे निवडणुकीतील राजकीय चुरस आणखी वाढली.

### पंढरपूर तालुक्यातील दोन उमेदवारांमुळे चुरस

दरम्यान माजी आमदार दत्तात्रय सावंत यांचा मतदारांशी असलेला संपर्क तसेच डॉ.बी.पी. रोंगे यांनी मागील दोन वर्षांपासून या मतदारसंघाचा अभ्यास करीत मतदारसंघात दौरे करुन निवडणूकीच्या काळात शिस्तबध्द प्रचार यंत्रणा राबविल्याने या दोन्ही उमेदवारांच्या उमेदवारीमुळे सोलापूर जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच ढवळून निघाल्याचे दिसून आले. या बरोबरच पुणे विभागातील शिक्षक मतदारांचे पंढरपूर तालुक्यातील या दोन्ही शिक्षक उमेदवारांनी लक्ष वेधून घेतलेल्याचे दिसून आले.

### सावंतांचा लक्ष्मीदर्शनाचा आरोप, रोंगेंना कामावर खात्री

मतदानाच्या अखेरच्या दिवशी पैशांच्या वाटपावरून अर्थात लक्ष्मीदर्शनाच्या चर्चेला उधाण आल्याचा आरोप रासप उमेदवार तथा माजी आमदार दत्तात्रय सावंत यांनी केला. दुसरीकडे, अपक्ष उमेदवार डॉ. बी.पी.रोंगे यांनी निवडणूकीच्या निमित्ताने होत असलेल्या लक्ष्मीदर्शनाचा आरोप करीत आमच्या स्वाभिमानी शिक्षकांना कितीही आमिषे दाखविली तरी ते सदसदविवेक बुध्दीनेच मतदान करतील. त्यामुळे येथे लक्ष्मी ही सरस्वतीवर निश्चितच भारी पडणार नाही असा विश्वास देखील रोंगे यांनी व्यक्त केला.

# बार्शीत ‘शिक्षक’साठी ९२.६६ तर ‘पदवीधर’साठी ८३.५२ टक्के मतदान




तभा वृत्तसेवा
बार्शी दि. २३ ऑक्टोबर -

बार्शी शहर व तालुक्यातील २० मतदान केंद्रांवर शांततेत मतदान पार पडले. शिक्षक मतदारसंघासाठी ९२.६६ टक्के, तर पदवीधर मतदारसंघासाठी ८३.५२ टक्के मतदान झाले. मतदान प्रक्रियेदरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ११ पोलीस अधिकारी आणि ७६ पोलीस अंमलदार तैनात होते.

तहसीलदार एफ. आर. शेख यांच्या माहितीनुसार तालुक्यातील २० मतदान केंद्रांपैकी सहा शहरात तर १४ केंद्रे ग्रामीण भागात होती. क्षेत्रीय अधिकारी म्हणून मुख्याधिकारी तैमूर मुलाणी, गटविकास अधिकारी विवेक जमदाडे, तालुका कृषी अधिकारी संतोष कोयले आणि गटशिक्षणाधिकारी गजानन बाजड यांनी काम पाहिले. शिक्षक मतदारसंघात १,६४८ मतदारांपैकी १,५२७ मतदारांनी मतदान केले. यामध्ये १,१३४ पुरुष आणि ३९३ महिला मतदारांचा समावेश आहे. पदवीधर मतदारसंघात ३,९९९ मतदारांपैकी ३,३४० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये २,६६९ पुरुष आणि ६७१ महिला मतदारांचा समावेश आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली बार्शी शहर, तालुका पोलीस ठाणे, वैराग पोलीस ठाणे, पांगरी पोलीस ठाणे यांच्या पथकांनी बंदोबस्त ठेवला.

### आंधळकरांच्या बोटावर शाई नसल्याने खळबळ

पदवीधर मतदारसंघातील बार्शीचे अपक्ष उमेदवार भाऊसाहेब आंधळकर यांनी महाराष्ट्र विद्यालयातील मतदान केंद्रावर मतदान केले. मात्र मतदानानंतर पत्रकारांना बोट दाखवताना त्यांच्या बोटावर शाई नसल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी पुन्हा मतदान केंद्रात जाऊन बोटाला शाई लावून घेतली. या प्रकारावर संताप व्यक्त करत त्यांनी बोगस मतदानाला वाव मिळत असल्याचा आरोप केला.

### सामाईक विहिरीतील पाण्याच्या वादातून सख्ख्या भावाला मारहाण

तभा वृत्तसेवा
बार्शी, दि. २३ ऑक्टोबर -

सामाईक विहिरीतील पाणी उपसण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून सख्ख्या भावाने खो-याने मारहाण करून भावाला जखमी केले. ही घटना बार्शी तालुक्यातील धोत्रे येथे घडली. या प्रकरणी विठ्ठल प्रल्हाद जाधवर याच्याविरूद्ध बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

कुंडलिक जाधवर (वय ५५, रा. धोत्रे) हे आपल्या पिकांना पाणी देण्यासाठी विहिरीवरील मोटार सुरू करण्यास गेले होते. मात्र, त्यांचा भाऊ विठ्ठलने आधीच मोटार सुरू केली होती. यावेळी कुंडलिक यांनी पिकांना पाणी देण्यासाठी मोटार बंद करण्यास सांगितले असता, विठ्ठलने तू विहिरीवर यायचे नाही असे म्हणत शिवीगाळ केली. तसेच खो-याने कुंडलिक यांच्या डाव्या भुवईवर तसेच डाव्या खांद्यावर म ारहाण करून त्यांना जखमी केले.

## कुर्डूवाडीत ‘पदवीधर’साठी ५७ टक्के मतदान



तभा वृत्तसेवा,
कुर्डूवाडी, दि. २३ ऑक्टोबर -

पुणे विभाग पदवीधर म तदारसंघाच्या निवडणुकीत कुर्डूवाडी येथील दोन मतदान केंद्रावर ५७ टक्के मतदान झाले. सकाळी मतदानाचा वेग कमी होता, परंतु दुपारी दोन वाजल्यानंतर मतदानाने वेग पकडला. शिक्षक मतदारसंघात ८५ टक्के मतदान झाले.

कुर्डूवाडी येथील नगरपालिकेच्या शाळा क्रमांक एक येथे पदवीधर म तदारसंघासाठी दोन बूथ तर शिक्षक मतदारसंघासाठी एक बूथ होता दोन्ही बूथवरून पदवीधर मतदारसंघाचे १३५५ मतदान होते. बुथ क्रमांक १६८ वर ३९१ तर बुथ क्रमांक १६९ वर ३७९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. शिक्षक मतदारसंघाच्या एका बुथवर ३९६ मतदान होते यापैकी ३३६ मतदाराने आपला हक्क बजावला. शिक्षक मतदार संघात जनजागृती तसेच अदृश्य शक्ती जास्त फिरल्यामुळे मतदान ८५ टक्के मतदान झालेले आहे. यावेळी या बुथवर माजी आमदार दत्तात्रय सावंत यांनी मतदारांना भेट दिली होती.

**केवळ तीन उमेदवारांचे बुथ**

कुर्डूवाडी येथील मतदान केंद्राबाहेर भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस या दोन मोठ्या पक्षांचे बुथ होते. शिक्षक मतदार संघातील अपक्ष उमेदवार बब्रुवाहन रोंगे यांचा एक असे तीन बुथ होते. गेली २५ वर्ष शिवसेनेची कुर्डूवाडी सत्ता आहे. शिवसेनेचे पदवीधर मतदारसंघातील उमेदवार सुनील मोदी यांचा बूथ नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात होते. पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या कुर्डूवाडी येथील मतदान केंद्रावर जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजित शिंदे व माढा तालुका पंचायत समितीचे गटनेते प्रा. आशिष रजपूत यांनी रांगेत उभे राहून मतदानाचा हक्क बजावला.

## अक्कलकोट तालुक्यात चुरशीने मतदान

### निवडणुकीत ८५.२६ टक्के पदवीधरांनी तर ९४.६६ टक्के शिक्षकांनी बजावला हक्क

तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट, दि. २३ ऑक्टोबर -

पुणे पदवीधर व शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीसाठी शुक्रवारी अक्कलकोट तालुक्यातील २० मतदान केंद्रावर अत्यंत चुरशीने मतदान झाले. कुठेही अनुचित प्रकार न घडला नाही. पदवीधर मतदारसंघात ८५.२६ टक्के तर शिक्षक मतदारसंघात ९४.६६ टक्के मतदान झाले.

अक्कलकोट शहरातील येऊन चौक येथील वरिष्ठ प्राथमिक शाळेतील पदवीधर बूथवर ६३५ पैकी ५४०, शिक्षककरिता ३९१ पैकी ३६३, जेऊर येथे



पदवीधरसाठी ९६ पैकी ९१, शिक्षक २५१ पैकी २०८, मैंदर्गी येथे पदवीधर ३२७ पैकी २७१, शिक्षक ७१ पकी ६९, दुधनी येथे पदवीधर ११८ तर शिक्षक ५० मतदारांनी मतदान केले. अक्कलकोट, चपळगाव, दुधनी, जेऊर, मैंदर्गी, तडवळ, वागदरी, वळसंग, बोरामणी आणि धोत्री आधी मतदान केंद्रावर सकाळच्या दरम्यान मतदानासाठी पदवीधर व शिक्षक मतदारांनी रांगेत उभे राहून मतदानाचा हक्क बजावला.

मात्र दुपारच्या सत्रात उन्हाच्या तीव्रतेमुळे मतदान कमी झाले. दुपारी तीन ते चार वाजेच्या दरम्यान पुन्हा मतदाराच्या रांगा लागल्या होत्या. यंदा प्रथमच अत्यंत चुरशीने व शांततेने मतदान झाले. प्रत्येक शाळांमध्ये मतदान केंद्र उभारले होते. काही शिक्षक शहरात स्थायिक झाल्याने त्यांना गावाकडील केंद्रात मतदान तर शहरात पदवीधर मतदान केंद्रावर मतदान करताना धावपळ झाली.

भाजपचे उमेदवार डॉ. स्मिता जाधव व कौस्तुभ गावडे यांच्या प्रचारार्थ अक्कलकोट तालुक्यातील शाळा महाविद्यालय व शिक्षण संस्थांना भेटी देत आमदार सचिन कल्याणशेट्टींनी व्यूहरचना आखली. शिवसेनेतर्फे सिद्धाराम म्हेत्रे यांनी मोहिम राबवली.

## ‘आरोग्य संपन्न गाव’चा अक्कलकोटमध्ये प्रारंभ

### तालुकास्तरीय प्रशिक्षण; शासकीय विभागांच्या समन्वय साधण्यावर भर

तभा वृत्तसेवा,
सोलापूर दि.२३ ऑक्टोबर

गावातील आरोग्यसेवांचा दर्जा उंचावणे आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागातून गावांचा आरोग्यविषयक निर्देशांक सुधारणे, या उद्देशाने अक्कलकोट तालुक्यात ‘माझे गाव आरोग्य संपन्न गाव’ अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीची तयारी सुरू झाली आहे. पंचायत समिती अक्कलकोट येथे तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या वतीने तालुकास्तरीय प्रशिक्षण पार पडले.

गावाचा आरोग्यविकास आरोग्य विभागापुरता मर्यादित न ठेवता विविध शासकीय विभागांच्या समन्वयातून साधण्यावर प्रशिक्षणात भर दिला. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड यांच्या निर्देशानुसार हे प्रशिक्षण झाले.



अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे आणि गटविकास अधिकारी शंकर कवितके यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अश्विन करजखेडे व तालुकास्तरीय प्रशिक्षकांनी अभियानाची उद्दिष्टे, कार्यपद्धती आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी याविषयी मार्गदर्शन केले.

गावपातळीवर आरोग्यविषयक उपक्रमांचे नियोजन कसे करावे, त्यांची अंमलबजावणी कशी करावी आणि लोकसहभागातून आरोग्यविषयक उद्दिष्टे कशी साध्य करावीत, यावरही चर्चा झाली. अभियानांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायती आणि आरोग्य संस्थांना देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची माहिती देऊन कामकाजाला प्रोत्साहन देण्यात आले.

प्रशिक्षणास पंचायत समितीचे विस्तार अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहाय्यक व सहायिका, आरोग्य सेवक व सेविका तसेच गटप्रवर्तक उपस्थित होते.

### लोकसहभागातून आरोग्यसंपन्न गावांचा संकल्प

अभियान यशस्वी करण्यासाठी प्रत्येक गावातील सरपंच, ग्रामपंचायत पदाधिकारी, नागरिक, तरुण मंडळे, महिला बचत गट तसेच शिक्षण आणि एकात्मिक बालविकास प्रकल्प विभागासह अन्य शासकीय यंत्रणांनी सक्रिय सहभाग घ्यावा.

**- डॉ. अश्विन करजखेडे, तालुका आरोग्य अधिकारी.**

प्रशिक्षणाच्या यशस्वितेसाठी तालुका विस्तार अधिकारी महेश भोरे, आरोग्य सहाय्यक सिद्रामप्पा लोकापुरे, आरोग्य पर्यवेक्षक सुरेश भास्कर, कुष्ठरोग तंत्रज्ञ श्रीकांत हसरमनी, आरोग्य सेवक भरत जाधव, टीबी सुपरवायझर शिवाजी चंदनशिवे, नजीर दलाल, वैभव हिप्परगी आणि अन्य कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.